सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ६८ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



समाजावर आलेल्या एखाद्या आपत्तीची, कोसळलेल्या एखाद्या संकटाची प्रतिक्रिया म्हणून नव्हे, निराशेतूनही नव्हे, तर समाजाविषयीच्या आपलेपणातून आणि भारताला पुन्हा जगात सर्वश्रेष्ठपदी आपण आपल्या अथक प्रयत्नांनी विराजमान करू या भावात्मक विजिगीषू जाणिवेतून कार्याची प्रेरणा उद्भवणे आवश्यक आहे.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# राहुल गांधींच्या हट्टीपणामुळे लोकसभेत प्रचंड गदारोळ

**● वादग्रस्त मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न ● कामकाज दिवसभरासाठी स्थगित**





**◆ नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणातील वादग्रस्त मुद्यांवरुन आज लोकसभेत प्रचंड गदारोळ उडाला. या मुद्यावरुन काँग्रेस आणि सत्ताधारी पक्षात जोरदार शाब्दिक चकमकही झाली. गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज आधी दोन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर लोकसभेत आजपासून चर्चा सुरु झाली. भाजपाचे तेजस्वी सूर्या यांनी या चर्चेला प्रारंभ केला. त्यानंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी चर्चेत भाग घेतांना चीन आणि डोकलामचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न करत सरकारवर आरोप केले. विशेष म्हणजे राहुल गांधी बोलत असतांना पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह सभागृहात उपस्थित होते. भारतीय संस्कृतीच्या मुद्यावरुन तेजस्वी सूर्या यांनी काँग्रेस पक्षावर केलेले आरोप राहुल गांधी यांनी खोडून काढले. नंतर त्यांनी चीनची घुसखोरी आणि डोकलाम मुद्यावरुन माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या प्रकाशित न झालेल्या पुस्तकातील मजकुराचा आधार घेत आरोप करण्याचा प्रयत्न केला. मला हा मुद्दा उपस्थित करायचा नव्हता पण भाजपाने आमच्या देशभक्तीवर शंका व्यक्त केल्याने आणि हा मुद्दा हाती घ्यावा लागला, असे राहुल म्हणाले. यावर संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्यासह गृहमंत्री अमित शाह, किरेन रिजिजू यांनी तीव्र आक्षेप घेतला. हे पुस्तक अजून प्रकाशितच झाले नाही, याकडे लक्ष वेधत अप्रकाशित पुस्तकातील मजकुरावरुन आरोप करणे योग्य नसल्याचे ते म्हणाले. मात्र, राहुल गांधी वारंवार हाच मुद्दा उपस्थित करीत होते आणि त्याला सत्ताधारी विरोध करीत होते. त्यामुळे गोंधळ वाढल्याने सभागृहाचे कामकाज तीन वाजेपर्यंत तहकूब केले. दुपारी ३ वाजता कामकाज सुरु झाल्यावर पुन्हा राहुल गांधी बोलायला उभे झाले. त्यांनी पुन्हा तोच मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे सभागृहात पुन्हा गोंधळ झाला. त्यामुळे कामकाज ४ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले. दुपारी ४ वाजता कामकाज सुरु झाल्यावर राहुल गांधी यांनी डोकलाम आणि चीनचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. यावर पिठासीन अध्यक्ष जगदंबिका पाल यानी त्यावर आक्षेप घेतला. गोंधळ वाढल्याने कामकाज दिवसभरासाठी तहकूब केले. (तभा वृत्तसेवा)

### ओम बिर्ला यांच्याकडून समज

वस्तुस्थितीला धरुन असलेले आरोपच राहुल गांधी यांनी करावे, खोडसाळ आणि निराधार आरोप करु नये, अशी समज लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधी यांना दिली. आपल्या हातातील कथित पुस्तकाचा हवाला देत मी करत असलेले आरोप १०० टक्के खरे असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला. त्यावर अधिकृत आणि विश्वसनीय कागदपत्रांचा हवाला देतच सभागृहात आरोप केले पाहिजे, असे बिर्ला म्हणाले. राहुल गांधी विरोधी पक्षनेते आहेत, त्यांच्याकडून जबाबदार वागणुकीची अपेक्षा आहे, असे बिर्ला म्हणाले.

# भाजपाकडून महापौर पदासाठी विनायक कोंड्याल

**उपमहापौर पदासाठी ज्ञानेश्वरी देवकर यांचा अर्ज**

- अडीच वर्षासाठी असणार संधी
- आता स्थायी सभापती कोण?
- शिवसेना शिंदे गट, 'एमआयएम'नेही दाखल केले अर्ज







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी 'भाजपा'कडून अनुक्रमे विनायक कोंड्याल व ज्ञानेश्वरी देवकर यांची नावे जाहीर करण्यात आले. त्यानुसार कोंड्याल व देवकर यांनी सोमवारी नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांच्याकडे नामनिर्देशन पत्र सादर केले. महापौर व उपमहापौर पदाची निवड अडीच वर्षांसाठी राहणार असल्याचे सांगण्यात आले. आता भाजपाकडून स्थायी सभापतीपदी कोणाला संधी दिली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, आपापल्या पक्षाचे पुरेसे संख्याबळ नसतानाही शिवसेना शिंदे गट आणि एमआयएमकडून या दोन्ही पदासाठी अर्ज सादर करण्यात आले. भाजपाकडून विनायक कोंड्याल यांनी महापौरपदासाठी दोन अर्ज दाखल केले. त्यांच्या पहिल्या अर्जावर संजय कोळी सूचक तर श्रीकांचना यन्नम तर दुसऱ्या अर्जावर बिज्जू प्रधाने सूचक तर सात्विक बडवे यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली. महापौर पदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून प्रियदर्शन साठे यांच्या अर्जावर अनिकेत पिसे सूचक तर अमोल शिंदे अनुमोदक आहेत.

एमआयएमकडून तौफिक हत्तुरे यांच्या अर्जावर सफिया चौधरी सूचक तर अकिला भागनगरी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली. उपमहापौर पदासाठी भाजपाकडून ज्ञानेश्वरी देवकर यांच्या अर्जावर बसवराज केंगनाळकर सूचक तर अश्विनी चव्हाण अनुमोदक आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून प्रियदर्शन साठे यांच्या अर्जावर अमोल शिंदे सूचक व अनिकेत पिसे अनुमोदक आहेत. एमएमएमकडून आसिफ अहमद पीर अहमद शेख यांच्या अर्जावर वहिदाबानो शेख सूचक तर अकिला भागनगरी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केल्या आहेत. (सविस्तर वृत्त पान ९ वर)

## महत्त्वाचे

### शेवटच्या अर्ध्या तासात बाजार उसळला



**मुंबई** : अर्थसंकल्पाच्या दिवशी झालेल्या मोठ्या पडझडीनंतर आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजाराने पुन्हा भरारी घेतली. सुरुवातीच्या सत्रात अस्थिरतेनंतर गुंतवणूकदारांनी दागवलेल्या विश्वासामुळे बाजाराने दिवसाच्या उच्चांकी पातळीवर बंद होत दमदार पुनरागमन केले. निर्देशांक ९४४ अंकांनी वाढला तर निफ्टीत २६३ अंकांची वाढ झाली. विशेष म्हणजे, आयटी क्षेत्र वगळता इतर सर्वच क्षेत्रात सोमवारी मोठी खरेदी पाहायला मिळाली. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी घसरण, अर्थसंकल्पातील दूरदर्शीपणा, रुपया मजबूत होणे याचा फायदा बाजाराला झाला.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट ठार

**अकोला** : बाळापूर ते वाडेगाव मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट ठार झाल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेनंतर वनविभागाने घटनास्थळी धाव घेतली. वाहनांवर नियंत्रण ठेवून वाहने चालवावी जेणेकरून वन्यजिव सुरक्षित राहतील, असे आवाहन नागरिकांना केले.

# वांगचूक यांच्यामुळे हिंसाचार भडकण्याचा होता धोका

**नेपाळ-बांगलादेशसारखी परिस्थिती बनवायची होती | सर्वोच्च न्यायालयात केंद्राचा दावा**

**◆ नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**

सोनम वांगचूक यांना लडाखमध्ये नेपाळ आणि बांगलादेशसारखी परिस्थिती निर्माण करायची होती, असे केंद्र सरकार आणि लडाख प्रशासनाने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले. वांगचूक यांच्या वक्तव्यामुळे हिंसाचार भडकण्याचा धोका होता. वांगचूक यांनी केंद्र सरकारला संबोधलेले, ते फुटीरतावादी मानसिकतेचे प्रतिबिंब आहे. त्यांनी जेन-झीला गृहयुद्ध आणि रक्तपातासाठी चिथावणी देण्याचा प्रयत्न केला, असा दावा सरकारने न्यायालयात केला.

राष्ट्रीय सुरक्षा कायद्याच्या अंतर्गत सोनम वांगचूक यांना झालेल्या अटकेला आव्हान देताना त्यांची पत्नी गीतांजली जे. अंग्मो यांनी दाखल केलेल्या याचिकेला विरोध करताना महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी न्या. अरविंद कुमार आणि न्या. पी. बी. वैराले यांच्या न्यायासनासमोर हा युक्तिवाद केला. (वृत्तसंस्था)

### प्रक्षोभक भाषणे अन् हिंसाचाराला चिथावणी

वांगचूक यांनी त्यांच्या भाषणांमध्ये महात्मा गांधींचे नाव फक्त तरुणांना भडकवण्यासाठी वापरले, असा दावा मेहता यांनी न्यायालयात केला. त्यांनी अनेकदा प्रक्षोभक भाषणे दिली. ते गांधीजींच्या नावाने सुरुवात आणि शेवट करतात. परंतु, मध्यभागी हिंसाचाराला चिथावणी देणारी वक्तव्ये असतात. त्यांनी नेपाळ आणि अरब क्रांतीचा उल्लेख केला आणि आत्मदहनासारख्या घटनांबद्दल बोलले. या माध्यमातून तरुणांना हिंसाचारासाठी प्रवृत्त केले, असा आरोप मेहता यांनी केला.

### विविध ठिकाणी छापेमारी

**श्रीनगर** : दहशतवादी कारवाया आणि निधी पुरवठा जाळ्यासंदर्भात सुरू असलेल्या तपासाचा भाग म्हणून राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने सोमवारी काश्मीर खोऱ्यातील अनेक ठिकाणी छापेमारी केली. श्रीनगर, बारामुल्ला, सोपोर आणि बांदीपोरा येथे पहाटेच्या वेळी ही शोधमोहीम राबवण्यात आली. एनआयएच्या पथकांना स्थानिक पोलिस आणि सीआरपीएफने मदत केली. हे छापे खोऱ्यात मारण्यात आले.

# 'रालोआ'त येणार असाल तरच विलीनीकरण

### सुनील तटकरे यांनी शरद पवार गटाला सुनावले



**कराड, २ फेब्रुवारी**

दिवंगत अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआत सामील होण्याचा सामूहिक निर्णय घेतला होता आणि पक्ष तिथेच कायम राहील. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबद्दल बोलणाऱ्यांनी त्यांना हे मान्य आहे की नाही, हे स्पष्ट करावे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांनी सोमवारी सांगितले.

कोणता पक्ष कोणत्या पक्षात विलीन होणार होता, यावर स्पष्टता असायला हवी, असे तटकरे यांनी सातारा जिल्ह्यातील कराड येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले. महाराष्ट्राच्या नवनियुक्त उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी कराड येथील राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मारकावर आदरांजली अर्पण केली. त्यावेळी तटकरे त्यांच्यासोबत होते. पुणे जिल्ह्यातील बारामती येथे विमान अपघातात पती आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर तीन दिवसांनी शनिवारी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. शपथ घेण्यापूर्वी त्यांची मुंबई येथे झालेल्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली होती.

प्रस्तावित विलीनीकरणाला असलेल्या विरोधाबद्दलच्या प्रश्नाला उत्तर देताना तटकरे म्हणाले की, या मुद्यावर माझे किंवा पक्षाचे खासदार प्रफुल्ल पटेल यांचे वेगळे मत असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अजित दादांच्या नेतृत्वाखाली आम्ही भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआत सामील होण्याचा सामूहिक निर्णय घेतला होता आणि राज्यातील जनतेने विधानसभा निवडणुकीत अजित दादांच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. विलीनीकरणाबद्दल बोलणाऱ्यांनी, त्यांना हे मान्य आहे की नाही, याचे उत्तर द्यावे, असे ते म्हणाले.

# अमेरिकेने भारतावरील टेरिफ केले कमी

### मोदींशी चर्चेनंतर ट्रम्प यांची घोषणा; २५ वरुन १८ टक्क्यांवर आणले



**नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी करारवर आमच्यात सहमती झाली आहे. त्यामुळं अमेरिकेनं रेसिप्रोकल टॅरिफ कमी करण्याचा निर्णय घेतला असून ते २५ टक्क्यांवरुन १८ टक्क्यांवर आणत आहोत.

आता ते देखील त्यांच्याकडील टॅरिफचे दर कमी करण्याचे प्रयत्न करतील. अमेरिकेसोबत टॅरिफचा अडथळा येऊ नये म्हणून झीरो टॅरिफच्या दिशेने प्रयत्न होतील, अशी अपेक्षा ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मोठ्या प्रमाणात अमेरिकेकडून खरेदी करण्यास कटिबद्ध असल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. ५०० अब्ज डॉलर्सची अतिरिक्त खरेदी ज्यामध्ये अमेरिकन ऊर्जा, तंत्रज्ञान, कृषी, कोळसा आणि इतर उत्पादनांचा समावेश असेल.

भारतासोबतचे संबंध आणखी मजबूत होतील, असं ट्रम्प म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मी आम्ही दोघं हे पूर्ण होईल हे पाहू. अधिक काही बोलण्याची गरज नाही, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.

# मुंढवा जमीन गैरव्यवहारात मोठी कारवाई

### १८८६ पानी आरोपपत्रात शीतल तेजवानीच आरोपी; पार्थ पवार, दिग्विजय पाटील यांची नावे गायब

**मुंबई, २ फेब्रुवारी**

पुण्यातील मुंढवा परिसरातील जमीन गैरव्यवहार प्रकरणात अखेर आरोपपत्र दाखल करण्यात आले असून या घडामोडीने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. आर्थिक गुन्हे विभागाने न्यायालयात सादर केलेल्या या दोषारोपपत्रात फक्त शीतल तेजवानी यांचे नाव आरोपी म्हणून नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात आधी चर्चेत असलेली दिग्विजय पाटील आणि पार्थ पवार यांची नावे आरोपपत्रात समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या दोघांना या टप्प्यावर दिलासा मिळाल्याची चर्चा आहे.

या जमीन गैरव्यवहार प्रकरणात पूर्वी पार्थ पवार यांच्यावरही आरोप करण्यात आले होते. मात्र, सादर करण्यात आलेल्या १८८६ पानी विस्तृत चार्जशीटमध्ये त्यांचे नाव नसल्याने राजकीय वतुर्ळात चर्चा रंगली आहे. दिग्विजय पाटील यांचाही उल्लेख आरोपपत्रात नाही. परिणामी, या दोघांविरोधातील तपासाची दिशा काय, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी कालच केली होती. त्यानंतर लगेचच आरोपपत्र दाखल झाल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी शीतल तेजवानी हिला या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि आरोपी मानत न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे. या कारवाईमुळे प्रकरणातील कायदेशीर प्रक्रिया पुढे सरकली असली, तरी अनेक प्रश्न अनुत्तरीतच राहिल्याचे दिसते. अंजली दमानिया यांनी या संदर्भात संताप व्यक्त करणारी पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. महाराष्ट्र हा फक्त राजकीय दलालीचा अड्डा झाला आहे का? कायदा फक्त सामान्यांसाठीच आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यांनी नमूद केले की, शीतल तेजवानी यांनी एसपी सिव्हिल सूट २२१३/२०२५ दिग्विजय पाटील यांच्या विरोधात दाखल करत व्यवहार रद्द करण्याची मागणी केली आहे, तर दिग्विजय पाटील यांनी एसपी सिव्हिल सूट २३४७/२०२५ शीतल तेजवानी यांच्या विरोधात दाखल केला आहे.

### खुल्या तंबाखूवरील अबकारी कर मागे

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने अनिर्मित तंबाखू आणि काही संबंधित उत्पादनांवरील केंद्रीय उत्पादन शुल्क हटवले आहे. यापूर्वी ब्रॅण्ड नाव नसलेल्या आणि किरकोळ विक्रीसाठी पॅक न केलेल्या अनिर्मित तंबाखू उत्पादनांवर १८ टक्के उत्पादन शुल्क लागू केले होते. अनिर्मित तंबाखूवर शून्य उत्पादन शुल्क आकारले जाईल.

# समाज संघाकडे विश्वासाने बघतो : सरसंघचालक

### 'समर्थ भारत'च्या अद्ययावत संकेतस्थळाचे लोकार्पण

**◆ पुणे, २ फेब्रुवारी**

समाज संघाकडे सकारात्मकतेने, विश्वासाने बघतो. ही आपल्यासाठी संधी आणि आव्हान दोन्ही आहे. 'समर्थ भारत'सारखी नियोजनबद्ध कामे योजनापूर्वक हाती घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

मोतीबाग येथे सरसंघचालकांच्या हस्ते 'समर्थ भारत'च्या अद्ययावत संकेतस्थळाचे लोकार्पण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर यावेळी उपस्थित होते.

सरसंघचालक म्हणाले की, संघात काम करताना नागरिकांना सुरक्षितता वाटते, असा अनुभव आहे. काळाची शर्यत लक्षात घेता समाजाची कामे गतीने झाली पाहिजे. त्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेत स्थानिक पातळीवरील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. त्याकरिता हे संकेतस्थळ नक्कीच उपयोगी आहे.

**काय आहे 'समर्थ भारत'?**

'समर्थ भारत' हा एक सामाजिक उपक्रम असून, सामाजिक कामांमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागातून भारताला सक्षम बनवण्याच्या उद्देशाने कार्यरत आहे. आरोग्यसेवा, शिक्षण, सक्षमीकरण, शाश्वतता आणि समुदाय विकास अशा विविध सामाजिक उपक्रमांशी सामान्य नागरिक, स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्था आणि कॉर्पोरेट्स यांना जोडणे हे समर्थ भारतचे प्रमुख कार्य आहे.

२०१७ मध्ये सुरू झालेला समर्थ भारत हा एक मोफत प्लॅटफॉर्म असून, नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि कॉर्पोरेट्स यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी तयार करण्यात आला आहे. नागरिकांना अर्थपूर्ण सामाजिक उपक्रमांशी जोडून स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवकांचे नेटवर्क यांना एकत्र आणण्याचे कार्य समर्थ भारत करते. आजपर्यंत समर्थ भारतने ७ हजार ५०० हून अधिक स्वयंसेवकांना विविध स्वयंसेवी संस्थांशी जोडले आहे. २०१८ मधील स्वच्छ नदी अभियान, कोविड-१९ मदतकार्य, ३ लाखांहून अधिक रक्तपिशव्यांचे संकलन, ५१ लाखांपेक्षा जास्त भोजन वितरण आणि एक लाखांहून अधिक वैद्यकीय तपासण्या अशा अनेक प्रभावी सामाजिक उपक्रमांना चालना दिली आहे. यावेळी समर्थ भारतचे मंगेश घाटपांडे, विनोद खरे, अधिराज गाडगीळ उपस्थित होते. (वृत्तसंस्था)



'समर्थ भारत'च्या संकेतस्थळाचे लोकार्पण करताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत

# जागतिक विकासात भारताने अमेरिकेला मागे टाकले

### मस्क म्हणाले, शक्तीचे संतुलन बदलत आहे



**◆ वॉशिंग्टन, २ फेब्रुवारी**

जागतिक अर्थव्यवस्थेत एक मोठा बदल घडत असल्याचे दिसून येत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आईएमएफ) च्या अंदाज आणि अलिकडील आकडेवारीवरून असे दिसून येते की जागतिक आर्थिक विकासाचे केंद्र हळूहळू पश्चिमेकडून पूर्वेकडे सरकत आहे. अब्जाधीश उद्योगपती एलन मस्क यांनीही या आकडेवारीवर प्रतिक्रिया दिली आहे. आईएमएफच्या जानेवारी २०२६ च्या अंदाजांवर आधारित एक चार्ट शेअर करताना मस्क म्हणाले की शक्ती संतुलन बदलत आहे.

या अंदाजानुसार, २०२६ मध्ये चीन आणि भारत एकत्रितपणे जागतिक वास्तविक जीडीपी वाढीमध्ये ४३.६ टक्के योगदान देतील, तर एकटा भारत १७ टक्क्यांसह दुसऱ्या क्रमांकावर असेल. त्या तुलनेत, अमेरिका ९.९ टक्के योगदान देईल, असा अंदाज आहे, जो दर्शवितो की जागतिक आर्थिक वाढीमध्ये भारताने आता अमेरिकेला मागे टाकले आहे. मस्क यांची टिप्पणी अशा वेळी आली आहे जेव्हा जग आर्थिक अस्थिरता आणि वाढत्या व्यापार तणावाचा सामना करत आहे. हे आकडे, विशेषतः डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन आणि भारतासारख्या देशांवर लादलेल्या शुल्काच्या पृष्ठभूमीवर, जागतिक आर्थिक शक्ती पूर्वेकडे सरकत असल्याचे सूचित करतात. आयएमएफच्या मते, जागतिक अर्थव्यवस्था २०२६ मध्ये ३.३ टक्के आणि २०२७ मध्ये ३.२ टक्के दराने वाढेल, जी ऑक्टोबर २०२५ च्या अंदाजापेक्षा थोडी चांगली आहे.

अहवालात असे म्हटले आहे की तंत्रज्ञानातील मजबूत गुंतवणूक, सरकारांकडून मिळणारा वित्तीय आणि आर्थिक पाठिंबा, अनुकूल आर्थिक परिस्थिती आणि मजबूत खाजगी क्षेत्र यामुळे व्यापार धोरणांमधील बदलांचा परिणाम मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. आयएमएफने असेही म्हटले आहे की येत्या काळात जागतिक चलनवाढ हळूहळू कमी होईल, जरी अमेरिकेच्या चलनवाढीच्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्यास काही वेळ लागू शकतो. तंत्रज्ञानाशी संबंधित अपेक्षांमध्ये घट किंवा वाढलेले भू-राजकीय तणाव आर्थिक वाढीवर नकारात्मक परिणाम करू शकतात, असा इशारा अहवालात देण्यात आला. (वृत्तसंस्था)

### अहवाल भारतासाठी सकारात्मक

हा अहवाल भारतासाठी विशेषतः सकारात्मक मानला जात आहे. कारण २०२५ साठीचा विकास अंदाज तिसऱ्या तिमाहीत सुधारित कामगिरी आणि चौथ्या तिमाहीत मजबूत गतीचा हवाला देत ०.७ टक्के वाढवून ७.३ टक्के करण्यात आला आहे. तथापि, तात्पुरत्या आणि चक्रीय घटकांचा प्रभाव हळूहळू कमी होत असल्याने भारताचा विकास दर २०२६ आणि २०२७ मध्ये ६.४ टक्क्यांपर्यंत मध्यम होण्याची अपेक्षा आहे. अहवालानुसार, २०२५ मध्ये तीव्र घट झाल्यानंतर भारतातील महागाई लक्ष्याच्या जवळ परत येऊ शकते, तर चीनमध्ये महागाई हळूहळू कमी पातळीवरून वाढण्याची अपेक्षा आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




## पंढरपूर सिंहगड महाविद्यालयातील शिबिरात १५० जणांचे रक्तदान

**पंढरपूर, दि.२ फेब्रुवारी-**

एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर येथे रक्तदान शिबीर यशस्वीरित्या पार पडले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, रोटरी क्लब पंढरपूर, रोटरॅक्ट क्लब पंढरपूर व राष्ट्रीय सेवा योजना, सिंहगड महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रेवनील ब्लड बँक, सांगोला यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. वैभव सादिगले, सिंहगड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ. एस. जी. कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत देशमुख व प्रा. सुमित इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रा.चंद्रकांत देशमुख, प्रा. सुमित इंगोले, प्रा. सिद्धेश्वर गंगोंडा, प्रा. अर्जुन मासाळ, प्रा.अजित करांडे, प्रा. गुरुराज इनामदार यांच्यासह रोटरॅक्ट क्लबचे विद्यार्थी अध्यक्ष ईश्वरी ताटे, सचिव प्रणव हेंबाडे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अविराज साळुंखे, बिलाल शेख, प्रविण नागटिळक, प्रतिक फुंडे, रोहन वागज, रणजित टकले, आदित्य भोसले, स्नेहा कदम, प्रणव वणवे, वैभव व्यवहारे, प्रणव जाधव, ओम ताठे, वैष्णवी देवकर, राज नागणे, काकासो पवार यांनी परिश्रम घेतले. शिबिरामध्ये १५० हून अधिक विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

## कर्मवीर विद्यालयातील शिबिरात १२३ जणांचे रक्तदान

**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कर्मवीर विद्यालय, चारे येथे समाजसेवक कर्मवीर डॉ.  डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून तब्बल १२३ रक्तदात्यांनी रक्तदान करुन जयंतीला मानवंदना दिली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी भगवंत ब्लड बँक, बार्शी व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. रक्तदान प्रक्रियेदरम्यान सर्व आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात



आल्या. प्रत्येक रक्तदात्यांना प्रमाणपत्र, अल्पोपहार व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य चव्हाण व आयोजक समिती यांनी या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि राष्ट्रप्रेम वृद्धिंगत होत असल्याचे नमूद केले.



## ब्रह्मदेवदादा माने महाविद्यालयात बारावी विज्ञान विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

ब्रह्मदेवदादा माने कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेच्या सचिवा जयश्री माने यांनी भूषविले. या कार्यक्रमासाठी बीएमआयटी प्रथम वर्ष विभाग प्रमुख प्रा. ए. ए. भोपळे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शाविली.  स्व. ब्रह्मदेवदादा माने यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, मनोगत व आठवणींना उजाळा देणारी भाषणे सादर केली. सचिवा जयश्री माने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनात ध्येय ठरवून सातत्याने प्रयत्न करण्याचा सल्ला दिला. यावेळी गुणवंत व उपक्रम शील विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम ासाठी संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, संकुल संचालक प्रा. आर. वाय. माने, प्राचार्य प्रतिभा माने यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. आवताडे, प्रा. घाळे, प्रा.रायलीवाल, प्रा. गावडे, प्रा. सय्यद व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## बासलेगावात गुरुवारी जय हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठापना

**अक्कलकोट, दि. २ फेब्रुवारी-**

लोकमंगल विहार बासलेगाव रोड, अक्कलकोट येथे जय हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठापना, कळसारोहन सोहळा व होमहवन यांसह विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती श्री वटवृक्ष हनुमान मंदिर पंच कमिटीच्या वतीने देण्यात आले आहे. गुरुवार ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता मूर्ती कलश व कलशकुंभ मिरवणूक, शुक्रवार ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मूर्ती प्राणप्रतिष्ठापना, कळसा रोहन व होमहवन श्री.ष.ब्र. डॉ. राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी, म.नी. प्र बसवलिंग महास्वामीजी, प. पु. श्री मोहन पुजारी महाराज, प.पू.श्री. अण्णा पुजारी महाराज, श्री.वे.मू. रुद्रया स्वामी यांच्या हस्ते धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेनजयराजे विजयसिंहराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिराचे अध्यक्ष महेश इंगळे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, विलास कोरे, एजाज मुतवली, सुनील गोरे, पोलीस निरीक्षक दीपक भिताडे, लोकमान्य उद्योग समूहाचे अध्यक्ष सिद्धाराम टाके, इंजि. महेश शेडम यांच्यासह सर्व नूतन नगरसेवक व नगरसेविका यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. धार्मिक कार्यक्रमानंतर दुपारी १२ ते ३ पर्यंत महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री वटवृक्ष हनुमान मंदिर पंच कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# बार्शी नगरपरिषदेच्या विषय समित्यांवर भाजपाचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ फेब्रुवारी-**



बार्शी नगरपरिषदेच्या विशेष सभेत विविध विषय समित्यांचे सदस्य व सभापती निवडीची प्रक्रिया शांततेत व बिनविरोध पार पडली. या सर्व समित्यांवर भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व राहिले असून, सर्व समित्यांच्या सभापतीपदी भाजपच्या नगरसेवकांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मुख्याधिकारी तथा पीठासन अधिकारी तैमूर मुलाणी यांच्या अध्यक्षतेखाली ही विशेष सभा पार पडली. सभेच्या सुरुवातीला विमान अपघातात दुःखद निधन झालेले महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नगरपरिषदेत एकूण सहा विषय समित्या असून प्रत्येक समितीत १२ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपनगराध्यक्ष हे नियोजन व विकास समितीचे पदसिद्ध सभापती असतात. त्यानुसार उपनगराध्यक्ष रोहित पाटील यांच्या अध्यक्षतेखालील नियोजन व विकास समितीसाठी ११ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. उर्वरित सर्व समित्यांमध्ये १२ सदस्यांचा समावेश आहे. प्रत्येक समितीत सत्ताधारी भाजप-शिवसेना (शिंदे गट) युतीचे ७ तर विरोधी शिवसेनेचे (उबाठा) ५ सदस्य घेण्यात आले आहेत..

नगराध्यक्षा तेजस्विनी कथले या स्थायी समितीच्या पदसिद्ध सभापती असून, स्थायी समितीत भाजपचे विजय राऊत, शिंदे सेनेचे संदेश काकडे व विरोधी उद्धव सेनेचे कृष्णराज बारबोले यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच सर्व विषय समित्यांचे सभापती हे स्थायी समितीचे पदसिद्ध सदस्य असतात. भाजप गटनेते विजय चव्हाण, शिवसेनेचे (शिंदे गट) राजू घोंगाणे व शिवसेना (उबाठा) चे नागेश अक्कलकोटे यांनी आपल्या-आपल्या पक्षाच्या सदस्यांची नावे मुख्याधिकाऱ्यांकडे सादर केल्यानंतर अधिकृतरित्या या निवडी जाहीर करण्यात आल्या. नवनियुक्त सभापती व सदस्यांचे माजी आमदार राजेंद्र राऊत तसेच नगराध्यक्ष तेजस्विनी कथले यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

विषय समित्यांचे सभापती व सदस्य पुढीलप्रमाणे-

**स्थायी समिती** सभापती (पदसिद्ध) तेजस्विनी कथले, सदस्य विजय राऊत, संदेश काकडे, कृष्णराज बारबोले व सर्व विषय समित्यांचे सभापती. सार्वजनिक बांधकाम समिती सभापती दीपक राऊत, सदस्य प्रकाश माने, स्वप्नील उघडे, कांचन मोहिते, विजय चव्हाण, राजू घोंगाणे, भागिरथी त्रिंबके, नागेश अक्कलकोटे, राहुल कोंढारे, मुजम्मील पठाण, नवनाथ माळगे, सरस्वती भानवसे.

**शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती** सभापतीः भारत पवार, सदस्य- कांचन मोहिते, फरजाना जलसे, उर्मिला मोहिते, सुजाता मस्के, राजू घोंगाणे, शमा रिकीबे, अनिकेत कारंडे, सायरा मुल्ला, आकाश राऊत, ज्योतिर्लिंग कसबे, अमोल मांगडे.

**स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समिती** सभापती अमोल चव्हाण, सदस्य स्वप्नील उघडे, अर्चना बारसकर, अनुरथ वाणी, फरजाना जलसे, शमा रिकीबे, मिरा नाळे, नवनाथ माळगे, विद्या बंगाळे, रागिणी पाचपुते, चांगुणा जाधव, भागवत मांगडे.

**पाणीपुरवठा व जलनिःसारण समिती** सभापती संतोष बारंगुळे, सदस्य उर्मिला म ोहिते, चंद्रकला कांबळे, विजय चव्हाण, प्रकाश माने, मिरा नाळे, बाळासाहेब पवार, वसंत देवकर, शिला साळुंके, महेदिमियां लांडगे, सरस्वती भानवसे.

**नियोजन व विकास समिती** सभापती रोहित पाटील (उपनगराध्यक्ष), सदस्य लक्ष्मीबाई गव्हाणे, चंद्रकला कांबळे, अनुरथ वाणी, अर्चना बारसकर, राजू घोंगाणे, भागिरथी त्रिंबके, राहुल कोंढारे, महेदिमियां लांडगे, विद्या बंगाळे, मुजम्मील पठाण, अनिकेत कारंडे.

**महिला व बालकल्याण समिती**

सभापती अबिदा तांबोळी, उपसभापती : सुनिता ढोणे, सदस्य उर्मिला मोहिते, सुजाता मस्के, लक्ष्मीबाई गव्हाणे, मिरा नाळे, भागिरथी त्रिंबके, शांता नायकोजी, चांगुणा जाधव, गोदावरी शिंदे, सायरा मुल्ला, रागिणी पाचपुते यांची निवड करण्यात आली आहे.

## पोलिस निरीक्षक बोरीगिड्डे यांचा सत्कार

### पाठखळ खून प्रकरण कौशल्यपूर्ण तपासाचे फलित

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २ फेब्रुवारी-**

पाठखळ येथे प्रेम प्रकरण लपविण्यासाठी एका वृध्द महिलेचा गळा आवळून खून करुन कडब्याच्या गंजीत जाळण्याची घटना घडली. या घटनेचा तपास कौशल्यपुर्ण लावल्याने मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांचा दि.२६ रोजी प्रजासत्ताक दिनी सोलापूर येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.



पाठखळ येथे विवाहित भावजय व अविवाहित दीर यांच्यामध्ये प्रेम संबंध होते. हे प्रेमसंबंध कोणालाही माहित होवू नये यासाठी चक्क गोपाळपूर मधील एका वृध्द महिलेस तुझ्या मुलाला शोधून देतो अशा भूलथापा मारुन पाठखळ येथे आणून तिचा गळा आवळून खून केला व तिला कडब्याच्या गंजीत पेटवून दिले. तसेच प्रेयसीने आत्महत्या केल्याचा प्रियकराने बनाव केला. ही घटना संपूर्ण राज्यभर गाजली. सुरुवातीला प्रेयसीच्या वडिलाने तिने आत्महत्या केल्याची पोलीसात तक्रार दाखल केली. मात्र पोलीसांनी सुतावरुन स्वर्ग गाठत या गुन्ह्याचे सत्य उघड केल्यानंतर सगळ्यांनीच कपाळाला हात लावला. जे तपासात उघड झाले ती घटना ऐकून संपूर्ण जिल्ह्यातील तमाम नागरिक थक्क झाले. पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी घटनास्थळाला भेट देवून तपासाची चक्रे वेगाने फिरविल्यानंतर प्रियकर व प्रेयसी या दोघांच्याही हातात बेड्या ठोकल्या गेल्या. या कौशल्यपुर्ण तापासाबद्दल पो.नि.बोरीगिड्डे, पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस आयुक्त एम. राजेशकुमार आदी उपस्थित होते. पो. नि.बोरीगिड्डे हे शिरोळ पोलीस स्टेशनला असताना त्यांना राज्यस्तरीय पुरस्कारानेही गौरविण्यात आले होते. ते मुळचे कवठेम हांकाळचे असून सन २००५ मध्ये ते पोलीस खात्यात हजर झाले असून आत्तापर्यंत २० वर्षे त्यांची सेवा झाली आहे.

## कत्तलीसाठीच्या गाईंची सुटका; १२ जनावरे गो-शाळेत दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २ फेब्रुवारी-**

वेळापूर येथून एका आयशर वाहनातून जनावरे अवैध कत्तली करिता घेऊन जात असल्याची माहिती मिळाल्याने वेळापूर पोलिसांनी पोलीस पथक नेमून वेळापूर ते सांगोला जाणाऱ्या रोडवर हॉटेल नंदनी जवळ रोडवर सापळा रचून पहाटे ३:३० वाजण्याच्या सुमारास आयशर वाहन नंबर एम एच ०३ डी व्ही ६२ २२ हे वाहन थांबवून तपासणी केली असता वाहनाच्या पाठीमागील हौद्यात २ जर्सी ८ पांढरी देशी खिलारी बैल, २ जर्सी काळी बैल व आयशर वाहन असे एकूण ७ लाख ६० हजार रुपये किंमतीच्या गाईंना व बैलांना वेदना होईल अशा दोरीने बांधून हालचाल करता येणार नाही अशा स्थितीत वाहनांमध्ये बांधल्याचे दिसून आले. जर्सी गाईंना व बैलांना कोणत्याही चारा पाण्याची सोय दिसली नाही. सदरची जनावरे जर्सी गाई व बैल तसेच आयशर वाहन ताब्यात घेऊन त्यामधील १२ जनावरे सुरक्षित गोशाळेमध्ये नेऊन सोडण्यात आली आहेत. वाहनाचे चालक मोहम्मद युसुफ गफूर मोमीन राहणार गौठी शिवाजीनगर मालकुर लिंग रोड मुंबई व वाहनाचे मालक व मालाचे मालक यांच्याविरुद्ध वेळापूर पोलीस स्टेशनला पशु संरक्षण अधिनियम व प्राण्याचा छळ प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी, पो. कॉ.विजयकुमार देशपांडे, पोलीस ना.लिंगडे, पोलीस कॉन्स्टेबल तानाजी पांढरे, पोलीस कॉन्स्टेबल हिंगणगावकर यांनी केली. याचा अधिक तपास देशपांडे हे करीत आहेत.



## सोलापूर लेडीज टेलर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी नरेश कोलप्याक यांची निवड

**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

सोलापूर लेडिज टेलर्स असोसिएनशच्या अध्यक्षपदी नरेश कोलप्याक यांची नियुक्ती करण्यात आली. ही निवड  उदयन इरकुला, अशोक बाहेती, राजू कामूर्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. सोलापूर लेडिज टेलर्स असोसिएशनची बैठक दत्त नगर येथील दत्त मंदिरम ध्ये दि. १ फेब्रुवारी रोजी पार पडली. यावेळी लेडिज असोसिएशनच्या विविध विषयावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर २०२६ सालासाठी पदाधिकारी निवड करण्यात आली. या बैठकीस महिलावर्ग उपस्थित होते.  इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे- अध्यक्ष नरेश कोलप्याक, उपाध्यक्ष विनायक जिंदम, सचिव पुंडलिक पगडीमल, सहसचिव अरूण म्याकम, खजिनदार सुंदरम म्याकल, सहखजिनदार अशोक बाहेती, सल्लागार उदयन इरकुला, राजू कामुर्ती.



**सोलापूर :** पंतजली योग समिती सिद्धेश्वर शाखेच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त सोमवारी रामप्रहरी तलाव परिसरात सुधा अळळीमोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत लोककल्याणार्थ होमहवन याग करण्यात आले. यावेळी स्वाती राऊत, संगीता जाधव, मल्लिनाथ उंबरजे,  ताटीपामुल आदी साधकांची उपस्थिती होती.



**सोलापूर :** लेणं अनुभवाचं  या पुस्तक प्रकाशन प्रसंगी उपस्थित डावीकडून डॉ. सुवर्णा गुंड, डॉ.श्रुती वडगबाळकर, वैशाली सुरवसे, स्नेहा अवसरीकर, जे. जे. कुलकर्णी, वंदना कुलकर्णी, शोभा बोल्ली, डॉ. नरेंद्र काटीकर.

## संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ फेब्रुवारी-**

संपूर्ण भारतात संत शिरोम णी गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आली. याच पार्श्वभूमीवर बार्शी शहरात गुरु रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त रविवार दि. १ फेब्रुवारी रोजी मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



सदर रॅलीची सुरुवात भगवंत मैदान, बार्शी येथून होऊन संत हराळ्या समाज मंदिर, एसटी स्टँड चौक, संतरोहिदासनगर, नगरपालिका चौक, संत रोहिदास मठ, कसबा पेठ, व्हनकळस प्लॉट, अलीपुर रोड, संत ज्ञानेश्वर मठ या मार्गाने यशस्वीरित्या संपन्न झाली. रॅलीमध्ये युवक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

गुरु रविदास महाराज यांच्या विचारांचा प्रसार व समाजात समता, बंधुता आणि एकतेचा संदेश पोहोचवण्याचा उद्देश या रॅलीम ागे होता. कार्यक्रमाचे आयोजन बार्शी तालुका व शहर चर्मकार समाजाच्यावतीने करण्यात आले होते.

## टिशू कल्चरद्वारे पिकांचे भरघोस उत्पादन : चिकाळे

### शंकरराव मोहिते कॉलेजात टिशू कल्चर कौशल्य कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज,दि.२ फेब्रुवारी-**

टिशू कल्चरचा वापर करून केळी, ऊस, खजूर, बांबू, जरेबेरा या पिकांची उत्पादने घेऊन भरपूर नफा कमवता येतो, असे विचार येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाम ध्ये आयोजित कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून फिरोज चिकाळे यांनी व्यक्त केले.



वनस्पतीशास्त्र विभाग व ॲग्रो केमिकल व पेस्ट मॅनेजमेंट विभाग यांचे संयुक्त विद्यमाने 'वनस्पती उती संवर्धनातील प्रगती आणि संधी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षपदी प्राचार्य डॉ शिवप्रसाद टिळेकर होते. सर्व विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधीचा फायदा घेऊन जास्तीत जास्त कौशल्य विकसित करावीत व स्वतःचा उद्योग निम ाण करणेही आवश्यक असल्याचे विचार त्यांनी व्यक्त केले. चीकाळे यांनी वनस्पती उती संवर्धनातील मूलभूत संकल्पना, उती संवर्धनाचे टप्पे, त्याची प्रक्रिया आणि प्रकार यावर व्याख्यान दिले. तसेच त्यांनी प्रत्यक्ष कार्य कौशल्य प्रशिक्षण प्रत्येक विद्यार्थ्याला दिले. यामध्ये त्यांनी त्यांच्या मॉन्टी प्लांट इंडिया या उद्योगाची ही माहिती विद्यार्थ्यांना दिली आणि विद्यार्थ्यांनी स्वतःचा उद्योग करावा यासाठी प्रोत्साहित केले. वनस्पती शास्त्र प्रमुख डॉ. सविता सातपुते यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. दमयंती कांबळे यांनी आभार मानले. कु.मधुलिका नवघरे यांनी सूत्रसंचालन केले. वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. विक्रम कुंभार, डॉ. सुजित वाघ, प्रा. अनंत साठे, प्रा. दीपराज माने देशमुख आणि ॲग्रो केमिकल्स आणि पेस्ट मॅनेजमेंट विभागातील प्रा रोहित कुंभार, प्रा प्रमोद घोगरे, प्रा नंदकुमार गायकवाड, प्रा स्नेहल पांढरे, प्रा.माने, प्रा.सूर्या यादव यांनी परिश्रम घेतले.

## अक्कलकोट शहरात अनधिकृत होर्डिंग्स व डिजिटल फ्लेक्सवर कारवाईचे आदेश

### नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ फेब्रुवारी-**

अक्कलकोट नगरपरिषद हद्दीतील सर्व अनधिकृत होर्डिंग्स व डिजिटल फ्लेक्स तात्काळ काढून टाकावेत, तसेच भविष्यात कोणत्याही विनापरवानगी जाहिरात फलकांना परवानगी देऊ नये, अशी मागणी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

अक्कलकोट ही 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र नगरपरिषद असून शहराची लोकसंख्या सुमारे ५० हजार आहे. दररोज २० ते २५ हजार भाविक अक्कलकोटमध्ये दर्शनासाठी येतात. मात्र शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत होर्डिंग्स व डिजिटल फ्लेक्स लावण्यात आल्याने शहराच्या सौंदर्यावर परिणाम होत असून, न्यायालयाच्या PIL १५५/२०११ मधील निर्देशांचेही उल्लंघन होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनधिकृत जाहिरात फलकांमुळे शहराचे सौंदर्य धोक्यात येत असून वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि सौंदर्यहानी होत असल्याची बाबही यावेळी निदर्शनास आणून देण्यात आली. त्यामुळे शहरात सध्या लावण्यात आलेले सर्व अनधिकृत होर्डिंग्स व डिजिटल फ्लेक्स तात्काळ काढून टाकावेत, तसेच यापुढे कोणत्याही विनापरवानगी जाहिरातींना परवानगी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ज्या नागरिकांना, व्यापाऱ्यांना किंवा संस्थांना शहरात जाहिरात फलक लावण्याची आवश्यकता आहे, त्यांना नियमानुसार योग्य शुल्क आकारून परवानगी देण्यात यावी, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांच्या या मागणीमुळे अक्कलकोट शहरातील अनधिकृत जाहिरातींवर कारवाई होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# २०० पाकिस्तानी सैनिक ठार

## • बलुचिस्तान लिबरेशन आर्मीचा दणका • महिला आत्मघातींची महत्त्वपूर्ण भूमिका

♦ **इस्लामाबाद, २ फेब्रुवारी**

बलुचिस्तानातील बलुचिस्तान लिबरेशन आर्मीला ऑपरेशन हिरोफ फेज-२ सुरू करून ४० तासांपेक्षा जास्त अवधी झाला असून, आतापर्यंत पाकिस्तानी लष्कर आणि फ्रन्टियर कोअरचे २०० पेक्षा जास्त सैनिकांना ठार करण्यात आल्याचा दावा बीएलएने केला आहे. या मोहिमेत महिला आत्मघातींनी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडल्याचा दावा बीएलएने केला. मात्र, पाकिस्तानी सरकारने ठार झालेल्या सैनिकांचा आकडा कमी असल्याचे सांगितले.



बीएलएने सुरू केलेल्या या मोहिमेत पाकिस्तानी सुरक्षा दलाचे मोठे नुकसान झाले आहे. या मोहिमेत पाकिस्तानीन लष्कर आणि फ्रन्टियर कोअरचे २०० पेक्षा जास्त सैनिक ठार झाले. आम्ही १७ जवानांना पकडले आहे, असा दावा बीएलएचा प्रवक्ता जीयंद बलोच याने केला. बीएलएने करान, मस्तुंग, तुंप आणि असनीसारख्या परिसरांत मोहीम पूर्ण केली आहे. या व्यतिरिक्त क्वेटा आणि नोश्कीच्या काही भागांत पाकिस्तानी लष्कराला मागे लोटले असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, त्यांनी केलेल्या दाव्याला दुजोरा मिळू शकलेला नाही.

बीएलएच्या हल्ल्यात १७ सैनिक आणि ३१ सामान्य नागरिक ठार झाल्याचे बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांनी सांगितले. दुसरीकडे, शुक्रवारी ४१ आणि शनिवारी ९२ बलूच अतिरेक्यांना ठार करण्यात आले, असा दावा पाकिस्तानी लष्कराने केला.

सर्वांत आश्चर्याची बाब म्हणजे, बीएलएच्या या मोहिमेत महिला आत्मघातीही मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. यातील आसिफा मेंगलने पाकिस्तानी गुप्तचर संस्था इंटर सर्व्हिस इंटेलिजन्सच्या नोश्की येथील मुख्यालयाला लक्ष्य करीत आत्मघाती हल्ला केला. ती मजीद ब्रिगेडची सदस्य होती. २०२३ मध्ये ती मजीद ब्रिगेडमध्ये सहभागी झाली होती. ग्वादर आघाडीवर हवा बलोच नावाची महिला आत्मघाती ठार झाली आहे. या हल्ल्यांमध्ये किमान दोन महिलांचा समावेश होता, अशी कबुली पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी दिली. (वृत्तसंस्था)

### अभियानात बीएलएचेही नुकसान

» या अभियानात आमचेही नुकसान झाले असल्याची कबुली बीएलएने दिली. आमचे एकूण १८ सदस्य ठार झाले. त्यात मजीद ब्रिगेडच्या ११ आत्मघाती, फतेह स्क्वाडचे चार आणि एसटीओएस युनिटते तीन सदस्यांचा समावेश आहे. आम्ही नोश्कीचा उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्ताला ताब्यात घेतले होते. मात्र, मानवीय आधारावर या दोघांनाही सोडले, असा दावा बीएलएने केला. ■

# राष्ट्रवादी एकीकरण चर्चा वेगळ्याच वाटेवर...




एका कर्तृत्ववान नेत्याच्या अपघाती मृत्यूनंतर देश आणि राज्यातील महत्वाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची वाटचाल सध्या संकटग्रस्त मार्गावरुन सुरु असल्याचे चित्र आहे. राजकीय धुरंधर नेतृत्व वयोवृध्द होते आणि धडाडीचे खमके नेतृत्व अकाली मृत्यू पावते; तेंव्हा एखाद्या बलाढ्य राजकीय पक्षाला अनेक संकटांना तोड द्यावे लागत असल्याचे उभा महाराष्ट्र पाहत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूने अजित राष्ट्रवादीची सूत्रे यंदा पाहिल्यांदाच त्यांच्याच पक्षातील पण पवार कुटुंबाबाहेरील नेत्यांच्या हाती गेल्याने राष्ट्रवादीचे शेलारमामा पवारसाहेब देखील हतबल असल्याचे जाणवते आहे.



महापालिका निवडणुकीतील प्रचारा दरम्यानच्या राजकीय वातावरणाचा परिणाम म्हणजे कै. अजित पवारांनी राष्ट्रवादी एकीकरणाचे सूतोवाच अनेकदा केले. इतकेच काय तर पत्रकारांने विचारले दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का, त्यावर अजित पवार म्हणाले होते, तुझ्या तोंडात साखर पडो. शरद राष्ट्रवादीच्या मते दोन्ही राष्ट्रवादीचे विलिनीकरण होवून त्याची एकत्र घोषणा १२ फब्रुवारीला करण्याचे अजितदादांसोबतच्या बैठकीत निश्चित झाले होते. परंतु अजित राष्ट्रवादीचे नेते मात्र दोन्ही राष्ट्रवादी विलिनीकरणाबाबत उत्सुक नसल्याचे त्यांच्या वक्तव्यांवरून स्पष्ट होते आहे. एवढेच काय तर अजितदादांच्या मृत्यूनंतर अवघ्या तिसऱ्या दिवसानंतर अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा अजित पवार यांना उपमुख्यमंत्रीपदाची शपथ देवून अजित राष्ट्रवादीच्या नेत्यांनी चाणाक्ष राजकीय खेळी केली. विशेष म्हणजे, सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीबाबत शरद पवारदेखील अनभिज्ञ होते असे त्यांनी स्वतःच सांगितले. पवार कुटुंब शोकात असताना अजित राष्ट्रवादीच्या काही वरिष्ठ नेत्यांनी सुनेत्रा पवार यांना दादांचा वारस ठरवून उपमुख्यमंत्रीपदाची शपथही देवून टाकली.

एकेकाळी शरद पवारांच्याच राजकीय मुशीत तयार झालेले त्यांचेच नेते पवारांनाच राजकीय धोबीपछाड देताना दिसत आहेत. शरद राष्ट्रवादीचे अनेक नेते दोन्ही राष्ट्रवादीचे एकीकरण होणार होते यावर ठाम असून त्यांच्या प्रदेशाध्यक्षांनी तर चक्क कै. अजितदादांची शपथ घेवूनच जाहीरपणे सांगितले, दोन्ही राष्ट्रवादी एकीकरणाचा निर्णय अजितदादा आणि शरद पवारांचाच होता. शरद राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आता सांगत आहेत की, शरद राष्ट्रवादीला सोबत यायचे असेल तर त्यांनी एनडीएमध्ये येण्याबाबतची भूमिका स्पष्ट करावी. ज्येष्ठ नेते छगन भुजबळ म्हणत आहेत की, शरद राष्ट्रवादीला सोबत घेण्याबाबत भाजपाला विचारावे लागेल. तर आपण अजित राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष झालेलो नाही, हे सांगण्यातच प्रफ्फुल पटेल यांची दमछाक होताना दिसत आहे. एकूणच दोन्ही राष्ट्रवादीची सध्याची राजकीय परिस्थिती पाहता राष्ट्रवादी एकीकरणाची चर्चा वेगळ्याच वाटेवर जात असल्याचे चित्र आहे. दोन्ही राष्ट्रवादी एक झाल्यास याचा राजकीय त्रास कोणाला होणार आहे आणि कोणाच्या हातातून सत्तेची दोरी निसटणार याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, एक नवीन अशीही माहिती समोर आली आहे की, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र होणार होत्या आणि एनडीएमध्ये सामीलदेखील होणार होत्या. खा.सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रीपद तर शरद राष्ट्रवादीच्या एका बड्या नेत्याला राज्यात मंत्रीपद, आ.रोहित पवार यांना राज्य मंत्रीपद आणि खा.अमोल कोल्हे यांना प्रदेशाध्यक्षपद दिले जाणार होते. काहीकाळ हे जर सत्य समजले तर अजित राष्ट्रवादीची सूत्रे सध्या ज्यांच्या हातात आहेत असे तटकरे, पटेल, भुजबळ यांना राष्ट्रवादी एकीकरणानंतर काही मिळणार होते की नाही? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. राष्ट्रवादीचे एकीकरण, एनडीएमध्ये सहभाग आणि कोणाकडे काय जबाबदारी याची चर्चा असताना या सर्वातून भाजपाला दूर ठेवता येणार नाही हे नक्की होय. कारण एनडीएमध्ये कोणाला घ्यायचे आणि मंत्रीपदावर कोणाला संधी द्यायची याचे सर्व अधिकार भाजपाचे केंद्र व राज्यातील नेत्यांना आहेत. त्यामुळे शरद राष्ट्रवादीला अगोदर आपली भूमिका स्पष्ट करावी लागेल. अजित राष्ट्रवादीला एनडीएसोबतच रहायचे असल्याचे तटकरे यांनी अगोदरच जाहीर केले आहे.

दरम्यान, अजितदादांचा मृत्यू अपघाती की घातपात? या चर्चेला पुन्हा हवा मिळाली आहे. अजित राष्ट्रवादीचेच काही नेते अपघात नसून घातपात असल्याचे सांगत प्रश्न उपस्थित करीत आहेत. हा धागा पकडून चर्चेत उडी घेणार नाहीत ते संजय राऊत कसले. खा.राऊतांनी तर राज्यसभेतही हा अपघात नसून घातपात असल्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. ब्लॅकबॉक्स, चौकशीनंतर हे सर्व स्पष्ट होईल. पण आता चर्चेला उधाण आले आहे. दोन्ही राष्ट्रवादीचे विलिनीकरण, शरद राष्ट्रवादी एनडीएमध्ये जाणार का? शरद पवारांना भाजपासोबत जाणे मान्य असणार का? सुप्रिया सुळे यांची भूमिका काय राहणार? उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांची याबाबत नेमकी काय भूमिका असणार? हे पाहणे औत्सुक्याचे असणार आहे. कै.अजितदादांच्या १३ व्या दिवसाच्या विधीनंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या संदर्भातील सर्वच चित्र स्पष्ट होईल, हे मात्र नक्की.

# तिबेटी धर्मगुरू दलाई लामांना ग्रॅमी पुरस्कार

♦ **धर्मशाळा, २ फेब्रुवारी**

तिबेटी आध्यात्मिक धर्मगुरू दलाई लामा यांना प्रतिष्ठित ग्रॅमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना हा सन्मान बेस्ट ऑडिओबुक नरेशन श्रेणीमध्ये त्यांच्या 'मेडिटेशन्स: द रिफ्लेक्शन्स ऑफ हिज होलीनेस द दलाई लामा' या ऑडिओ बुकसाठी प्रदान करण्यात आला आहे.



हा सन्मान स्वीकारताना दलाई लामा म्हणाले की, हा पुरस्कार त्यांचा वैयक्तिक सन्मान नसून, जगातील शांतता आणि करुणेच्या संदेशाचा सन्मान आहे. त्यांनी तो कृतज्ञता आणि नम्रतेने स्वीकारला, आणि त्याला कोणतीही वैयक्तिक उपलब्धी मानले नाही.

दलाई लामा यांनी जोर देऊन सांगितले की, ही आपली सामायिक जागतिक जबाबदारीची ओळख आहे. त्यांनी सांगितले की, जगातील सर्व आठ अब्ज लोकांच्या सामूहिक कल्याणासाठी शांतता, करुणा, पर्यावरणाची काळजी आणि मानवतेच्या एकतेची समज असणे अत्यंत आवश्यक आहे. (वृत्तसंस्था)

### जगाला शांततेच्या संदेशाची गरज

» **ग्रॅमी पुरस्कारांना संगीत आणि रेकॉर्डिंगच्या जगाचा ऑस्कर मानले जाते. एका आध्यात्मिक गुरुला या व्यासपीठावर सन्मान मिळणे हे दर्शवते की आजच्या जगात मानसिक शांती आणि करुणेच्या संदेशाचे किती अधिक महत्त्व आहे.** ■

# विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात अजित पवार यांचे स्मारक उभारणार

♦ **बारामती, २ फेब्रुवारी**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्मारक पवार कुटुंबाने स्थापन केलेल्या बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या आवारात उभारले जाणार आहे, अशी माहिती त्यांच्या एका निकटवर्तीयाने दिली.



२८ जानेवारी रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती विमानतळाजवळील धावपट्टीजवळ झालेल्या विमान अपघातात अजित पवार व इतर चार जणांचा मृत्यू झाला होता. विद्या प्रतिष्ठानच्या आवारात ज्या ठिकाणी अजित पवार यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले होते, त्याच ठिकाणी त्यांचे स्मारक उभारण्याची योजना आहे, असे अजित पवार यांचे निकटवर्तीय व पवार कुटुंबाचे विश्वासू किरण गुजर यांनी सांगितले. रविवारीमुंबईला जाण्यापूर्वी शरद पवार हे प्रतिभा पवार यांच्यासोबत अंत्यसंस्काराच्या ठिकाणी आले होते व त्यांनी मला व विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्तांना अजित दादांच्या स्मारकासाठी आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले, असे गुजर यांनी सांगितले. येत्या काही दिवसांत स्मारकाची रचना व स्वरूप निश्चित करण्यासाठी विश्वस्तांशी चर्चा करू, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या आदेशावर भारताची भूमिका ठाम




♦ **हेग, २ फेब्रुवारी**

हेग येथील आंतरराष्ट्रीय लवाद सिंधू जल काराराच्या चौकटीअंतर्गत नवीन सुनावण्या आणि दस्तावेजांचे आदेश देत आहे. मात्र, आम्ही या कार्यवाहीची कायदेशीरता मान्य करीत नाही आणि त्यात सहभागी होणार नाही, अशी ठाम भूमिका भारताने घेतली आहे.

सिंधू जल कराराच्या अंतर्गत स्थापन लवादाने मागील आठवड्या दिलेल्या आदेशामुळे हा नवीन वाद उफाळून आला आहे. भारतीय जलविद्युत प्रकल्पाचे 'पॉण्डेज लॉगबुक' सादर करण्याचा आदेश या लवादाने देत हा गुणवत्तेवरील दुसरा टप्पा असल्याचे म्हटले आहे. या मुद्यावर पुढील सुनावणी लवकरच होणार असून, भारताने या मुद्यावर कोणतेही प्रति-स्मरपणपत्रे दिलेली नाहीत किंवा सहभागाबाबत कोणताही संकेत दिला नाही, असे लवादाने म्हटले आहे.

हा लवाद बेकायदेशीर आहे. प्रशासकीय समिती स्वतंत्र तज्ज्ञाव्यतिरिक्त समांतर कार्यवाही करीत आहे. आम्ही प्रशासकीय समितीची कायदेशीरता मान्य करीत नसल्याने आम्ही त्यांच्या कोणत्याही पत्रांना प्रतिसाद देत नाही, असे सूत्रांनी सांगितले. केवळ इतकेच नव्हे तर सिंधू जल करार स्थगित असल्याने भारतावर प्रतिसाद देण्याचे कोणतेही बंधन नाही. आम्हाला यात गुंतवून ठेवून आम्ही अजूनही सहभागी आहोत, हे दाखवण्यासाठी पाकिस्तानची ही एक चाल आहे, असे भारताने स्पष्ट केले आहे.

या अभूतपूर्व संघर्षाची पृष्ठभूमी २३ एप्रिल २०२५ रोजी नवी दिल्लीने घेतलेल्या निर्णयात आहे. हा निर्णय पहलगाममध्ये पाकिस्तान संबंधित दहशतवाद्यांनी २६ नागरिकांची हत्या केल्याच्या दुसऱ्या दिवशी घेण्यात आला होता. भारताने सिंधू जल करारा औपचारिकपणे स्थगित केला होता आणि १९६० नंतर प्रथमच पाकिस्तानकडून राज्य धोरणाचे साधन म्हणून दहशतवादाच्या सततच्या वापराशी जल सहकार्याला स्पष्ट जोडले. (वृत्तसंस्था)

### भारताच्या भूमिकेनंतर पाकिस्तान गोंधळात

» ही कारवाई 'ऑपरेशन सिंदूर'च्या बरोबरीने करण्यात आली आणि भारताच्या पाकिस्तान धोरणात एक निर्णायक बदल घडवून आणणारी ठरली. शत्रुत्वाच्या वातावरणात सहकार्य सुरू राहू शकत नाहीत, असे भारताने स्पष्ट केले होते. या मुद्यावर इस्लामाबादची प्रतिक्रिया अत्यंत गोंधळलेली होती. त्यानंतरच्या नऊ महिन्यांत पाकिस्तानने राजदूतांना बोलावले, जगातील विविध राजधान्यांमध्ये शिष्टमंडळे पाठवली, संयुक्त राष्ट्रसंघाला पत्र पाठवले, दहापेक्षा जास्त कायदेशीर कारवाया सुरू केल्या आणि अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित केल्या. या सर्वांचा केंद्रबिंदू भारताने आपल्या सर्वांत संवेदनशील दुर्बलतेवर केलेला हल्ला होता. ■



सोलापूर : श्री सद्गुरु प्रभाकर महाराज पुण्यतिथीनिमित्त सोमवारी रात्री पावणे अकरा वाजता प्रभाकर महाराज मठात गेलालाचा कार्यक्रम मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला. याप्रसंगी श्री प्रभाकर महाराज की जय च्या घोषणा देत भक्तांनी मोठ्या उत्साहात गुलालाच्या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. (छायाचित्र : केवल तिवारी)

# अंत्यसंस्काराच्या वेळी ३० लाखांचे दागिने चोरी

♦ **बारामती, २ फेब्रुवारी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनानंतर झालेल्या अंत्यसंस्काराच्या वेळी चोरांनी हात साफ करीत जवळपास ३० लाखांच्या दागिन्यांची चोरी केली. २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झालेल्या अजित पवार यांच्यावर बारामतीतील विद्या प्रतिष्ठान मैदानावर राजकीय सन्मानाने अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी महाराष्ट्रातून लाखो नागरिक बारामतीत उपस्थित होते. ही प्रचंड गर्दी पाहून चोरांच्या टोळीने नागरिकांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्यांवर हात साफ केला. जवळपास १५ लोकांच्या गळ्यातील दागिने चोरीला गेले. चोरीला गेलेले दागिने अंदाजे २५ ते ३० लाख रुपयांचे आहेत. काही संशयित चोरांना नागरिकांनी रंगेहाथ पकडले. (वृत्तसंस्था)

# ब्राह्मण समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळावे

## निवृत्त आयएएस नियाज खान यांचे परखड मत

♦ **भोपाळ, २ फेब्रुवारी**

आपल्या देशात आरक्षण, या मुद्यावर नेहमीच चर्चा होत असते. विविध समाजांकडून अधूनमधून यासाठी मागण्याही होत असतात. आंदोलनेही केली जातात. आता, एक निवृत्त अधिकारी नियाज खान यांनी ब्राह्मण समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात भाष्य केले आहे. ब्राह्मण समाजाला सर्व योजनांमध्ये त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळायला हवे, असे नियाज खान यांनी म्हटले आहे.

ते मध्यप्रदेश कॅडरचे निवृत्त अधिकारी आहेत. ते आपली पुस्तके आणि स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. नियाज खान एक्सवर लिहिलेल्या आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, ब्राह्मण समाज हजारो वर्षांपासून सनातन धर्माचा रक्षक आहे. यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास आवश्यक आहे. त्यांना त्यांच्या लोकसंख्येप्रमाणे आरक्षण द्यायला हवे. त्यांना सर्व योजनांतही आरक्षण मिळायला हवे. जर ब्राह्मण समाज बलशाली झाला तर, देश बलशाली होईल. धर्म आणि अध्यात्माला बळकटी मिळेल. आरक्षण देण्यासंदर्भात गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. (वृत्तसंस्था)

### लोकांच्या संमिश्र प्रतिक्रिया

» नियाज खानच्या ट्विटवर समाज माध्यमांवर संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. काही लोक याला नकारात्मक म्हणत आहेत, तर काही सकारात्मक म्हणत आहेत. नियाज खान हे आपल्या विधानांमुळे नेहमीच चर्चेत असतात. त्यांनी यापूर्वीही अशी अनेक विधाने केली आहेत, ज्यांवर व्यापक चर्चा झाली. त्यांनी 'ब्राह्मण द ग्रेट' आणि 'वॉर ऑफ कलियुग'सारखी पुस्तकेही लिहिली आहेत. ■

# शेख हसीना यांना १० वर्षांची शिक्षा

**भ्रष्टाचाराच्या दोन प्रकरणांत दोषी**

♦ **ढाका, २ फेब्रुवारी**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना भ्रष्टाचाराच्या दोन वेगवेगळ्या प्रकरणांत १० वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. सरकारच्या एका निवासी योजनेतील भूमी अधिग्रहणातील भ्रष्टाचाराशी संबंधित ही दोन प्रकरणे आहेत. ढाक्यातील विशेष न्यायालयाचे विशेष न्यायाधीश रबीउल आलम यांनी सोमवारी हा निर्णय दिला. न्यायालयने दोन्ही प्रकरणांत शेख हसीना यांना प्रत्येकी पाच वर्षांची शिक्षा ठोठावली.



हे प्रकरण ढाक्यापासून पूर्बाचोल परिसरातील राजुक न्यू टाऊनशिप प्रकल्पाशी संबंधित आहे. येथे दोन १० काठाचे प्लॉटचे चुकीच्या पद्धतीने अधिग्रहण करण्यात आले. आरोपींनी आपल्या पदाचा दुरुपयोग करीत नियम मोडले आणि भूमीअधिग्रहण प्रक्रियेत हेराफेरी केली, असा आरोप सरकारी पक्षाने केला होता.

हा प्रकल्प राजधानी विकास प्राधिकरण म्हणजेच राजुकच्या अंतर्गत येते.

या प्रकरणात शेख हसीना यांच्यासोबतच त्यांच्या कुटुंबातील कित्येक सदस्यांना दोषी ठरवण्यात आले आहे. यातील तुलिप सिद्दिकीला चार वर्षांची, रदवान मुजीब सिद्दिकी आणि अजमीना सिद्दिकी यांना प्रत्येकी सात वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. आत्मसमर्पण केलेले राजुक सदस्य मोहम्मद खुर्शीद आलम यांना दोन वर्षांची शिक्षा झाली. सर्वच दोषींना प्रत्येकी एक लाख टकांचा दंड ठोठावण्यात आला आहे. दंड न भरल्यास त्यांना सहा महिन्यांची अतिरिक्त शिक्षा भोगावी लागेल.

शेख हसीना सध्या भारतात आहेत. मागील ५ ऑगस्ट रोजी बांगलादेशात मोठ्या प्रमाणात हिंसाचार भडकल्यानंतर त्यांना देश सोडून भारतात यावे लागले. यापूर्वी न्यायालयाने त्यांना फरार घोषित केले होते. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# पुरोगाम्यांचा संस्कृतिसंभ्रम!

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वाटचालीस पुरोगामित्वाचा मुलामा चढविण्याचे कार्य करणाऱ्यांच्या यादीत अलिकडच्या काळातील क्रांतिकारी नेता म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांचे नाव आघाडीवर राहिले आहे. मुळात, महाराष्ट्र हे खरोखरीच पुरोगामी विचारांचेच राज्य होते. या राज्यात समाजसुधारणेची सुरुवातच पुरोगामी विचार रुजविण्याच्या प्रक्रियेतून झाली. परंपरेच्या नावाखाली पाळल्या जाणाऱ्या पुराणातील प्रथांना मूठमाती देऊन नव्या जमान्याशी जुळतील, अशा विज्ञाननिष्ठ विचारांची पाळेमुळे या राज्यात रुजली होती आणि येथूनच त्यांचा देशभर प्रसार झाला होता, असे इतिहास सांगतो. ज्यांच्या संस्कारामुळे महाराष्ट्रास पुरोगामी विचारांचे राज्य म्हटले जाऊ लागले, त्या छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगे बाबा आणि अशा कितीतरी लोकांचा वैचारिक वारसा राज्याला लाभलेला आहे. पण, केवळ या सुधारकांच्या नावाचा ऊठसूठ जप केला, त्यांच्या नावाच्या घोषणा दिल्या किंवा त्यांच्या नावांचा मुलामा योजनांवर चढविला म्हणजे या महापुरुषांचे कार्य पुढे नेल्याचे, त्यांचा वारसा चालविल्याचे श्रेय मिळेल, अशी भावना दुर्दैवाने बळावत गेली. कदाचित त्यामुळेच, आजकाल राजकारणात, सामाजिक किंवा सांस्कृतिक क्षेत्रात जे काही घडताना दिसते, त्याला पुरोगामित्वाचा तोंडवळा खरेच आहे का, असा प्रश्न पडण्यासारखी स्थिती निर्माण झाली असावी. पुरोगामित्व हा केवळ कागदावरचा विचार नव्हे, तर ती कृतिशीलतेतून दाखवून देण्याची बाब आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक वाटचालीच्या इतिहासात तसेच घडले आहे. पण, अलिकडे मात्र ते इतिहासजमा होत चालले असून, पुरोगामित्वाचा डिंडिम वाजवत प्रत्यक्षात मात्र राज्याला प्रतिगामी दिशा देण्याचेच काम सुरू झाल्याचे अनेक घडामोडींवरून दिसून येऊ लागले आहे. तसे नसते, तर राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार यांच्यावर धर्मशास्त्राच्या नियमांचा मारा करून त्यांना दोषी ठरविण्याचा निर्णय घेण्याची जोरदार स्पर्धा सुरू झाली नसती. या राज्याने महिलांना समान संधी, सत्तेतील समान वाटा, स्त्रीयांना समाजाचा समान हक्कदार घटक मानले आहे, असे सांगणारे महिला धोरण सुमारे तीन दशकांआधी महाराष्ट्रात जाहीर झाले, तेव्हा राज्याचे देशभरात मोठे कौतुक झाले होते. तेव्हाचे मुख्यमंत्री शरद पवार हे शाहू-फुले, आंबेडकरांच्या सुधारक विचारांचे खरे वारस असल्याचा निर्वाळाही अनेकांनी दिला होता. या महिला धोरणाचे गोडवे अजूनही गायिले जात असताना सध्या सुरू असलेल्या राजकीय प्रतिगामित्वामुळे एक प्रश्न मात्र पुनःपुन्हा ठळकपणे अधोरेखित होऊ लागला आहे. तो म्हणजे, ज्या परंपरेचे आपण सातत्याने गोडवे गातो, ज्या परंपरेचे पाईक म्हणून आपण सतत आपली पाठ थोपटून घेतो, ती पुरोगामी परंपरा म्हणजे अलिकडच्या काळातील आपला खरा चेहरा आहे, की तो केवळ राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक मुखवटा आहे?

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात महिला प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी दीर्घकाळ कल्याणकारी चौकटीत अडकलेली राहिली. अनुदाने, सवलती, योजना, यांच्या पलीकडे जाऊन महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रक्रियेचा केंद्रबिंदू मानणारे धोरण क्वचितच मांडले गेले. अशा पृष्ठभूमीवर शरद पवारांनी जाहीर केलेले महिला धोरण हा केवळ एक प्रशासकीय दस्तऐवज नव्हते, तर राज्याच्या सामाजिक दिशादर्शक राजकारणाचे ते महत्त्वाचे विधान (स्टेटमेंट) होते. महिलांकडे केवळ 'लाभार्थी' म्हणून नव्हे, तर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक निर्णय प्रक्रियेतील घटक म्हणून पाहण्याची स्पष्ट भूमिका त्यामागे होती. स्वयंरोजगार, बचतगट, शिक्षण, आरोग्य, पोषण, पाणी आणि सुरक्षितता या मुद्द्यांचा एकत्रित विचार करून महिलांचे आयुष्य विभागनिहाय नव्हे, तर समग्र सामाजिक वास्तव म्हणून या धोरणातून मांडले गेले होते. ग्रामीण महाराष्ट्रातील महिला हा या धोरणाचा खरा केंद्रबिंदू होता. शेतकरी कुटुंबातील स्त्री ही केवळ घरकाम करणारी नव्हे, तर शेती, अर्थव्यवस्था आणि कुटुंबाच्या स्थैर्याची आधारस्तंभ आहे, ही जाणीव धोरणात प्रकर्षाने उमटत होती. त्यामुळेच ग्रामीण महिलांनी या धोरणाकडे संशयाने नव्हे, तर अपेक्षेने पाहिले. महत्त्वाचे म्हणजे, या धोरणाला तत्कालीन राजकीय विरोधाचा तीव्र सामना करावा लागला नाही. ''अंमलबजावणी निर्णायक ठरेल'' अशा टिपण्णींसह का होईना, पण या धोरणाची गरज बहुतेकांनी मान्य केली. हेच या धोरणाचे तेव्हाचे निर्विवाद अप्रत्यक्ष यश ठरले होते. या धोरणामागे दीर्घकालीन सामाजिक बदलाची राजकीय समज होती. सन्मान, स्वावलंबन आणि सहभाग हे तीन स्तंभ त्या धोरणाचे मूळ होते.

फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारसरणीत केंद्रस्थानी असलेला महिला सक्षमीकरणाचा मुद्दा आधुनिक राजकारणात उतरविण्याचा प्रयत्न असल्याची स्तुतिसुमने त्या धोरणावर उधळली गेली होती. त्यामुळे ते धोरण आज केवळ इतिहासाचा भाग नसून, महिला सबलीकरणाचा मापदंड ठरेल, अशी महाराष्ट्राची अपेक्षा होती. कारण ते धोरण केवळ महिलांसाठी नव्हे, तर महाराष्ट्राच्या सामाजिक भविष्याचे धोरण ठरावे, असे मानले जात होते. आज, सुमारे तीन दशकांनंतर, जेव्हा सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, तेव्हा मात्र या अपेक्षांचीच निराशा झाली आणि महाराष्ट्र खरोखरीच पुरोगामी आहे, की पुरोगामित्व हा महाराष्ट्राचा केवळ सोयीचा मुखवटा आहे, असा प्रश्न अधोरेखित झाला आहे. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात एकाच वेळी अभिनंदनाची आणि लगेचच संशयाचीदेखील प्रतिक्रिया उमटली. ही दुटप्पी प्रतिक्रिया योगायोगाने आलेली नाही; ती महाराष्ट्राच्या महिलाविषयक पुरोगामी दाव्यांची आणि राजकीय व्यवहारातील विसंगतींची साक्ष आहे, असेच म्हणावे लागेल. कारण, महाराष्ट्रावर खरोखरीच पुरोगामी विचारांचे संस्कार घडले असते किंवा पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणाऱ्यांनी या वेळी ते कृतीशीलपणे दाखविले असते, तर परंपरांचा आणि प्रतिगामी प्रथांचे दाखले देऊन त्यांच्या निर्णयास चूक ठरविण्याचा कोतेपणा कोणी दाखविला नसता. सुनेत्रा पवार यांनी पतीच्या निधनानंतर लगेचच सत्ताकारणात उडी घेतल्याबद्दल त्यांचे स्वागत करावयाचे, की सुतक आदी प्रतिगामी कल्पनांचा कोलदांडा उभा करून त्यांच्या निर्णयावर नाके मुरडायची, हे पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्राने ठरवायला हवे होते. शरद पवार यांच्याच ज्या महिला धोरणाने महिलांना कागदावरचे हक्क बहाल केले, सत्तेच्या वाटणीचा अधिकार आणि आत्मविश्वासही दिला, प्रतिनिधित्वाचा हक्क दिला, ते धोरण म्हणजे केवळ कागदी दस्तावेज असून, प्रत्यक्षात मात्र, महिलांना प्रथा परंपरांच्या पिंजऱ्यातच कोंडून ठेवायची मानसिकता आहे का, अशी शंका यामुळे व्यक्त होऊ लागली आहे. सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रिपद ग्रहणानंतर, एका बाजूला 'महिला सत्तेच्या केंद्रात' या पुरोगामी विचारांच्या कृतीचा क्षण साजरा झाला. पण, लगेचच दुसऱ्या बाजूला संधींचे केंद्रीकरण, रीत-रिवाज, परंपरा आणि थेट धर्मशास्त्रावरही बोट ठेवले गेले. त्यामुळेच महिला सत्तेत येते, तेव्हा महाराष्ट्राचे ते पुरोगामी महिला धोरण पुढे नेण्याचा वारसा ती चालविते का, हा प्रश्न या दोन्ही प्रतिक्रियांपलीकडे जाऊन विचारला गेला पाहिजे. सध्याच्या स्थितीत याचे उत्तर तडकाफडकी देता येणार नाही. परिस्थितीचे नेमके आकलन करून घेऊन, त्यावर विवेकी विचार करून प्रामाणिकपणे शोधले तरच त्याचे उत्तर सापडू शकेल आणि कदाचित त्यामुळे अंतर्मुख होण्याचीच वेळ येईल.

सुनेत्रा पवार यांची शपथ महिला सक्षमीकरणाचे प्रतीक मानली जात असेल, तर त्याची कसोटी कठोर असली पाहिजे. केवळ परंपरा आणि धार्मिक प्रथांचे दाखले देऊन प्रश्न उभे केल्यास पुरोगामी विचारसरणीतील सांस्कृतिक संभ्रमच नाहक समोर येण्याची शक्यता अधिक आहे. सुनेत्रा पवार यांनी ज्या परिस्थितीत हे पद स्वीकारले, ती परिस्थिती काहीशी कठीणच होती, यात कोणतेच दुमत नाही. पण, त्याही परिस्थितीत पुराणप्रथांना कवटाळून न राहता त्यांनी एक धाडसी निर्णय घेतला. याकडे खरे तर पुरोगामी दृष्टिकोनातून पाहिले, तर त्याचे स्वागत व्हावयास हवे होते. पण, तसे होण्याऐवजी गदारोळाच अधिक माजतो, तेव्हा पुरोगामी परंपरेचे पाईक म्हणविणाऱ्यांच्या प्रामाणिकपणावरच प्रश्नचिन्हे उमटतात. महाराष्ट्राला महिलांचे नेतृत्व नवे नाही. पण, महिला धोरणाने दिलेल्या आत्मविश्वासानुसार ठाम भूमिका घेणारे नेतृत्व दुर्मिळ होते. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीनंतर आणखी एक अस्वस्थ करणारा प्रश्नदेखील उभा राहिला आहे. एखाद्या दुर्दैवी कौटुंबिक परिस्थितीत राजकीय वारसा पुरुषांकडे गेला, तेव्हा तो 'अनुभवाचा लाभ' ठरतो; पण हाच वारसा स्त्रीकडे गेला, तर मात्र तो 'अनुचित सवलत' ठरतो. सध्याच्या गदारोळामुळे तसेच काहीसे होताना दिसत आहे, आणि ही दुटप्पी कसोटीच महाराष्ट्राच्या पुरोगामी असण्याच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उभे करीत आहे. आजचा महाराष्ट्र फुले-शाहू-आंबेडकरांची परंपरा सांगतो. पण, ही परंपरा आठवण म्हणून जपली जाऊ नये; तर धोरण म्हणून राबवली जावयास हवी. अन्यथा तिचे राजकीय मूल्य संपुष्टात येईल. महाराष्ट्राची महिला हा केवळ चेहरा नव्हे, तर स्वतंत्र अस्तित्व असलेली व्यक्ती आहे, हे दाखवून देण्याची कसोटी सुनेत्रा पवार यांना पार पाडावी लागणार आहे. त्यात त्या यशस्वी झाल्या, तर ही सत्ता महिला धोरणाची धार वाढवेल, की त्या धोरणावरच पडदा टाकेल, हे ठरणार आहे. शिवाय, पुरोगाम्यांना संस्कृतिसंभ्रमातून बाहेर काढण्याची संधीही त्यातून साधता येईल.

## आंतरराष्ट्रीय

# अमेरिका-'जमात'च्या हातमिळवणीचा धोका

**प्रा. जयसिंग यादव**

अमेरिकन प्रशासनाच्या अंदाजानुसार बांगलादेशमधील 'जमात-ए-इस्लामी' हा इस्लामिक पक्ष पुढील महिन्याच्या निवडणुकीत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी करू शकेल आणि म्हणूनच अमेरिका त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेशमध्ये 'जमात-ए-इस्लामी' या संघटनेवर यापूर्वी अनेक वेळा बंदी घालण्यात आली होती. अलिकडेच शेख हसीना यांची राजवट आरक्षण आंदोलनाला लागलेल्या हिंसक वळणामुळे उलथवून टाकण्यात आली. तिथे युनूस मोहम्मद यांचे हंगामी सरकार सत्तेवर आहे. या सत्तेच्या काळात 'जमात-ए-इस्लामी'ला अधिक महत्त्व मिळत गेले. हसीना यांच्या सरकारकडे युनूस हेही शत्रुपक्षाचे सरकार म्हणून पाहत होते. हे सरकार उलथवून टाकण्यात 'जमात-ए-इस्लामी'ची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे युनूस याच पक्षाच्या सल्ल्याने कारभार करतात आणि धोरणे ठरवतात. हाच पक्ष सत्तेवर यावा, असे त्यांना वाटते. 'जमात-ए-इस्लामी' पक्षाने पारंपरिकपणे शरिया कायद्यावर आधारित शासन आणि महिलांचे कामाचे तास कमी करण्याचा पुरस्कार केला आहे; जेणेकरून त्या मुलांप्रति त्यांची कर्तव्ये पार पाडू शकतील. तथापि, अलिकडेच त्यांनी आपली सार्वजनिक प्रतिमा सौम्य करण्याचा आणि महिलांचा पाठिंबा वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. 'जमात-ए-इस्लामी'चे प्रवक्ते मोहम्मद रहमान म्हणाले की, पक्ष भ्रष्टाचारविरोधी, पारदर्शकता, जबाबदारी आणि सुशासन या मुद्द्यांवर निवडणुका लढवत आहे. महिलांसाठी कामाचे तास कमी करण्याचा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात आहे आणि पक्षाची शरिया कायदा लागू करण्याची कोणतीही योजना नाही.

१९७१ मध्ये बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान, 'जमात-ए-इस्लामी'च्या अनेक नेत्यांनी लोकांवर गंभीर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. पक्षाने वेगळ्या बांगलादेशला विरोध केला होता, कारण तो इस्लामविरोधी असल्याचे मानले जात होते. भारतात अयोध्येत वादग्रस्त ढांचा पाडल्यानंतर, जमात नेते आणि विद्यार्थी संघटनांवर बांगलादेशमध्ये हिंदुविरोधी दंगली भडकवल्याचा आरोपही करण्यात आला होता. बांगलादेशमधील राजकीय परिस्थिती बदलत असताना तेथील अमेरिकन राजदूतांनी पुनरुज्जीवित इस्लामिक चळवळीसोबत काम करण्याची तयारी दर्शवली आहे. 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालानुसार अमेरिकेचा अंदाज आहे की 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशच्या निवडणुकीमध्ये ऐतिहासिक यश मिळवू शकते. 'वॉशिंग्टन पोस्ट'ने मिळवलेल्या ऑडिओ रेकॉर्डिंगनुसार एक डिसेंबर रोजी बांगलादेशी महिला पत्रकारांसोबत बंद दाराआड झालेल्या बैठकीत ढाका येथे तैनात असलेल्या एका अमेरिकन राजदूताने सांगितले की, देश इस्लामिक झाला आहे आणि १२ फेब्रुवारीच्या निवडणुकीमध्ये 'जमात-ए-इस्लामी' पूर्वीपेक्षा चांगले प्रदर्शन करेल. 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशवर इस्लामिक कायद्याची आपली धारणा लादण्याचा प्रयत्न करेल, या चिंतेकडे अमेरिकन राजदूताने दुर्लक्ष केले. ते म्हणाले की, जमात शरिया लादू शकते, असे मला वाटत नाही. पक्षाच्या नेत्यांनी अशी भयानक पावले उचलल्यास अमेरिका दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर शंभर टक्के कर लादेल.

'द वॉशिंग्टन पोस्ट'ला दिलेल्या निवेदनामध्ये ढाका येथील अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्या मोनिका शिया म्हणाल्या की, डिसेंबरमध्ये झालेली चर्चा ही एक नियमित बैठक होती. ही अमेरिकन दूतावासाच्या अधिकाऱ्यांची आणि स्थानिक पत्रकारांमधील 'ऑफ-द-रेकॉर्ड' चर्चा होती. त्या म्हणाल्या की, बैठकीदरम्यान अनेक राजकीय पक्षांबाबत चर्चा झाली. अमेरिका कोणत्याही एका राजकीय पक्षाला दुसऱ्यापेक्षा जास्त पसंती देत नाही आणि बांगलादेशमधील लोक निवडत असलेल्या सरकारसोबत काम करण्याची अमेरिकन सरकारची योजना आहे. तथापि, 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालात बांगलादेशमधील अमेरिकन राजदूत एका महत्त्वपूर्ण संक्रमणादरम्यान देशाच्या राजकीय भविष्याकडे कसे पाहतात, यावर प्रकाश टाकला आहे. ढाका येथील दूतावासाच्या बैठकीत, एका अमेरिकन अधिकाऱ्याने सूचित केले, की 'जमात-ए-इस्लामी'शी संपर्क साधण्याव्यतिरिक्त मिशनचे कर्मचारी 'हेफाजत-ए-इस्लाम बांगलादेश' आणि 'इस्लामी आंदोलन बांगलादेश'सह इतर रूढिवादी गटांसोबतही काम करत आहेत. ते इस्लामिक राजकीय पक्षांमध्येही सामील होऊ शकतात. राजनयिकाने जोर देऊन सांगितले, की 'जमात-ए-इस्लामी' सत्तेत आली आणि अमेरिकेला मान्य नसलेली धोरणे लागू केली, तर अमेरिका बांगलादेशच्या मोठ्या कापड उद्योगावर काही बंधने घालू शकेल. अधिकाऱ्याने सांगितले की, बांगला देशच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग अमेरिकेवर अवलंबून आहे. त्यांनी बांगलादेशच्या कापड निर्यातीचा उल्लेख केला. यामुळे भारताची चिंता कमी होण्याची शक्यता नाही.

भारताने २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील 'जमात-ए-इस्लामी'च्या शाखेला बेकायदेशीर गट घोषित केले आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यावर बंदी घातली. १९७५ आणि १९९३ मध्ये येथे 'जमात-ए-इस्लामी'वर बंदी घालण्यात आली होती. 'जमात-ए-इस्लामी'चे अमेरिकन प्रवक्ते मोहम्मद रहमान यांनी एका निवेदनात म्हटले की, आम्ही एका खाजगी राजनयिक बैठकीदरम्यान केलेल्या कथित टिप्पण्यांवर भाष्य करू इच्छित नाही.

गेल्या काही महिन्यांमध्ये भारत-अमेरिका संबंध बिघडत असल्याचे दिसून येते. दुसरीकडे, युनूस यांच्या अंतरिम सरकारच्या स्थापनेपासून भारत आणि बांगलादेशमधील संबंध इतिहासातील सर्वांत खालच्या टप्प्यावर पोहोचले आहेत. 'जमात-ए-इस्लामी'शी वाढू शकणारे अमेरिकेचे संबंध अमेरिका आणि भारत यांच्यात आणखी दरी निर्माण करू शकतात. अनेक वर्षांपासून 'जमात-ए-इस्लामी' भारताचा सर्वांत मोठा शत्रू आहे. भारत या पक्षाला पाकिस्तानचा मित्र मानतो आणि प्रादेशिक सुरक्षा धोरणासाठी धोका म्हणून पाहतो. अमेरिका-भारत संबंध चांगल्या स्थितीत असते, तर अमेरिका निवडणुकीपूर्वी 'जमात-ए-इस्लामी'बद्दलच्या भारतीय चिंतांकडे लक्ष देण्यास तयार झाली असती; परंतु आता ते शक्य नाही.

बांगलादेश हा राजकीय गोंधळातून जन्मलेला देश आहे. १९७१ मध्ये झालेल्या युद्धानंतर पाकिस्तानपासून स्वातंत्र्य मिळाले, तेव्हापासून बांगलादेशने लष्करी उठाव, हुकूमशाही आणि प्रस्थापित राजकीय पक्षांच्या नेतृत्वाखाली अशांततेचा सामना केला आहे. भारत-बांगलादेश संबंध आधीच अनिश्चित स्थितीत आहेत. शेख हसीना भारताच्या जवळच्या मित्र मानल्या जात होत्या आणि त्यांना सत्तेवरून काढून टाकल्यापासून त्या भारतात राहत आहेत. नोव्हेंबरमध्ये बांगलादेशच्या एका न्यायाधिकरणाने त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. त्यांना किमान १,४०० निदर्शकांच्या हत्येसाठी जबाबदार ठरवले. बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या विनंतीला न जुमानता भारताने त्यांचे ढाका येथे प्रत्यार्पण केले नाही. डिसेंबरमध्ये झालेल्या बैठकीत एका अमेरिकन राजनयिकाने म्हटले होते की, हसीनाला दोषी ठरवणे राजकीयदृष्ट्या योग्य होते. न्यायाधिकरण 'स्वतंत्र आणि निष्पक्ष' नव्हते; परंतु हसीना दोषी आहेत. भारतावर 'जमात-ए-इस्लामी'चा राग आणि युनूस यांचीही तशीच भूमिका हे सारे पाहता अमेरिकेचे त्यांच्याशी वाढत चाललेले मैत्रीपूर्ण संबंध दक्षिण आशियातील राजनैतिक समीकरणांवर प्रतिकूल परिणाम घडवतील. अमेरिकेला शेख हसीना कधीच आवडत नव्हत्या. तसेच अमेरिकेला बांगलादेशमध्ये भारताचा प्रभाव मान्य नव्हता. बांगलादेशच्या स्वातंत्र्ययुद्धादरम्यान नरसंहार करणाऱ्या पाकिस्तानी सैन्याला पाठिंबा देणाऱ्या 'जमात-ए-इस्लामी'चे हात रक्ताने माखले आहेत. ती बांगलादेशमधील धर्मनिरपेक्षता नष्ट करू इच्छितात आणि देशाला इस्लामी बनवू इच्छितात; परंतु गेल्या दीड वर्षांत त्यांना पद्धतशीरपणे मुख्य प्रवाहात आणले गेले आहे. या पृष्ठभूमीवर 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या विश्लेषणाचा अर्थ लावला, तर बांगलादेश-अमेरिकेचे वाढते संबंध भारतासाठी अडचणीचे ठरू शकतात, हे लक्षात येईल.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# चिंतनाला कृतीची जोड देणारे तत्त्वज्ञ

अध्यात्माची विज्ञानाशी सांगड घालून या आधुनिक युगात मानव कल्याणासाठी झटणारे तत्त्वज्ञ आणि भारतीय संस्कृतीला आपल्या ध्येयाची जोड देऊन सदैव मार्गक्रमण करणारे प्रा. विश्वनाथ दा. कराड यांचा आज जन्मदिवस. प्रा. विश्वनाथ कराड आज वयाची ८५ वर्षे पूर्ण झाल्यावर ध्येय प्राप्तीसाठी त्यांची धडपड वाखाणण्यासारखी आहे. त्यांचा जन्म गाव खेड्यामधला. मराठवाड्यामधील रामेश्वर रुई हे त्यांचे जन्मगाव. प्राथमिक शिक्षण गावामध्येच झालेले. त्यानंतर माढा आणि सोलापूर अशी त्यांची शिक्षण यात्रा. पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयामधून ते इंजिनीयर झाले आणि तिथेच प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांच्या कुटुंबावर वारकरी संप्रदायाचा पगडा. या संस्कारांमध्येच ते लहानाचे मोठे झाले. अध्यात्माची ओढ त्यामुळेच त्यांच्या हृदयात कायमची कोरली गेली. अध्यात्माची ही ओढ आणि अथक परिश्रम यामुळे प्रा. कराड यशाचे खरे मानकरी ठरले. संत श्री ज्ञानेश्वर महाराज, संत श्री तुकाराम महाराज आणि स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि प्रेरणा यामधून त्यांना बळ प्राप्त झाले. या महापुरुषांच्या मानवी कल्याणाची शिकवण त्यांनी आपल्या आयुष्यात कायमची रुजविली आणि



एमआयटी म्हणजेच महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टॅक्नॉलाजी या संस्थेत मुल्याधिष्ठित वैश्विक शिक्षणाची संकल्पना रुजविली गेली. उच्च तांत्रिक शिक्षण विना-अनुदानित करून विद्यार्थ्यांना अधिक सोयी आणि संधी उपलब्ध करून द्याव्या, गोरगरिब आणि गावखेड्यामधील विद्यार्थ्यांनी पुढे यावे, या उद्देशाने त्यांनी १९८१ मध्ये म्हणजे ४० वर्षांपूर्वी एमआयटी या इंजिनीअरीग कॉलेजची स्थापना केली. त्यानंतर या संस्थेचा विस्तार होत आज ही संस्था देशातच नव्हे, तर विदेशातही कीर्तीमान स्थापन करीत आहे. आपल्या उभ्या आयुष्यात प्रा. विश्वनाथ कराड यांनी अध्यात्म, समाजप्रबोधन, शिक्षण आणि अन्य क्षेत्रांमध्ये समाजभिमुख अनेक उपक्रम निष्ठेने साकारले. त्यांच्या हातून घडलेले अनेक अलौकीक कार्य तसेच स्वामी विवेकानंद यांनी प्रतिपादीत केलेल्या 'विज्ञान व अध्यात्म्याच्या माध्यमातून जगात शांती नांदेल' या वचनावर आधारीत अनेक भव्य वास्तूंनी मूर्तरूप घेतले. आपल्या ४० वर्षांच्या अथक परिश्रमाच्या कालावधीत प्रा. कराड अनेक महनियांच्या संपर्कात आले. त्यात माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम, माजी पंतप्रधान चंद्रशेखर, व्यंकय्या नायडू, डॉ. रघुनाथ माशेलकर आदी अनेकांचा समावेश आहे. प्रा. कराड यांची शिक्षण पद्धतीला नवे वळन देण्याची धडपड, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, देशाभिमान, आपले संस्कार आणि संस्कृती, भारतीय तत्त्वज्ञानाबाबत जागृती निर्माण करणे आदी कार्यांची दखल घेत अनेक महनीय व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले आहे. प्रा. कराड यांनी अध्यात्म, विज्ञान, शिक्षण आणि विश्व शांतीच्या प्रतिक अशा अलौकीक वास्तूंची निर्मितीही केली आहे. त्यात श्रीक्षेत्र आळंदी येथे विश्वरूप दर्शन मंच, वारकरी समाजाचे भक्ती, प्रेम व करुणाचे प्रतिक असलेला १४५ फूट उंचीचा सुवर्णजडीत गरुडस्तंभ, रामेश्वर रुई येथील श्री राम रहिम मानवता सेतू, भगवान गौतम बुद्ध विहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वशांती भवन, लोणी काळभोर येथे प्रेम आणि मानवतेचा संदेश देणारे श्रीमद् भागवत गीता ज्ञान भवन, ९ घुमट असलेली विश्वशांती संगीत कला अकादमी, विश्वरूप देवता दर्शन मंदिर, संत श्री ज्ञानेवर माउली आणि संत श्री तुकाराम महाराज विश्वशांती प्रार्थना सभागृह व ग्रंथालयाची निर्मिती करून त्यांनी शिक्षणाप्रती तसेच विश्वशांतीसाठी केलेले प्रयत्न अजोड आहेत. जगात स्थर्य आणि शांतता नांदावी आणि 'हे विश्वची माझे घर' या संकल्पनेला प्रत्यक्षात साकारण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्यास तोड नाही. भारतीय सनातन संस्कृतीची ही शिकवण प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी रुजावी, सर्वश्रेष्ठ विद्यार्थी देशातच तयार व्हावे, यासाठी त्यांची निष्ठा आणि तळमळ, नवीन भारताच्या उभारणीसाठी त्यांनी दिलेले योगदान शाश्वत परंपरेला साजेसे आहे. आपली परंपरा आणि संस्कृतीवर असलेल्या दृढ विश्वासाने, अनेक विपरीत परिस्थितीवर मात करून त्यांनी मानव जातीच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले आहे. आज त्यांच्या जन्मदिनी श्री नरकेसरी प्रकाशन लिमिटेडच्या वतीने त्यांना शुभेच्छा देत आपण सर्व देशाच्या आणि विश्वाच्या कल्याणासाठी दृढ सकल्प करू या!

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# इलेक्ट्रॉनिक उद्योगाचे आशादायी भविष्य


**दत्तात्रेय आंबुलकर**

भारतातील इलेक्ट्रॉनिक उद्योगाच्या या विशेष प्रगती आणि विकासाला पाठबळ लाभले, ते कारखाने-उद्योग, वाहन-उद्योग, संशोधन क्षेत्र व घरगुती उपकरणांचा वापर या विविध क्षेत्रांतील वाढत्या इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि उपकरणांच्या वापराचे. गेल्या काही वर्षांतील भारताच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांना असणारी विदेशातील मागणीदेखील वाढत असल्यानेच या उद्योगाचा व्याप आणि व्यवसाय वाढत आहे.

भारतीय इलेक्ट्रॉनिक उद्योगाच्या वाढीसाठी उपयुक्त ठरलेला प्रमुख व धोरणात्मक निर्णय म्हणून २०१९च्या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक धोरणाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. याच धोरणाच्या अंमलबजावणीसह वाढत्या व्यवसायाला गती मिळाली, ती मोबाईल फोन, टेलिव्हिजन, संगणकीय व संवादविषयक उपकरणे व सुटे भाग, संरक्षण, वाहतूक-रेल्वे व दळणवळण इ. क्षेत्रांतील वाढणाऱ्या इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाच्या वापराची. यातूनच मध्यम व लघु उद्योगांपासून सरकारी व खाजगी क्षेत्रातील व्यापक उद्योगांचा विस्तार होत गेला.

२०१९ मध्ये केंद्र सरकारने धोरणात्मक स्वरूपात राष्ट्रीय स्तरावर इलेक्ट्रॉनिक धोरण जाहीर करण्यापूर्वी या व्यवसाय क्षेत्रात परंपरागत स्वरूपात व्यवसाय पद्धती प्रचलित होती. यामध्ये प्रामुख्याने घरगुती वापराची उपकरणे, टेलिव्हिजन संच, संगणक व सुटे भाग इ.चा समावेश असायचा. मात्र, सरकारने वर नमूद केल्याप्रमाणे इलेक्ट्रॉनिक धोरण जाहीर केल्यावर इलेक्ट्रॉनिक व्यवसाय क्षेत्रातील सारेच चित्र बदलले. यातून प्रगत संशोधनाची जोड मिळून इलेक्ट्रॉनिक क्षेत्राने ५ जीपर्यंतचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला, तो त्यानंतरच. इलेक्ट्रॉनिक धोरणाची यशस्वी व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रीय स्तरावर वेळोवेळी जी उपाययोजना करण्यात आली, त्यामध्ये पुढील टप्पे विशेष महत्त्वाचे ठरले :

**इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टरिंग योजना** : या योजनेअंतर्गत विशेषत: लहान व मध्यम स्वरूपातील इलेक्ट्रॉनिक उद्योग व उद्योजकांसाठी क्लस्टर स्वरूपातून विशेष उत्पादन केंद्रांची स्थापना करण्यात आली. यातून सुमारे ५४ हजार कोटी रुपयांची लघु व मध्यम इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात नव्याने गुंतवणूक होऊन त्याद्वारे २.६९ लाख नवे रोजगार उपलब्ध झाले.



**इलेक्ट्रॉनिक डेव्हलपमेंट फंड** : इलेक्ट्रॉनिक उत्पादन व व्यवसाय क्षेत्रात नवे तंत्रज्ञान-संशोधन व विकसित उत्पादन पद्धतीला चालना देण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली. या निधीच्या माध्यमातून १२८ स्टार्टअप सुरू झाले व त्यातून सुमारे २२ हजार नवे रोजगार उपलब्ध होऊ शकले.

**उत्पादन प्रोत्साहन राशी योजना** : केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया योजनेअंतर्गत उपलब्ध असणाऱ्या राशी वितरण योजनेअंतर्गत इलेक्ट्रॉनिक क्षेत्राचासुद्धा समावेश करण्यात आल्याने त्याचा लाभ या क्षेत्राला अर्थातच मिळाला. यामुळे इलेक्ट्रॉनिक सुटे भाग उत्पादन करणाऱ्या, मोबाईल क्षेत्रासाठी काम करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक उत्पादकांना योजनेअंतर्गत चार ते सहा टक्के उत्पादन प्रोत्साहन राशीचा लाभ झाला आहे. याशिवाय, नजीकच्या काळात या विशेष उद्योजकांना ३.३५ लाख कोटी प्रोत्साहनपर राशी मिळणे अपेक्षित असून, त्याद्वारे सुमारे २२ हजार नवे रोजगार उपलब्ध होऊ शकतात.

याशिवाय, नव्या धोरणांतर्गत केंद्र सरकारतर्फे स्कीम फॉर प्रमोशन ऑफ मॅन्युफॅक्चरिंग ऑफ इलेक्ट्रॉनिक कॉम्पोनंट्स ॲण्ड सेमीकंडक्टर्स, दि मॉडिफाईड प्रोग्रॅम फॉर डेव्हलपमेंट ऑफ सेमीकंडक्टर्स ॲण्ड डिस्प्ले मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टम अथवा सेमीकंडक्टर्स इंडिया प्रोग्राम यांसारख्या योजना आणि उपक्रमांच्या अंमलबजावणीला पण प्राधान्यक्रमाने सुरुवात झाली आहे, हे याठिकाणी उल्लेखनीय आहे.

वरील धोरणे व त्यांच्या अंमलबजावणीचा परिणाम व त्यांचे फायदे दिसायला लागले आहेत. भारत इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात प्रामुख्याने सुट्या भागांची आयात करून त्यांची जोडणी-जुळणी करण्याचे मुख्य केंद्र म्हणून ओळखला जायचा. आता मात्र भारतात इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील प्रगत अभ्यास व संशोधनावर आधारित महत्त्वपूर्ण भाग-उपकरणांची निर्मिती तर होतेच. याशिवाय, त्यांची आता निर्यात पण व्हायला लागली आहे, हे विशेष.

यातूनच इलेक्ट्रॉनिक उद्योगांचा व्याप आणि त्यांचा आकार व संख्या यामध्येसुद्धा सातत्याने विस्तार व वाढ होत आहे. परंपरागतरीत्या लघु व मध्यम क्षेत्रातील उद्योग-व्यवसाय म्हणून प्रस्थापित झालेल्या इलेक्ट्रॉनिक उद्योगाने आता प्रस्थापित मोठ्या उद्योगाचे स्वरूप प्राप्त केले आहे. यामध्ये खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील इलेक्ट्रॉनिक उद्योगांसह स्टार्टअप क्षेत्राचे सहकार्य व सहभाग आता मिळू लागला आहे. वाढत्या इलेक्ट्रॉनिक व्यवसाय क्षेत्राद्वारे टप्प्याटप्प्याने व निश्चित स्वरूपात संशोधनासह वाढत्या रोजगारांना चालना मिळत आहे. याशिवाय, या व्यवसायवाढीचे सामाजिक-आर्थिक संदर्भात पण सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत, हे उल्लेखनीय आहे.उदाहरणार्थ, विविध राज्यांमध्ये विविध स्तरांवर व विविध संदर्भात इलेक्ट्रॉनिक उद्योगांना चालना व प्रोत्साहन देत योजनाबद्ध स्वरूपात जे जाळे निर्माण केले, त्याचेच हे परिणाम आहेत. यामध्ये प्रामुख्याने तामिळनाडू, कर्नाटक, उत्तर प्रदेश, गुजरात यासारख्या राज्यांचा समावेश करावा लागेल. मुख्य म्हणजे, या राज्यांमधील इलेक्ट्रॉनिक उद्योगांचा व्याप आता केवळ राज्याची राजधानी वा मोठ्या औद्योगिक शहरांपर्यंतच मर्यादित राहिला नसून, त्याची व्याप्ती इतर शहरांपर्यंत वाढली आहे.अशाप्रकारे देशांतर्गत विविध स्तर आणि पातळ्यांपर्यंत पोहोचलेल्या इलेक्ट्रॉनिक व्यवसायाच्या यशस्वी यशाची नोंद व दखल आता या क्षेत्रात जागतिक पातळीवर पण घेतली जात आहे. यातून भारताच्या इलेक्ट्रॉनिक उद्योग क्षेत्राला आता जागतिक पातळीवर गुंतवणुकीपासून निर्यातीपर्यंत वाढता प्रतिसाद लाभत आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### भारतमातेच्या रक्षणातील न बोलणारे शिलेदार!

यंदाच्या २६ जानेवारीला दिल्लीच्या कर्तव्यपथावर साकारलेली प्रजासत्ताक दिनाची परेड केवळ शस्त्रसज्जतेचे वा तांत्रिक सामर्थ्याचे दर्शन नव्हते; ती होती भारतभूमीसाठी प्राण अर्पण करणाऱ्या मूक योद्ध्यांना दिलेली जाहीर मानवंदना. हिमालयातील दुर्गम, हिमाच्छादित प्रदेशात कार्यरत असलेले उंट, रणांगणावर शिस्तबद्ध टापांवर धावणारे घोडे, तसेच दहशतवादविरोधी मोहिमांत निर्भयतेने पुढे झेपावणारे श्वान या सर्वांनी इतिहासाची आठवण करून दिली. भारताचा इतिहास उघडला, तर मूक प्राण्यांच्या शौर्यगाथा प्रत्येक पर्वात आढळतात. तानाजी मालुसरे सिंहगडाच्या कठीण कड्यावर चढताना ज्यांच्यावर विश्वास ठेवला ती घोरपड 'यशवंती'; हळदीघाटीच्या युद्धात जखमी अवस्थेतही महाराणा प्रतापांना सुरक्षित नेणारा घोडा 'चेतक'; छत्रपती शिवाजी महाराजांच्या संकटसमयी जीवाची बाजी लावणारा घोडा 'बादल' ही नावे इतिहासात केवळ प्राण्यांची नाहीत, तर निष्ठा, त्याग आणि कर्तव्यपरायणतेची अमर प्रतीके आहेत. ज्यांना भाषा नव्हती, पण स्वामी-निष्ठा होती...

आजच्या काळातही ही परंपरा अखंड आहे. सीमेवर तैनात श्वान स्फोटके शोधतात, घुसखोरीचा इशारा देतात आणि गरज पडल्यास शत्रूसमोर ढाल बनतात. उंच पर्वतांमध्ये उंट व खच्चर रसद पोहोचवतात, जिथे यंत्रे थकतात तिथे जिवंत शक्ती उभी राहते. घोडे परेडमधील शिस्तीइतकेच रणांगणातील धैर्याचेही प्रतीक आहेत. ही मूक सेना दिवस-रात्र, ऊन-पाऊस-हिमवृष्टीत, कोणत्याही अपेक्षेविना आपले कर्तव्य बजावत असते. म्हणूनच भारत ही केवळ भूमी नाही; ती माता आहे, म्हणूनच तिच्या रक्षणासाठी मनुष्याबरोबर मूक जीवसृष्टीही तत्पर असते. भारतीय संस्कृतीने सदैव प्राणिमात्रांमध्ये ईश्वरत्व पाहिले आहे. गाईला माता, नंदीला शंकराचे वाहन, गरुडाला विष्णूचे आसन. ही दृष्टीच आपल्या सैन्यपरंपरेत उतरली आहे. मूक योद्ध्यांना आदर, प्रशिक्षण, संरक्षण देण्यामागे केवळ उपयुक्ततेचा विचार नाही; कृतज्ञतेचा संस्कार आहे. कर्तव्यपथावर जेव्हा हे मूक शिलेदार पावलोपावली पुढे सरकले, तेव्हा त्यांच्या नजरेत अभिमान होता आणि आपल्या मनात ऋणानुबंध. ते आपल्याला आठवण करून देतात की देशभक्ती शब्दांत नव्हे, तर सेवेत असते.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

●● ●●

### भावनांच्या पलीकडचे आभासी विश्व

सध्या मोबाईल व्यक्तीच्या जीवनाचे अभिन्न अंग बनले आहे. सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यंत ही एकमेव अशी वस्तू आहे जी सतत व्यक्तीला चिकटून असते. एखादी वस्तू सर्वाधिक काळ व्यक्तीजवळ असल्यास ती सर्वात प्रिय बनते, मग ती सजीव असो वा निर्जीव! पण या वस्तू बऱ्याच अंशी मानवी शरीरावर व मनावर नकारात्मक प्रभाव टाकतात आणि त्यातून शारीरिक आणि मानसिक व्याधी जडतात. बऱ्याच गोष्टी माणसाला सुखावतात आणि त्यातून आंतरिक चेतन शक्ती निर्माण होऊन त्या गोष्टींचा कायम हव्यास लागतो. बरेचदा या हव्यासाचे व्यसनात रूपांतर होते. परंतु या चेतन क्रियेतून जर सकारात्मक होत असेल तर त्याचा फायदा सुद्धा होतो. उदा. नियमित पुस्तके वाचणाऱ्या व्यक्तीला जर का पुस्तकाचे व्यसन लागले तर त्याच्या बुद्धीचा विकास होईल याउलट दारूचे व्यसन लागले तर बुद्धीचा नाश. मोबाईल अथवा तंत्रज्ञानाचा वापर हा व्यक्तीच्या बुद्धीचा विकासही करतो आणि नाश सुद्धा, त्यामुळे त्याच्या वापरातील कुठल्या गोष्टी फायदेशीर आहेत आणि कुठल्या नुकसानकारक हे ओळखणे तेवढे आवश्यक आहे.

मोबाईल व्यक्तीचे अत्यंत प्रिय साधन होण्यामागे मुख्य कारण आहे तो व्यक्तीने दिलेल्या कमांडवर लगेच प्रोसेस करतो आणि उत्तर देतो. आणि अलिकडे तंत्रज्ञानात झालेले आमूलाग्र बदल ज्यात एआयचा शिरकाव यातून त्याच्याबद्दलची लोकप्रियता अधिकच बळावली आहे. म्हणून हल्ली लोक गमतीने म्हणतात सुद्धा, ''एआयवर शोध भेटेल तुला!'' त्यामुळे सर्व प्रश्नांची उत्तरे तिथे आहे ही खातरजमा नव्या पिढीला होत चालली आहे आणि जर का एखादे उत्तर शोधण्यास तुम्ही समर्थ आहात त्यावेळी दुसऱ्यांची आवश्यकता का? ही एकलकोंडी आणि स्वार्थीपणाची वृत्ती मानवी शरीराची मानसिक व्याधी बनते. मोबाईलवर बऱ्याच गोष्टी सहज उपलब्ध होत असल्यामुळे व्यक्तीमधील संयमी वृत्ती संपत चालली आहे. एखाद्या मनमोहक स्थळाला भेट दिल्यानंतर समोरील दृश्य स्वतःच्या डोळ्यात कायम साठवावे यातून आता ते मोबाईलच्या गॅलरीत सेव कसे होईल याची अधिक धडपड वाढत चालली आहे. यातून लक्षात येते की आभासी जगाचा व्यक्तीच्या मनावर किती मोठा प्रभाव पडत चालला आहे. व्यक्तीच्या मानसिक विकासाचा त्याच्या सर्वांगीण विकासावर प्रभाव पडतो त्यामुळे प्रत्यक्ष जीवनातील माणसे त्यांचे अनुभव ऐकणे आणि त्यांच्यातील चांगले ते घेणे आणि वाईट ते सोडून देणे असे केल्यास आंतरिक चेतन शक्तीचे संचालन योग्य दिशेला होऊन व्यक्तीचा सर्वांगीण विकास होईल.

**डॉ. दुर्गेश्वर साठवणे**/८२०८०६८८५३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी बार्शी शहर व तालुका तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील सि.स.नं.१५५०/४७अ/४ क्षेत्र १०१.१७ चौ.मी.यासी चतुःसिमा पुर्वेस दत्तु बोंदर यांची जागा, दक्षिणेस-रस्ता, पश्चिमेस-सदर नंबरपैकी उर्वरित क्षेत्र, उत्तरेस- सदर नंबरपैकी उर्वरित क्षेत्र

येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक जागा आतील सर्व तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे वापराचे हक्कासह जागा.

वर क्र.१ मध्ये नमूद मिळकत ही श्री. भुषण राजेश जगताप, व संदीप राजेश जगताप यांचे मालकीची आहे. मे. राजलक्ष्मी ट्रेडींग कंपनी, चे प्रोप्रा. राजेश काशिनाथ जगताप यांनी वर नमूद मिळकत ॲक्सेस बँकेचे कॅश क्रेडीट कर्ज खाते टेकओव्हर करणेसाठी व वाढीव खेळत्या भांडवलासाठी आमचे अशिल सांगली अर्बन को. ऑप बँक लि. शाखा बार्शी यांचेकडे कर्ज मागणी केली असून त्याना रुपये २२,००,०००/- चे कर्ज आमचे अशिल बँकेने मंजूर केलेले आहे सदर कर्जाकरीता श्री.भुषण राजेश जगताप, व संदीप राजेश जगताप यांनी जामीनदार म्हणून त्यांची वर नमूद मिळकत आमचे अशिल बँकेचे हक्कात गहाण तारण देण्याचे मान्य केले असून तसा दस्त नोंदवून देणेचेही त्यांनी कबुल केलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असलेचा भरवसा त्यांनी आमचे अशिल बँकेस दिलेला असून सदर मिळकत अन्य कोणत्याही बँकेकडे अगर वित्तीय संस्थेकडे गहाण तारण दिलेली नाही, कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ठ नाहीत अशीही ग्वाही त्यांनी दिलेली आहे.

तरी या जाहीर नोटीसीने सर्वत्रास कळविण्यात येते की, वर नमूद मिळकती संबंधाने जर कोणाचे कांही गहाण, दान, लिज, बोजा व हस्तांतर अगर कर्जबोजाचे हक्क अधिकार असल्यास संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसात आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येवून आमची खातरजमा करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होवू नये व आमचे अशिलाचे हक्काची सर्वत्रास जाणीव व्हावी म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता.०२/०२/२०२६

**सही/-**
**श्री. प्रसाद जे. कुलकर्णी, ॲडव्होकेट**
**लक्ष्मीनृसिंह, कासारवाडीरोड, सिध्देश्वरनगर**
**बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर**
**(अशिलातर्फे पॅनल ॲडव्होकेट)**

## मित्रानेच पोटात हत्यार खूपसून केला खुनाचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचा राग मनात धरून धारदार हत्यार पोटात खूपसून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना छत्रपती शिवाजी महाराज चौकात शनिवारी मध्यरात्री अकराच्या सुमारास घडली.

यात युवराज नारायण आवले (वय-४० रा.बुधले गल्ली, भवानी पेठ) हे जखमी झाले. याबाबत आवले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बिपिन सुभाष घोडके (रा.काळी मशीद जवळ) याच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. जखमी युवराज हा बांधकाम कामगार आहे. आरोपी बीपीन आणि युवराज हे दोघे मित्र असून त्या दोघांमध्ये वारंवार वाद होत होते. शुक्रवारी रात्री युवराजला आरोपीने दारू पिण्यासाठी पैसे मागितले. पण युवराजने पैसे देण्यास नकार दिला, शिवाय दारू ही न पाजल्याने त्याचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादीस, थांब तुला खल्लास करतो असे म्हणून त्याच्या जवळील हत्याराने पोटावर वार केले. तेव्हा युवराज याने अडविण्याचा प्रयत्न केला पण तरीही हत्यार पोटाच्या डाव्या बाजूस खूपसले. गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. रविवारी दुपारी घटनास्थळावर फॉरेन्सिक टीमने भेट दिली. आरोपीचा शोध सुरू असून पथक रवाना झाल्याची माहिती पोलीस निरीक्षक तानाजी दराडे यांनी दिली.

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला – १) सोलापूर क्रॉस रोड शाखा , ता. सोलापूर, जि. सोलापूर शाखेकरिता प्रामुख्याने तळमजल्यावर १७०० स्क्वे फुट (+ – १०%)
२) पाचेगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर शाखेकरिता प्रामुख्याने तळमजल्यावर १२०० स्क्वे फुट (+ – १०%) सर्व सुविधा असलेली कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. २३/०२/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. ०३/०२/२०२६
अहिल्यानगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर

ARL

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१ मंडई, कोंडवाडा व लायसन विभाग, प्रशासकिय इमारत, तिसरा मजला, ई-मेल : mandaivibhag124gmail.com

जा.क्र. मंडई/१३/ | दि. / /२०२६

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर मंडई विभाग**
**ऑफलाईन लिलाव प्रक्रिया जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर शहर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या मंडई विभागाकडील महात्मा फुले मंडई, राणी लक्ष्मीबाई मंडई व कस्तुरबा मंडई मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ या चे कलम ७९ अन्वये व मालमत्ता हस्तांतर नियमास अधिन राहून गाळे निश्चिती तारखेपासून १० वर्ष मुदती करिता नवीन गाळे भाड्याने देण्याकामी मा. सर्वसाधारण सभा प्रशासक ठराव विषय क्र. ३०० दि. १८/११/२०२५ रोजीच्या ठरावाच्या अनुषंगाने ऑफलाईन फेरलिलाव प्रक्रिया पध्दतीने करण्याकामी सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर दि. ०४/०२/२०२६ पासून पाहणेस उपलब्ध आहेत.

**कामाचे नाव :-** शहर सोलापूर येथील महानगरपालिकेच्या मालकीचे मंडई विभागाकडील महात्मा फुले मंडई, राणी लक्ष्मीबाई मंडई, कस्तुरबा मंडई मधील गाळे ऑफलाईन लिलाव प्रक्रिया जाहिर प्रसिध्दी करणे बाबत.

| अ. क्र. | मार्केटचे नाव | गाळ्या क्र. | गाळ्यांचे क्षेत्रफळ | नवीन ठरावानुसार वाढीव दराने प्रतिमाहे भाडे र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | महात्मा फुले मंडई | तळमजला क-२,५ | ७.२७ | १३९८ |
| २ | | तळमजला क - ०९ ते १४ | ७.७३ | १४८९ |
| | | तळमजला क- १७,१९, २० | ६.९३ | १३३४ |
| | | तळमजला क - २२ | ६.९३ | २०८७ |
| | | तळमजला क - २३,२४ | ६.९३ | १३३४ |
| | | तळमजला ड- ११,१२ | ८.८३ | २१२२ |
| | | तळमजला ड- १७,१८,१९ | ७.२७ | १३९८ |
| | | पहिला मजला क - २ ते ५ | १४.२५ | २७४१ |
| | | पहिला मजला क - ८,९,१३ | १४.२५ | २७४१ |
| | महात्मा फुले मंडई | दुसरा मजला मध्यवर्ती - ३,७ | ३.४३ | ६६२ |
| २ | राणी लक्ष्मीबाई मंडई | केळी गोडाऊन - १ ते ४० | ६.६६ | २२९५ |
| | | १९ ते २९ (म.न.पा. ताब्यात) | १०.९ | ४९६३ |
| | | ३३ | १३.४ | ४९८६ |
| | | ३५ ते ४४ | १३.४ | ४९८६ |
| ३ | कस्तुरबा मंडई | ८० | १३.३ | १७०२ |

सदरचे ऑफलाईन ऑक्शन फेर लिलाव प्रक्रिया दि.१२/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते ०६.०० वाजेपर्यंत घेण्यात येईल. सदर ऑफलाईन ऑक्शन करीता लागणारे कागदपत्राची छाननी व प्रवेश शुल्क भरण्याचे दि. ०४/०२/२०२६ ते दि. ११/०२/२०२६ रोजी पर्यंत सकाळी ११.०० ते ०४.०० वाजेपर्यंत करणेत येईल.

टिप :- गाळे फेरलिलावा मध्ये भाग घेण्यासाठी प्रवेश शुल्क रक्कम रु. २०००/- इतकी राहिल.

**नियंत्रण अधिकारी**
**मंडई, कोंडवाडा व लायसन विभाग**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

नि.५
पुढील नेमली ता.१२/०३/२०२६
दिवाणी किरकोळ अर्ज नं. १२३/२०२५

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात

**१) पांडुरंग शिवाजी पाटील,** वय- ५४ वर्षे,
धंदा - व्यापार, रा. पानगाव, ता. बार्शी, सध्या सर्व्हे नं. १२/२, घर नं. ४८८, पुणे सातारा रोड, वॉटर टँकजवळ, सुंदरनगर, मांगडेवाडी, कात्रज, पुणे ४११०४६
**२) मधुकर शिवाजी पाटील,** वय- ५२ वर्षे,
धंदा - व्यापार, रा. पानगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर ह.मु. सर्व्हे नं. ३४/१८, शिवराज बिल्डींग, राजेचौक, लेन नं. ४ समोर, विद्याधन बिल्डींगजवळ, धनकवडी, पुणे ४११०४३
**३) प्रभावती नारायण वीर,** वय ६० वर्षे,
धंदा - घरकाम, रा. मोहा, ता. कळंब, जि. धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०७
**४) चंदाराणी जयसिंग जाधव,** वय ४८ वर्षे,
धंदा - घरकाम, रा. २५/४, लवंग, टेंभुर्णी, वाघोली रोड, लवंग, ता. माळशिरस, जि. सोलापूर ४१३११२
**-- अर्जदार**

**विरूध्द**

**किसन शिवाजी पाटील,** वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. पानगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर, ह.मु. स्वामी समर्थ नगर, बार्शी वैराग रोड, वैराग, ता. बार्शी ४१३४०२ **-- सा.वाला**

**ज्या अर्थी,** अर्जदार व सा.वाला यांच्या मयत आई द्रौपदीबाई शिवाजी पाटील ही दि. १४/०७/२०२५ रोजी मौजे पानगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेल्या आहेत. यातील अर्जदार नं. १, २ व सा.वाला हे मयत द्रौपदीबाई यांची मुले आणि अर्जदार नं. ३ व ४ ह्या मुली आहेत त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांनी स्वतः व सा.वाला करीता या मे. कोर्टात सदरहू मयत द्रौपदीबाई शिवाजी पाटील यांचे पश्चात लिगल हेअरशिप सर्टीफिकीट मिळावे यासाठी अर्ज केला आहे.

**त्या अर्थी,** अर्जदार व सा.वाला हे सदरहू मयताचे वारसदार नाहीत असे कोणास सांगण्याचे असेल तर संबधितांनी या जाहीर प्रसिध्दीकरणाच्या तारखेपासून १ महिन्याचे आत या मे. कोर्टात हजर होवून आपल्या लेखी हरकती पुराव्या दाखल कागदपत्र दि १२/०३/२०२६ रोजी अगर वर नमूद मुदतीत सादर कराव्यात.

सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दिलेस सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दलपुरावा घेवून त्यांना मयत द्रौपदीबाई शिवाजी पाटील यांचे पश्चात कायदेशीर वारस म्हणून लिगल हेअरशीप सर्टीफिकीट देईल.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. ता. ०९/०१/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर बार्शी**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर बार्शी**

## बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### नियम - ८ (१)
### ताबा सूचना

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, २३/१०/२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, ३१/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- नवीपेठ**<br>**कर्जदार -**<br>**श्री. ऋतुराज भालचंद्र नेलेगावकर**<br>पत्ता: फ्लॅट क्रमांक १२ नाथ प्राइमा अपार्टमेंट, ७० रेल्वे लाईन उत्तर सोलापूर ४१३००१. | १. रो हाऊस क्रमांक ६/१०६, प्लॉट क्रमांक ७, एस नंबर ८५/ए/३ए/१, ८५/ए/३ए/२, पार्वती नगर, देगाव, उत्तर सोलापूर, सोलापूर ४१३ ००२ (श्री. ऋतुराज भालचंद्र नेलेगावकर यांच्या मालकीचे)<br>**सीमा पुढीलप्रमाणे :**<br>पूर्व : मागील मार्जिन<br>पश्चिम : समोरील मार्जिन<br>दक्षिण : युनिट क्रमांक ०६/१०५<br>उत्तर : युनिट क्रमांक ०६/१०७<br>CERSI : २०००६१५७५९९५<br><br>२. रो हाऊस क्रमांक ६/१०८, प्लॉट क्रमांक ७, एस नंबर ८५/ए/३ए/१, ८५/ए/३ए/२, पार्वती नगर, देगाव, उत्तर सोलापूर, सोलापूर ४१३ ००२ (श्री. ऋतुराज भालचंद्र नेलेगावकर यांच्या मालकीचे)<br>**सीमा पुढीलप्रमाणे :-**<br>पूर्व :- मागील मार्जिन<br>पश्चिम :- समोरील मार्जिन<br>दक्षिण :- युनिट क्रमांक ०६/१०५<br>उत्तर :- युनिट क्रमांक ०६/१०७ | **मागणी सूचना :**<br>दि. २३.१०.२०२५<br>**खात्यातील शिल्लक**<br>रु.३५,४७,७२१.५६/-<br>**लागू न केलेले व्याज**<br><br>**एकूण** = रु.३५,४७,७२१.५६/-<br>(रुपये पस्तीस लाख सत्तेचाळीस हजार सातशे एकवीस आणि छप्पन पैसे फक्त रुपये)<br>**सांकेतिक ताबा**<br>**दिनांक :** ३१/०१/२०२६ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 31/01/2026**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर-४१३३०४
दुरध्वनी क्रमांक ०२१८६ / २२६९७५
Web-www.mahapwd.gov.in email ID-pandharpur.eemahapwd.gov.in

**ई-निविदा सूचना क्रमांक ३७ सन २०२५-२०२६ (ऑनलाईन) प्रशिध्दी**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर -४१३३०४ (दुरध्वनी क्रमांक ०२१८६/२२६९७५) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून या कार्यालयाचे ०९ कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा **दिनांक ०३/०२/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा.** पासून आहे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई निविदा संचाची किंमत | कंत्राटदारचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शासकीय विश्रामगृह सांगोला येथे फर्निचर करणे ता. सांगोला जि. सोलापूर | बी-१ | रु. ४४,११,४११/- | ४४,५००/- ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे व्दारे | ०६ महिने (पावसाळयासह) | ६००/- ऑनलाईन के (ना-परतावा) पेमेंट गेटवे कार | वर्ग आय-४ व त्यावरील |

### ई-निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांक ०३/०२/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा. ते दिनांक १०/०२/२०२६ वेळ सायं, १७.३० वाजेपर्यंत |
| २. | ऑनलाईन निविदा मध्ये तांत्रिक मुद्दे उपस्थित करावयाचा अंतिम दिनांक व वेळ **(निविदा पूर्व चर्चा बैठक)** | ---- निरंक --- |
| ३. | बिड सबमिशन कालावधी | दिनांक ०३/०२/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा. ते दिनांक १०/०२/२०२६ वेळ सायं. १७.३० वाजेपर्यंत |
| ४. | तांत्रिक आणि आर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, पंढरपूर या कार्यालयात दिनांक ११/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

**टिप :-**
१. वरील कामांची सर्व माहिती ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahupwd.gov.in and https://mahatenders.gov.in या इंटरनेटवरील वेबसाईटवर दिनांक ०३/०२/२०२६ पासून उपलब्ध आहे. सादर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.
२. सर्व पात्र इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या www.mahatenders.gov.in वर enrolled करणे आवश्यक आहे.
३. इत्तर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
४. ई-निविदा पोर्टलवर बोड लॉक झाल्यानंतर निविदांबाबत हार्ड कॉपी एका प्रतीत कंत्राटदारानी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात सापर करणे अनिवार्य आहे.

**सही/-**
**(अमित निमकर)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर**

अुत्तम सेवा

मंगळवार
दि. ०३ फेब्रुवारी २०२६

## नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **भारतीय डाक विभाग** | | | |
| १ | डाक सेवक/ब्रांच पोस्ट मास्टर/ असि ब्रांच पोस्टमास्टर (२८०००+ पदे) | दहावी उत्तीर्णा स्त्री/पुरुष उमेदवार | ४० पर्यंत | १४/०२/२६ |
| **२)** | **भारतीय रेल्वे, RRB** | | | |
| १ | असिस्टंट/पॉइंट्समन/ ट्रॅकमन/ट्रॅकमेंटेनर (२२१९५) | दहावी उत्तीर्णा स्त्री/पुरुष उमेदवार | ३३ पर्यंत | ०३/०२/२६ |
| **३)** | **भारतीय स्टेट बँक, SBI** | | | |
| १ | सर्कल बेस्ड ऑफिसर्स (२२७३) | पदवी व संबंधीत २ वर्षे अनुभव | ३० पर्यंत | १८/०२/२६ |
| **४)** | **रिझर्व बँक ऑफ इंडिया, RBI** | | | |
| १ | ऑफिस अटेंडंट (५७२ पदे) | दहावी उत्तीर्णा स्त्री/पुरुष उमेदवार | २५ पर्यंत | ०४/०२/२६ |
| **५)** | **राष्ट्रीय कृषी व ग्रामिण विकास बँक, NABARD** | | | |
| १ | डेव्हलपमेंट असि. (१५९ पदे) | पदवी (५०%) उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार व संगणक ज्ञान आवश्यक | ३५ पर्यंत | ०३/०२/२६ |

**✼ मोफत सरकारी अपडेट ✼**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **६)** | **नवी मुंबई महानगरपालिका, NMMC (मुदतवाढ)** | | | |
| १ | कनिष्ठ अभियंता (१२ पदे) | अभियांत्रिकी पदवी (विद्युत/यांत्रिकी) उत्तीर्ण असणारे स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | १९/०२/२६ |
| २ | सहा. आयुक्त (०५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा

१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.

www.uttamseva.org

## ई-निविदा सूचना
### क्र. 11/ 2025-26

महावितरण

कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य विभाग बारामती, ऊर्जाभवन यांच्या अखत्यारीतील स्थापत्य दुरूस्तीच्या कामासाठी 2025-26 साठी पात्र बोलीदाता / एजन्सीज कडून **निविदा क्र. टी- 039 दुसरा कॉल, टी-080 ते 081 / 2025-26** करिता बोली (बिड्स) मागविण्यात येत आहेत. निविदा फक्त इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणालीमधूनच प्रक्रिया केली जातील आणि महावितरणच्या कामकाजासाठी ई-निविदा प्रणालीवर नोंदणी केलेल्या विक्रेत्यांसाठी खुली असेल. बिड कागदपत्रे **03.02.2026 ते 09.02.2026 दुपारी 12.00 पर्यंत** संकेतस्थळावर उपलब्ध राहतील निविदा सादर करण्यासाठी मुदत **09.02.2026 दुपारी 03.00 पर्यंत** आहे. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या संकेतस्थळावर **www.mahadiscom.in** ला भेट द्यावी बोलीदातांना या आणि भविष्यातील ई-निविदा साठी स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे.

**कार्यकारी अभियंता (स्था)**
**स्थापत्य विभाग, बारामती**

**PRO/BMTZ/182/2025-26**

## ताबा नोटीस नमुना 'झेड' (Z NOTICE)

**म.स.सं. नियम १९६० मधिल नियम १०७ (११) ड-१**

## जिजाऊ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्याअर्थी मला प्राप्त अधिकारानुसार भी गोपीचंद अरुण तुकशेट्टि विशेष वसुली व विक्री अधिकारी **जिजाऊ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी** म.स.सं. नियम १९६१ अन्वये खालील थकबाकीदार यांना मागणी नोटीसद्वारे त्यांच्याकडिल येणे रक्कम भरण्यास कळविले होते. मात्र त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केली आहे. त्यामुळे यांच्या स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत सदरचे जप्ती आदेश संस्थेच्य दप्तरी थकबाकीदार यांना पाहण्यास मिळेल. खातील ऋणकोने रक्कम भरण्यास कसुर केल्याने ऋणकोंना नोटीस देण्यात येते की, खाली निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने म.स.सं. १९६१ मधिल नियम १०७ (११) (ड) (१) नुसार असलेल्या अधिकारान्चये रितसर बोजा नोंद करून प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तनाग नागरिकांना या नोटीसद्वारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी विकी, गहान, दान, टाच, बोजा, किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत. याउपर कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो **जिजाऊ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी** यांच्या खाली दर्शविलेल्या येणे बाकी, बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज, वसुलीखर्च. यांच्या कायदेशिररित्या अधिन राहावे लागेल याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कर्जदार /जामिनदार | मिळकतदार | दाखला क. दिनांक | ३१/०१/२६ अखेर येणेबाकी | मिळकत ठिकाग | मिळकत कमांक | क्षेत्र | मालमत्ता प्रतिकात्मक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमोल नारायण अनागुंडे<br>आकाश सुनिल नवगिरे<br>सिध्देश्वर शंकर शेवते | अमोल नारायण अनागुंडे | ७८/२०२५<br>१७/०४/२०२५ | १,१०,९०४/- | बार्शी, ता. बार्शी | ४४४ | ०.००.७६ पैकी | ०२/०२/२०२६ |
| २ | नागेश सुरेश गायकवाड<br>स्मिता सुरेश शेळके | स्मिता सुरेश शेळके | १०२८/२०२४<br>३०/०१/२०२४ | ९२,४२५/- | बार्शी, ता. बार्शी | १४५० | ०.६६.०० | ०२/०२/२०२६ |
| ३ | नवनाथ गोरख जाधवर<br>सतिष बलभिम जाधवर<br>गोरख दत्तु जाधवर | नवनाथ गोरख जाधवर<br>सतिष बलभिम जाधवर<br>गोरख दत्तु जाधवर | ७४/२०२५<br>१७/०४/२०२५ | १,८६,०३९/- | बोरगाव खु<br>ता. बार्शी<br>बोरगाव खु.<br>बोरगाव खु. | ६३<br>१०३<br>१०४ | ०/०९.५०<br>०/०९<br>०/३६<br>०/३६ | ०२/०२/२०२६ |
| ४ | धवल गणेश बदाले<br>शर्मिला गणेश बदाले<br>शिवाजी राजेंद्र वाघमारे | सुभद्राबाई बदाले | १०३१/२०२४<br>३०/०१/२०२४ | २,७३,१०३/- | बार्शी, ता. बार्शी | सि.स.क.<br>३८०२ | ४९.९० चौ.मी.पैकी | ०२/०२/२०२६ |
| ५ | दशरथ जालिंदर कुंभार<br>लक्ष्मण महादेव कुंभार<br>कैलास हनुमंत कांदे | लक्ष्मण महादेव कुंभार | ६९/२०२५<br>१७/०४/२०२५ | १,३०,६९९/- | बार्शी, ता. बार्शी | १४०२ | २.०९.८३ पैकी | ०२/०२/२०२६ |
| ६ | पल्लवी समाधान कदम<br>अतुल अंकुश भिसे<br>विजय सोमनाथ खंदोडे | पल्लवी समाधान कदम<br>अतुल अंकुश भिसे<br>विजय सोमनाथ खंदोडे | ७२/२०२५<br>१७/०४/२०२५ | ५,२८,४५८/- | सौंदरे, ता. बार्शी<br>पानगाव, ता. बार्शी<br>सौंदरे, ता. बार्शी | १३५<br>१७५/२<br>५४२/२ | १/४०<br>१/००<br>१/२३ पैकी | ०२/०२/२०२६ |

ही ताबा नोटीस दिली असे.

शिक्का

**सही/-**
**श्री. गोपीचंद अरूण तुकशेट्टी**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**जिजाउ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### बॅडमिंटन आशिया सांघिक स्पर्धेतून सिंधूची माघार

**किंगदाओ** : चीनमधील किंगदाओ येथे मंगळवारपासून सुरू होणाऱ्या बॅडमिंटन आशिया सांघिक अजिंक्यपद स्पर्धेतून भारताची स्टार खेळाडू पी.व्ही. सिंधू हिने माघार घेतली आहे.



आता सिंधूविना भारतीय महिलांसमोर विजेतेपद राखण्याचे मोठे आव्हान आहे, तर पुरुष संघ लक्ष्य सेनसह अनुभवी खेळाडूंच्या जोरावर पदक मिळवण्याचा प्रयत्न करेल. गत वेळी मलेशियात झालेल्या स्पर्धेत भारतीय महिलांनी पहिले सांघिक सुवर्णपदक जिंकून इतिहास घडविला होता, परंतु दुखापतग्रस्त सिंधूच्या अनुपस्थितीमुळे यावेळी त्यांच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती खेळाडू संघाबाहेर असल्यामुळे आता सर्व जबाबदारी तन्वी शर्माच्या नेतृत्वाखालील युवा संघावर आली आहे. पंजाबची १७ वर्षीय तन्वी २०२४ मध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या संघाचा भाग होती, मात्र त्यावेळी ती कोणत्याही सामन्यात खेळली नव्हती. गत दोन वर्षांत तन्वीने महिला एकेरीत एक उदयोन्मुख खेळाडू म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. तिने गुवाहाटी येथील जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक आणि अमेरिकन ओपन सुपर ३०० स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले आहे. ■

### आशियाई नेमबाजी स्पर्धेत बांगलादेशचा एकमेव खेळाडू

**ढाका** : बांगलादेश आगामी आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भाग घेण्यासाठी एकाच नेमबाजाला भारतात पाठवणार आहे. ही स्पर्धा २ ते १४ फेब्रुवारी दरम्यान नवी दिल्लीतील करणी सिंग शूटिंग रेंजमध्ये होणार आहे. पाकिस्तान व चीनच्या संघाने या स्पर्धेत भाग घेतला नाही. मोहम्मद रोबिउल इस्लाम १० मीटर एअर रायफल स्पर्धेत भाग घेणार आहे. २६ वर्षीय मोहम्मद रोबिउलसोबत प्रशिक्षक शर्मिन अख्तर असतील. बांगलादेशने महिलांच्या १० मीटर रायफल नेमबाज शायरा अरेफिनलाही पाठवण्याची योजना आखली होती आणि भारतीय सरकारकडून मंजुरीसाठी तिचे नाव पाठवले होते, परंतु त्या नेमबाजाने स्पर्धेतून माघार घेतली आहे.

# दिल्ली कॅपिटल्सचे अंतिम फेरी गाठण्याचे लक्ष्य

## गुजरात प्रथमच अंतिम फेरीत पोहोचण्याच्या प्रयत्नात

◆ **बडोदा, २ फेब्रुवारी**

पहिल्या तीन हंगामात उपविजेता ठरलेल्या दिल्ली कॅपिटल्सचा संघ मंगळवारी येथे महिला प्रीमियर लीगच्या एलिमिनेटर सामन्यात महत्त्वाकांक्षी गुजरात जायण्ट्स संघाविरुद्ध खेळताना सलग चौथ्यांदा अंतिम फेरीत पोहोचण्याचा प्रयत्न करेल.

महिला प्रीमियर लीगच्या आतापर्यंतच्या संक्षिप्त इतिहासातील सर्वात सातत्यपूर्ण संघांपैकी एक असलेल्या दिल्ली कॅपिटल्सने पुन्हा एकदा साखळी टप्पा यशस्वीपणे पार करत अव्वल तीन संघांमध्ये स्थान मिळवले आहे, त्यामुळे ते आतापर्यंतच्या चारही हंगामात प्लेऑफसाठी पात्र ठरणारा एकमेव संघ बनला आहे.

तथापि, त्यांचा २०२६ चा हंगाम संमिश्र राहिला आहे, यात वर्चस्व व सातत्यहीनता या दोन्ही गोष्टी दिसून आल्या आहेत. त्यांनी आतापर्यंत चार सामने जिंकले आहेत, तर तितकेच सामने गमावले आहेत. दिल्लीच्या गोलंदाजीची धुरा वेगवान गोलंदाज नंदिनी शर्माने सांभाळली असून ती अखेरच्या षटकांमध्ये प्रभावी ठरली आहे. तिने आपल्या १४ पैकी बहुतेक बळी अंतिम षटकांमध्ये घेऊन संघाला चुरशीच्या सामन्यांमध्ये स्पर्धेत टिकवून ठेवले आहे. तिला डावखुरी फिरकी गोलंदाज श्री चरणी (१४ बळी) हिने चांगली साथ दिली आहे, तर अनुभवी दक्षिण आफ्रिकन अष्टपैलू मारिझान कॅप (१० बळी) सातत्यपूर्ण आणि विश्वसनीय कामगिरी करत आहे.



जेमिमाह रॉड्रिग्स



अॅशले गार्डनर

फलंदाजीत, कॅपच्या सहकारी लॉरा वोल्वार्ड (२४१ धावा) आणि लिझेल ली (२४०) यांनी डावाच्या सुरुवातीला संघाला मजबूत सुरुवात दिली आहे, मात्र भारतीय सलामीवीर शफाली वर्माचे (२०८) सातत्यहीन प्रदर्शन ही चिंतेची बाब आहे.

तथापि, कर्णधार जेमिमा रॉड्रिग्सने संपूर्ण हंगामात सातत्यासाठी संघर्ष केल्यानंतर, मागील सामन्यात दबावाच्या परिस्थितीत आपला फॉर्म परत मिळवल्याने कॅपिटल्स संघाला दिलासा मिळेल.

दुसरीकडे, गुजरात जायण्ट्स संघ तीन सामन्यांतील पराभवाच्या मालिकेतून प्रभावीपणे सावरल्यानंतर आत्मविश्वासाने एलिमिनेटर सामन्यात उतरत आहे.

गुजरात जायण्ट्सने सलग तीन सामने जिंकले, यात गतविजेत्या मुंबई इंडियन्सविरुद्ध ११ धावांच्या आत्मविश्वास वाढवणाऱ्या विजयाचा समावेश आहे. दोन वेळच्या विजेत्या संघाविरुद्धचा हा त्यांचा पहिलाच विजय होता व त्यामुळे त्यांनी बाद फेरीत आपले स्थान निश्चित केले.

या हंगामात दिल्ली कॅपिटल्सला दोन्ही लीग सामन्यांमध्ये पराभूत केल्यामुळेही त्यांना आत्मविश्वास मिळेल, ज्यात अनुभवी न्यूझीलंडची खेळाडू सोफी डिव्हाइनने दोन्ही प्रसंगी निर्णायक भूमिका बजावली होती. न्यूझीलंडची ही स्टार खेळाडू स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली आहे, तिने आठ सामन्यांत १७ बळी घेत सर्वाधिक बळी घेणारी गोलंदाज म्हणून स्थान मिळवले आहे, तसेच दोन अर्धशतकांसह २३७ धावांची खेळीही केली आहे. तिचा प्रभाव पुन्हा एकदा महत्त्वाचा ठरेल. जॉर्जिया वेअरहॅमच्या फॉर्ममध्ये परतल्यामुळे गुजरात संघालाही बळ मिळाले आहे. गुजरात जायण्ट्स संघ ऑस्ट्रेलियाची अनुभवी खेळाडू बेथ मुनी आणि कर्णधार अॅशले गार्डनर यांच्याकडूनही महत्त्वाच्या योगदानाची अपेक्षा करेल.

◀(वृत्तसंस्था)

# पाकिस्तानला फटकारण्याचा आयसीसीला अधिकार : राजीव शुक्ला

◆ **नवी दिल्ली, २ फेब्रुवारी**

१५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे भारताविरुद्ध होणाऱ्या टी-२० विश्वचषक सामन्यातून निवडकपणे माघार घेतल्याबद्दल पाकिस्तानला गंभीर परिणामांचा इशारा देऊन आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) योग्यच केले आहे. पाकिस्तानला फटकारण्याचा आयसीसीला अधिकार आहे, बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी सोमवारी सांगितले.



या महत्त्वाच्या सामन्यावर बहिष्कार टाकल्यास दंडात्मक कारवाई होऊ शकते आणि हा निर्णय सर्वसाधारणपणे खेळाच्या हिताचा नाही, असा आयसीसीने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला आधीच इशारा दिला आहे.

आम्ही आयसीसीशी पूर्णपणे सहमत आहोत. आयसीसीशी संवाद साधेपर्यंत बीसीसीआय कोणतीही टिप्पणी करणार नाही, असेही शुक्ला यांनी सांगितले.

बीसीसीआयच्या सूचनेनुसार, अनिर्दिष्ट कारणांमुळे बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला आयपीएलमधून बाहेर काढल्याने या वादाला तोंड फुटले. त्यानंतर बांगलादेशने सुरक्षेच्या कारणास्तव भारतात जाण्यास नकार दिला. सध्या ज्या प्रकारे खेळाला ओलीस ठेवले जात आहे, तसे करता येणार नाही, असे काँग्रेसचे खासदार शशी थरूर म्हणाले.

**अनेक निर्बंध लादण्याची शक्यता**

पाकिस्तानवर अनेक निर्बंधांची शक्यता आहे, ज्यात जागतिक कसोटी अजिंक्यपदाचे गुण कमी करणे, आयसीसी क्रमवारीत कोणताही बदल न होणे, प्रमुख सदस्य राष्ट्रांचे संघ पाकिस्तान दौरा करण्यास नकार देणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे - पाकिस्तान सुपर लीगमध्ये खेळाडूंच्या सहभागावर निर्बंध घालणे यांचा समावेश आहे.

पाकिस्तानचा पहिला सामना ७ फेब्रुवारी रोजी नेदरलॅण्डविरुद्ध, त्यानंतर १० फेब्रुवारी रोजी अमेरिकेविरुद्ध आणि १८ फेब्रुवारी रोजी नामिबियाविरुद्ध होणार आहे. त्यांचे सर्व सामने कोलंबो येथील एसएससी मैदानावर खेळले जातील.

◀(वृत्तसंस्था)

**२५० कोटी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होण्याची शक्यता**

भारत-पाकिस्तान सामना हा कोणत्याही आयसीसी स्पर्धेतील सर्वात बहुप्रतिक्षित सामना असतो, जो जागतिक स्तरावर सर्वाधिक प्रेक्षकसंख्या, प्रायोजकत्व आणि प्रसारण महसूल मिळवून देतो. यजमान प्रसारकाला जाहिरात महसुलाचे नुकसान होऊ शकते. हा महसूल एका मोठ्या सामन्यासाठी २०० कोटी ते २५० कोटी रुपयांपर्यंत असू शकते. यात १० सेकंदांच्या जाहिरातीसाठी ४० लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. ■

**पीसीबीवर दंड ठोठावणार**

जरी पुढे चालमुळे भारताला पूर्ण गुण मिळतील, तरीही आयसीसीकडे पीसीबीवर आर्थिक दंड लावण्याचा अधिकार आहे. पुढे चाल मिळवण्यासाठी प्रतिस्पर्धी संघ नाणेफेकीच्या वेळी मैदानावर उपस्थित असणे आवश्यक आहे. त्यामुळे भारतीय संघ श्रीलंकेला प्रवास करेल आणि सूर्यकुमार यादव नाणेफेकीसाठी मैदानात उतरेल. एकदा पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगा उपस्थित न झाल्यास, सामनाधिकारी भारताला पुढे चाल व दोन गुण देईल. ■

# राष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धेत सोलापूरची २४ पदकांची कमाई

**१२ सुवर्ण, ११ रौप्य व १ कांस्य पदकांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

नाशिक येथे झालेल्या पहिल्या संयुक्त राष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धेत येथील जलतरणपटूंनी १२ सुवर्ण, ११ रौप्य व १ कांस्य अशी २४ पदकांची कमाई केली. त्यांचे सोलापूर जिल्हा हौशी जलतरण संघटनेने अभिनंदन केले आहे.

**कामगिरी :**

**श्रध्दा यलगम (१ सुवर्ण, २ रौप्य)** : ४०० मीटर फ्री स्टाईल सुवर्ण, १०० व २०० मीटर फ्री स्टाईल रौप्य.

**गुरुलिंग कन्नूरकर (३ सुवर्ण)** : ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक, बॅक स्ट्रोक व फ्री स्टाईल.

**शंकर कस्तुरी (३ सुवर्ण)**: २०० मीटर वैयक्तिक मिडले, ५० व १०० मीटर बटरफ्लाय.

**सुरेश मिठ्ठाकोल (२ सुवर्ण,१ रौप्य)** : २०० मीटर वैयक्तिक मिडले व १०० मीटर बटरफ्लाय सुवर्ण, १०० मीटर बॅकस्ट्रोक रौप्य.

**चंद्रविलास बिराजदार (१ सुवर्ण, २ रौप्य)** : २०० मीटर वैयक्तिक मिडले सुवर्ण, १०० मीटर बॅकस्ट्रोक व १०० मीटर बटरफ्लाय रौप्य.

**शंकर करजगी (१ सुवर्ण,२ रौप्य)**: ५० मीटर बटरफ्लाय सुवर्ण, ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक व ५० मीटर फ्री स्टाईल रौप्य.

**रविकांत पतंगे (१ सुवर्ण, १ रौप्य, १ कांस्य)** : ५० मीटर फ्री स्टाईल सुवर्ण, ५० मीटर बॅक स्ट्रोक रौप्य, १०० मीटर बॅकस्ट्रोक कांस्य.

**ओंकार गायकवाड (२ रौप्य)** : १०० मीटर बॅक स्ट्रोक, ५० मीटर बॅकस्ट्रोक.

**जयेस हेडगिरे (१ रौप्य)** : २०० मीटर वैयक्तिक मिडले.





# १४ वर्षे वयोगट व्हॉलीबॉल निवड चाचणी संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

नॅब संचलित स्वामी विवेकानंद प्रशालेमध्ये जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या वतीने १४ वर्ष वयोगट मुले व मुली यांची निवड चाचणी संपन्न झाली.

याचे उद्घाटन सोलापूर शहर जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ अध्यक्ष अध्यक्ष दशरथ गुरव, व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव अनिल गिराम, खंडू शिंदे, सुभाष माने, बाबूलाल इंगळगी, प्रशांत बिराजदार, श्री.पाटील आदी उपस्थित होते.

या निवड चाचणीतून निवडलेल्या संघ दिनांक ३ फेब्रुवारी रोजी फुरसुंगी सासवड रोड पुणे येथे होणाऱ्याविभागीय स्पर्धेत भाग घेईल.

# अजितदादा हे खेळाला न्याय देणारे नेते होते

**खो-खो असोसिएशनच्या श्रध्दांजली सभेत महेश गादेकर यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे अध्यक्ष अजितदादा पवार हे किशोर गटाला प्रोत्साहन म्हणून राज्य अजिंक्यपद स्पर्धा आयोजन करण्यासाठी संबंधित जिल्हा संघटनेला आर्थिक सहाय्य करीत होते. त्यांच्यामुळे राष्ट्रीय खो-खोपटूंना विद्युत मंडळात व विविध जिल्हा क्रीडा कार्यालयात सेवा मिळाली आहे. खेळाला न्याय देणारे ते नेते होते, असे सोलापूर अॅम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर बोलत होते.




उपमुख्यमंत्री पवार यांच्या निधनानिमित्त हॉटेल सिटी पार्क येथे श्रद्धांजली सभा आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी असोसिएशनचे उपाध्यक्ष श्रीकांत ढेपे, अजितकुमार संगवे, सदस्य रवींद्र नाशिककर यांनीही त्यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी असोसिएशनचे ज्येष्ठ सदस्य मनोज संगावार, विजय तडसरे, गुलाम मुजावर, सुरेश खुर्द भोसले, उपाध्यक्ष सुनील चव्हाण, सचिव उमाकांत गायकवाड, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सहसचिव मोहन रजपूत, राजाराम शितोळे, सदस्य प्रिया पवार, सोनाली केत, अजित शिंदे, पुंडलिक कलखांबकर व शिवशंकर राठोड आदी उपस्थित होते.

# पाकिस्तानचा संघ श्रीलंकेसाठी रवाना

◆ **कराची, २ फेब्रुवारी**

पाकिस्तानचा संघ सोमवारी श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी रवाना झाला आणि स्पर्धेत भारताविरुद्ध खेळण्यास नकार दिल्याबद्दल आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून (आयसीसी) कोणत्याही संभाव्य कारवाईची वाट पाहत होता.

पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) जारी केलेल्या व्हिडीओमध्ये क्रिकेटपटू लाहोरमधील एका हॉटेलमधून विमानतळाकडे जाण्यासाठी बसमध्ये चढताना त्यांच्या नवीन विश्वचषक किटमध्ये दिसले.

भारत या विश्वचषकाचे सह-आयोजक आहे, परंतु भारतासोबतच्या राजकीय तणावामुळे पाकिस्तान आपले सर्व सामने श्रीलंकेत खेळणार आहे, यात बाद फेरीतील सामन्यांचाही समावेश आहे. रविवारी पाकिस्तान सरकारने संघाला विश्वचषकात खेळण्याचे, परंतु १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये भारताविरुद्धच्या गट सामन्यावर बहिष्कार टाकण्याचे निर्देश दिल्याने क्रिकेट जगतात खळबळ उडाली. सरकारने आपल्या एक्स खात्यावर याचे कोणतेही कारण दिले नाही. पीसीबीने आयसीसीला अधिकृत सूचना दिलेली नाही, असे वृत्त आहे. याचे परिणाम भोगावे लागतील असा कडक इशारा आयसीसीने पाकिस्तानला दिला आहे.

### 'केएलई'च्या रीत धरमसीला तिहेरी मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी -**

जुळे सोलापूर येथील केएलई स्कूलच्या रीत अंकित धरमसी हिने जलतरण स्पर्धेत तीन प्रकारात प्रथम क्रमांक पटकावित तिहेरी मुकुट संपादला.



तिने १० वर्षांखालील गटात ५० मीटर फ्री स्टाईल, ब्रेस्ट स्ट्रोक व बॅक स्ट्रोकमध्ये ही कामगिरी केली. तिने या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट जलतरणपटूचाही मान मिळविला. तिला रीत ही ज्येष्ठ प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले.

# महाराष्ट्राचे दोन्ही संघ उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**किशोर व किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**हरियाणा, दि. २ फेब्रुवारी-**

कुरुक्षेत्र, हरियाणा येथे सुरु झालेल्या ३५ वी किशोर व किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्रच्या दोन्ही संघांनी उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

थीम पार्क मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत उपउपांत्यपुर्व सामन्यात किशोर गटात महाराष्ट्र संघाने हरयाणाचा एक डाव १८ गुणांनी (२८-१०) पराभव केला. विजयी महाराष्ट्राकडून अभिराज वालंज (२.१० मी. संरक्षण), प्रफुल्ल वासावे (नाबाद १.५०, २.५० मि. संरक्षण व २ गुण), सोहम देशमुख (३ मि. संरक्षण व ४ गुण), वेदांत गायकवाड (८ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. हरयाणाकडून हिमान (१.४०, १.३० मि. संरक्षण व ४ गुण), योदीत (१.१५ मि. संरक्षण) यांनी चांगला खेळ केला.



**उपउपांत्यपूर्व फेरीत पोहोचलेले संघ**

**किशोर** : महाराष्ट्र, पंजाब, मणिपूर, राजस्थान, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, दिल्ली, ओडिसा, कर्नाटक, उत्तरप्रदेश, छत्तिसगड, विदर्भ, गुजरात, कोल्हापूर, हरयाणा, तेलंगणा.

**किशोरी** : महाराष्ट्र, उत्तराखंड, उत्तरप्रदेश, विदर्भ, छत्तीसगड, पंजाब, हिमाचल प्रदेश, कोल्हापूर, राजस्थान, केरळ, ओडिसा, गुजरात, पश्चिम बंगाल, हरयाणा, मणिपूर, कर्नाटक.

**विदर्भ व कोल्हापूरच्या किशोर संघाचीही बाजी**

दुसऱ्या सामन्यात विदर्भ संघाने वेस्ट बंगालचा चुरशीच्या सामन्यात ५ गुणांनी (३५-३०) मात करीत उपउपांत्यपूर्व फेरी गाठली. विदर्भाकडून रोशन (१.१४ मी. संरक्षण व ६ गुण), तन्मय (१, १ मी. संरक्षण व ८ गुण), कल्पेश (१ मी. संरक्षण व ६ गुण) यांनी चांगला खेळ करीत विजयात महत्वाची कामगिरी केली. तर वेस्ट बंगालकडून एसके नबी (१, १.२० मी. संरक्षण व ८ गुण), राज (१.२० मी. संरक्षण) यांनी चांगला खेळ केला. तिसऱ्या सामन्यात कोल्हापूर संघाने राजस्थानचा एक डाव २४ गुणांनी (४२-१८) सहज मात केली. कोल्हापूरकडून सत्यराज वाडेकर (२.१०, ३.२० मि. संरक्षण व २ गुण), गौरव माने (२ मि. संरक्षण व ८ गुण), सोहम भाटमारे (२ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी चमकदार कामगिरी करत विजय मिळवून दिला. राजस्थानकडून तनिष (१.१० मि. संरक्षण व २ गुण) याने चांगला खेळ केला.

**किशोरी गटात विदर्भ पराभूत**

किशोरी गटात महाराष्ट्र संघाने मणिपुरचा एक डाव ३३ गुणांनी (४३-१०) पराभव केला. महाराष्ट्रकडून राही पाटील (२.१० मि. संरक्षण व ८ गुण), अपर्णा वर्धे (४.१० मि. संरक्षण व ८ गुण), वेदिका तामखडे (३ मि. संरक्षण व ६ गुण) यांनी विजयात मोलाची कामगिरी केली. मणिपूर संघाकडून आयेशा (०.५० मि. संरक्षण व २ गुण) हिने चांगला खेळ केला. दुसऱ्या सामन्यात विदर्भ संघाला हरयाणाकडून पराभवाचा धक्का बसला. हा सामना हरयाणाने ४ गुण आणि ३ मिनिटे राखून जिंकला. त्यात पलक (१.३०, १.५० मी. संरक्षण व २ गुण), कोमल (१.५०, १.१० मि. संरक्षण), अंजली (१.२०, १.२० मि. संरक्षण) यांनी चांगला खेळ केला. तर विदर्भकडून मनवी (१.३० मि. संरक्षण व ४ गुण), नव्या (१.३० मि. संरक्षण व ६ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली.

# राज्य आतंरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरु करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धा आजपासून

**उद्घाटन सोहळा विद्यापीठाच्या प्रांगणात, सोलापुरातील चार मैदानावर स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धेस मंगळवारपासून (दि.३) येथील विविध चार क्रीडांगणावर सुरुवात होईल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने ही स्पर्धा ९ फेब्रुवारीपर्यंत येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम, रेल्वे मैदानावरील डॉ. आंबेडकर क्रीडा संकुल, जुळे सोलापूर येथील भंडारी मैदान आणि दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर होईल. या स्पर्धेत राज्यातील १७ विद्यापीठाच्या संघानी भाग घेतला आहे. चार गटात संघाची विभागणी करण्यात आली असून साखळी व बाद पद्धतीने ही स्पर्धा होईल. या स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी (दि.३) दुपारी साडे चार वाजता पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते आणि कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर व प्र. कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या प्रांगणात होईल.

कुलगुरू T20 चषक २०२६

**आज होणारे सामने (भंडारी मैदान)**

सकाळी ९ वाजता : मुंबई विद्यापीठ विरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड. दुपारी १ वाजता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रनिकेतन विद्यापीठ लोणेरे विरुद्ध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मोफत देवदर्शनाचा लाभ

**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना (उबाठा) शाखेतर्फे प्रभाग तीनमधील भाविकांना मोफत देवदर्शनाचा लाभ दिला. या देवदर्शन सहलीचे संयोजन शिवसेना उपशहर प्रमुख शिवा ढोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. या सहलीत आंध्र प्रदेश येथील संगारेड्डी संगम, विकाराबाद येथील मल्लिकार्जुन मंदिर व बुक्का मंदिर आदी धार्मिक स्थळांना भेट देण्यात आली.



## सिंहगड स्कूलच्या विद्यार्थ्यांचा फेअरवेल समारंभ उत्साहात

**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला फेअरवेल पार्टी (निरोप समारंभ) कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. कार्यक्रमास कॅम्पस डायरेक्टर संजय नवले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने झाली. यावेळी शाळेतील कनिष्ठ विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली व कार्यक्रमात रंगत आणली. फेअरवेल कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत शाळा- महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले तसेच शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा आढावा घेत पुढील वाटचालीसाठी मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमात दहावी व बारावीच्या गुणवंत तसेच सर्वांगीण कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# पंढरपुरात १०५ वाहनांवर कारवाई

### ५७ हजारांचा दंड वसूल; वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. २ फेब्रुवारी-**



वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर पंढरपूर शहर पोलीसांनी रविवारी (दि.१) विशेष मोहीम राबवली. यामध्ये १०५ वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करुन ५७ हजार ९०० रुपये दंड वसुल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे यांनी दिली.

पंढरपूर शहरात श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी दररोज मोठ्या प्रमाणात भाविक येतात तसेच शहरात मोठी बाजारपेठ, दवाखाने, शासकीय कार्यालयात कामकाजासाठी दररोज विविध भागातील हजारो नागरिक दुचाकी, चार चाकी अथवा इतर वाहनांने येतात. मात्र गेल्या काही दिवसांपासून ट्रिपल प्रवास, फॅन्सी नंबर,विना परवाना, विना नंबर, कर्कश आवाजाचे सायलन्सर बसविणे तसेच विरुध्द दिशेन गाडी चालविणे यामुळे सतत वाहतुक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. याला आळा घालण्यासाठी शहर पोलीसांनी विशेष मोहिम राबवून १०५ वाहनचालकांवर कारवाई केली. ही कारवाई सहा पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, शहर पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे,वाहतुक शाखेचे ठाणे अंमलदार, होमगार्ड यांनी केली.

# मंगळवेढ्यात पावसाळी वातावरण निर्माण झाल्याने शेतकरी वर्ग धास्तावला

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २ फेब्रुवारी -**

मंगळवेढा तालुक्यातील काळ्या शिवारात सध्या ज्वारीच पिके हुरड्यात असून हवामान खात्याने पावसाचा अंदाज वर्तविल्याने आहे. पाऊस पडल्यानंतर ज्वारीचा फुलोरा धुवून जाण्याची शक्यता शेतकरी वर्गातून वर्तविले जात आहे. दरम्यान मागील दोन दिवस आकाशात काळे ढग येत असल्या मुळे पावसाळी वातावरण निर्माण झाल्याने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

यंदा रब्बी पेरणीपुर्व हंगामात सलग पाऊस पडल्यामुळे ज्वारी पेरणीला उशीर झाल्याने केवळ काळ्या शिवारात ६.२३ टक्के म्हणजेच २ हजार १३० हेक्टर क्षेत्रावर ज्वारीची पेरणी झाली आहे. सद्यस्थितीत सध्या ज्वारी हुरडा व फुलोर्यात आहे. पुणे वेधशाळेने सोलापूर जिल्हयात तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. मागील दोन दिवसापासून मंगळवेढा परिसरात काळ्या शिवारात आकाशात काळे ढग येत असल्याचे



चित्र आहे. पाऊस पडला तर ज्वारी पिका बरोबर हरभरा,करडई,आंबा,द्राक्ष,गहू व अन्य इतर पिकांचेही नुकसान होणार असल्याचे शेतकर्यामधून बोलले जात आहे. परिणामी शेतकरी वर्ग धास्तावून गेला आहे. सकाळी १० पर्यत काळ्या शिवारात सर्वत्र धुक्याची चादर पसरलेली दिसून येत असतानाच दुपारी मात्र चक्क कडक ऊन पडत असल्याचे जाणवत आहे. हवामानातील या बदलामुळे मानवी शरीरावर ही परिणाम होत असून लहान बालके व वृध्द आजारी पडू लागली आहेत. यंदा ज्वारीची पेरणी कमी झाल्यामुळे गोरगरीबांची ज्वारीची भाकरी महागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



## कर्मवीर विद्यालयात शिबीर; १२३ जणांचे रक्तदान

**बार्शी, दि.२ फेब्रुवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कर्मवीर विद्यालय, चारे येथे समाजसेवक कर्मवीर डॉ. डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून तब्बल १२३ रक्तदात्यांनी रक्तदान करुन जयंतीला मानवंदना दिली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी भगवंत ब्लड बँक, बार्शी व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. रक्तदान प्रक्रियेदरम्यान सर्व आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. प्रत्येक रक्तदात्यांना प्रमाणपत्र, अल्पोपहार व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य चव्हाण व आयोजक समिती यांनी या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि राष्ट्रप्रेम वृद्धिंगत होत असल्याचे नमूद केले.

## ‘कर्मयोगी’मध्ये होणार डिपेक्स कल्पना सादरीकरण स्पर्धा

### विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळणार चालना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ फेब्रुवारी-**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर येथे ग्रामीण विकासाला चालना देणाऱ्या सामाजिक नवोपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी डिपेक्स २०२६ चे कल्पना सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरची सोलापूर विभागस्तरीय स्पर्धा ४ फेब्रुवारी २०२६ रोजी कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,पंढरपूर येथे पार पडणार आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. पाटील यांनी दिली.

या स्पर्धेची संकल्पना ग्रामीण विकासासाठी सामाजिक नवोपक्रम अशी असून, ग्रामीण भारताच्या सक्षमीकरणासाठी नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा




या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सदरची स्पर्धा ग्रामीण भारताला सक्षम बनवणे, मुळांना नवोपक्रम देणे या ब्रीदवाक्याखाली आयोजित करण्यात येत आहे. स्पर्धेत पदविका, पदवी व आयटीआयचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या स्पर्धेमध्ये अंदाजे २०० प्रकल्प आणी सुमारे १ हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभिनव कल्पना सादर करून ग्रामीण भागातील समस्या व त्यावरील उपाय मांडण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेचा अंतिम फेरी दिनांक ५ ते ८ मार्च २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. डिपेक्स २०२६ या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि उद्योजकतेला चालना मिळेल असा विश्वास डिपेक्स २०२६ चे महाविद्यालयाचे संयोजक डॉ. अभय उत्पात यांनी व्यक्त केला आहे. सदर स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांसाठी पंढरपूर स्टॅन्ड पासून बसची सोय केली आहे. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. डिपेक्स २०२६ ही स्पर्धा सृजन आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सौजन्याने आयोजित करण्यात येत आहे.

## निधन वृत्त...

### इकरामोद्दीन शेख



**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

साखर पेठ येथील इकरामोद्दीन दस्तगीर शेख (वय-७७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. अंत्यविधी जडजासाहब कब्रस्तान येथे करण्यात आला. त्यांच्या पाश्चात एक मुलगा, दोन मुली व पाच भाऊ, चार बहिणी असा परिवार आहे.

### जिजाबाई गव्हाणे



**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

बार्शीतील सेवानिवृत्त मंडल अधिकारी तथा कवी प्रकाश गव्हाणे यांच्या मातोश्री अन्नपूर्णा ऊर्फ जिजाबाई विश्वंभर गव्हाणे, रा. पाटील प्लॉट यांचे सोमवार दि.२ फेब्रुवारी रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९३ वर्षे होते. त्यांच्यावर मंगळवार पेठेतील मोक्ष धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, एक मुलगी, नातवंडे, परतुंडे असा परिवार आहे.

### सुशीला ढवळे



**नरखेड, दि. २ फेब्रुवारी-**

मोहोळ तालुक्यातील मलिकपेठ येथील सुशीला लक्ष्मण ढवळे (वय-६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, तीन भाऊ, एक बहीण, सुना व नातवंडे असा परिवार आहे. मोहोळ येथील मेकॅनिक नेताजी व संभाजी ढवळे यांच्या त्या मातोश्री होत.

### राजय्या सरगम



**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

रविवार पेठ २५६ गाळा येथील रहिवासी वेदश्री राजय्या मल्लय्या सरगम (वय-८७) यांचे सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी दुपारी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली, तीन मुले, नातवंडे असा परिवार आहे. पद्मशाली ज्ञाती संस्थेचे माजी विश्वस्त व पुरोहित चंद्रशेखर सरगम यांचे ते वडील होत.

## भक्तिमार्गच जीवन समृद्ध करणारा : हभप पाठक

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२ फेब्रवारी-**

आजच्या सामाजिक स्थितीकडे पाहीले असता दुरदर्शन वरील संस्कृतीहीन मालिका, सात्विक आहाराचा अभाव, विहारातील बदल यामुळे समाजाचे अधःपतन होत असल्याचे चित्र आहे. यावर एकमेव उपाय म्हणजे संतानी दाखवलेल्या भक्तिमार्गाने वाटचाल केली तरच जीवन समृद्ध होणार असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध किर्तनकार संध्याजी पाठक (पोतदार) यांनी केले.

श्रीपूर येथील श्रीराम भक्त मंडळाच्यावतीने ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित किर्तन महोत्सवात हभप पाठक बोलत होत्या. धर्माचा प्रचार करणाऱ्यांची संख्या जास्त दिसते परंतू आचरण करणारे खूप कमी आहेत. प्रसिद्ध असणे व सिद्ध असणे यात फरक आहे. ब्रम्हचैतन्य गोंदवले महाराज हे सिद्ध पुरुष होते म्हणून त्यांनी सांगितलेल्या भक्तिमार्गाने वाटचाल करणे महत्वाचे आहे. मार्ग निवडताना डोळस असावे त्यानंतर डोळे झाकून चालले तरी भगवंत पाठीशी असतो. तीन दिवस चाललेल्या महोत्सवाची शुक्रवारी दि. ३० रोजी गुलाल, पुष्पवृष्टी व महाप्रसादाने सांगता झाली. हरीभाऊ कुलकर्णी, गजानन मोकाशी, संतोष जोशी, हरीभाऊ वसेकर, तुकाराम केसकर, सुरेश पुराणिक, सिमा पुराणिक, तुकाराम सुमंत यांनी परिश्रम घेतले.

> **संस्कारित पिढी निर्माण करणे महिलांच्या हातात**
>
> आज टी.व्ही. सिरिलिअलच्या माध्यमातून उज्वल असणाऱ्या संस्कृतीस चित्र विचित्र प्रसंगातून धोका पोहोचवला जात आहे. परंतू हा धोका फक्त पातिव्रत्य या गुणांच्या माध्यमातून भारतीय स्त्री रोखू शकते. म्हणूनच संस्कारित पिढी निर्माण करणे महिलांच्या हातात आहे. स्त्री शक्तीचे सामर्थ्य यातूनच दिसते असेही पाठक यांनी सांगितले.



## बाणेगावच्या गॅलेक्सी पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

बाणेगांव येथील मयुरेश्वर फाऊंडेशन संचलित गॅलेक्सी पब्लिक स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला. याप्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करून विद्यार्थी व पालकांना मंत्रमुग्ध केले. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ मराठी अभिनेता किशोर महाबोले उपस्थित होते तर संस्थापक डॉ. सुहास राऊत, प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.स्वप्नील राऊत, बाणेगांवचे सरपंच लिंबाजी जाधव, मार्डीचे सरपंच प्रांजली पवार, सेवालालचे सरपंच दिपाली राठोड. शाळेच्या मुख्याध्यापिका विजया नारायणकर उपस्थित होते.

प्रोजेक्ट डायरेक्टर स्वप्नील राऊत आम्ही या शाळेला भारतातील ५०० टॉप शाळेमध्ये नेण्याचा मानस असल्याचे सांगितले.

## माझ्या जीवनात स्वामीभक्तीला अग्रस्थान : गोवा पर्यटनमंत्री खऊंटे

### अक्कलकोट मंदिर समितीतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ फेब्रुवारी-**

स्वामी समर्थांच्या अनेक भक्तांप्रमाणे माझ्या कुटूंबियांसह मलाही श्री. स्वामी समर्थांच्या जागृततेची व त्यांच्या कल्पनाशक्तीची प्रचिती आली आहे. यामुळे जीवन स्वामीमय झाले आहे. माझ्यासह अनेक भाविकांच्या जीवनात स्वामी भक्तीला अग्रस्थान असल्याचे प्रतिपादन गोव्याचे पर्यटनमंत्री रोहन खऊंटे यांनी केले.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन मंत्री खऊंटे यांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी पर्यटन मंत्री रोहन खऊंटे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी व्यंकटेश पुजारी,



मंदिर समितीचे विश्वस्त संपतराव शिंदे, प्रसाद सोनार, दर्शन घाटगे, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, सागर गोंडाळ यासह स्वामीभक्त उपस्थित होते. भाविकांची स्वामी भक्ती व भाविकांची वाढती संख्या पाहता स्वामी भक्तांच्या भक्तीतून स्वामी समर्थांचे मूळस्थान असलेले येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व स्वामींच्या वास्तव्यामुळे तिर्थक्षेत्र अक्कलकोटचा धार्मिक पर्यटन स्थान म्हणून उदय होत असल्याचेही यावेळी मंत्री खऊंटे यांनी सांगितले.

## मोहोळ भाजपातर्फे अजितदादांना श्रध्दांजली; असा नेता पुन्हा होणे नसल्याचे भावोद्‌गार

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २ फेब्रुवारी-**

अजित दादा पवार हे स्पष्ट वक्ते, निर्भीड आणि कार्यकर्त्यांचे हित सांभाळणारे नेते होते. मी आमदार म्हणून त्यांच्याबरोबर काम केले आहे. आगामी ५० वर्षात महाराष्ट्राचा कसा विकास करावा याची त्यांना दृष्टी होती. त्यांच्या निधनाने महाराष्ट्र एक दूरदृष्टीचा विकास करणाऱ्या नेत्याला मुकला आहे असा नेता पुन्हा होणार नाही अशा शब्दात माजी आमदार राजन पाटील यांनी अजित पवारांना श्रद्धांजली अर्पण केली.

मोहोळ तालुका भाजपाच्यावतीने येथे राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी एका शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार पाटील बोलत होते. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश चवरे, सरचिटणीस विकास वाघमारे, जिल्हा चिटणीस महेश सोवनी, अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष मुजीब मुजावर, मोहोळ उत्तर मंडळाचे अध्यक्ष व नगरसेवक सतीश काळे, मोहोळ दक्षिण मंडळाचे अध्यक्ष व पेनुरचे माजी सरपंच रमेश माने, अनुसूचित जमाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले, मोहोळ उत्तर सरचिटणीस अरविंद माने, भारतीय मजदूर संघाचे मोहोळ तालुका अध्यक्ष मच्छिंद्र गाडे पाटील, भाजपाचे जिल्हा परिषदेचे उमेदवार सचिन जाधव, बालाजी नरुटे, समाधान शेळके, अक्षय खताळ आणि पंचायत समितीचे सर्व उमेदवार, दिपाली कोरे, सिंधुताई वाघमारे, यशोदा कांबळे आदींसह तालुक्यातील भाजप व अजित दादा प्रेमी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी आमदार यशवंत माने यांनी आपले राजकीय सामाजिक आणि जीवनाचे सर्वांग अजित दादांमुळे बहरून आले. मी एक सामान्य माणूस असून मला त्यांनी आमदार केले असे सांगताना माजी आमदार माने यांचे डोळे पाण्याने डबडबले. जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण यांनी यावेळी बोलताना सांगितले की मी दादांच्या विरोधी पक्षात असताना पासून सुद्धा त्यांचा चाहता होतो त्यांचे काम करण्याची पद्धत मला आवडत होती आणि कार्यकर्त्यांना संभाळणारा अनोखा नेता म्हणून महाराष्ट्रात त्यांचे नांव आजरामर राहील. दादासारखा नेता पुन्हा होणार नाही अशा शब्दात आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी बोलताना युवा नेते अजिंक्यराणा पाटील म्हणाले की अजित दादांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. हे सांगताना लोकांची कामे कशी करायची याचा एक वस्तू पाठ शिकायला मिळाला. पवार कुटुंबीय आपले असलेले कौटुंबिक नाते किती जिव्हाळ्याचे होते याचीही त्यांनी माहिती दिली. यावेळी बाळासाहेब पाटील, बालाजी साठे, विकास वाघमारे, मंगेश पांढरे आदींनी दिवंगत अजित दादांना श्रद्धांजली वाहणारी भाषणे केली.

शेवटी एआय ने तयार केलेल्या स्व.अजितदादांच्या आवाजाची क्लिप वाजवून दाखवण्यात आली. या सभेचे सूत्रसंचालन उत्तर मंडळ तालुका अध्यक्ष सतीश काळे यांनी केले.

## शहीद मेजर अमोल निलंगे स्मृतीदिन सोहळा साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि. २ फेब्रुवारी-**

साडे (ता.करमाळा) येथे स्मारक समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला शहीद मेजर अमोल निलंगे स्मृतीदिन सोहळा साजरा करण्यात आला.

या सोहळ्यास भारतीय सेनेचे अधिकारी कर्नल केदार भिडे व कर्नल कुलदीप करपे यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान द. सो. पं. समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी भूषवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गणेश करे-पाटील यांनी केले. ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी शहीद मेजर अमोल निलंगे यांच्या स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून एन.सी.सी. कॅडेट्ससह श्रद्धांजली वाहिली.

याप्रसंगी कर्नल केदार भिडे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, तहसिलदार शिल्पा ठोकडे, पोलीस निरीक्षक रणजीत माने, डॉ. ॲड. बाबुराव हिरडे, अवचर साहेब, प्रा. बाळकृष्ण लावंड यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रचिती पुंडे यांनी शहीद मेजर अमोल निलंगे स्मारक




समितीस पोडियम भेट स्वरूपात प्रदान केले. यावेळी सामाजिक दायित्वासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शहीद स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये पोलीस निरीक्षक रणजित माने, तहसीलदार शिल्पा ठोकडे, ग्रामीण भागातील नागरिक सेवेसाठी गुलाबराव देवकते, प्रसिद्ध पक्षी अभ्यासक प्रा. कल्याणराव साळुंके, प्रगतशील बागायतदार संभाजी भोसले, आदर्श सैनिक किरणजी ढेरे व आदर्श कला शिक्षक सचिन शिंदे यांचा समावेश होता. तर उपक्रमशील शाळा पुरस्कार पीएमश्री साधनाबाई नाम देवराव जगताप प्राथमिक मुलींची शाळा क्र. १ यांना प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन साडे ग्रामस्थ, आजी-माजी सैनिक कल्याणकारी मंडळ करमाळा आणि यशकल्याणी सेवाभावी संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या कार्यक्रमास कर्नल केदार भिडे, कर्नल कुलदीप करपे, प्रोलक्स वेलनेस प्रोडक्शन प्रा. लि.च्या संस्थापिका डॉ. प्रचिती पुंडे, तहसीलदार शिल्पा ठोकडे, पोलीस निरीक्षक रणजित माने, प्रा. गणेश करे-पाटील, डॉ. ॲड. बाबुराव हिरडे, अक्रूर शिंदे, बाळकृष्ण लावंड, जयेश पवार, नवनाथ नाईकनवरे, वीर पिता अरविंद निलंगे व वीर माता अनुजा निलंगे उपस्थित होते. पुणे, सातारा, धाराशिव येथून विशेष निमंत्रित तसेच करमाळा तालुक्यातील आजी-माजी सैनिक, वीर पत्नी, वीर माता-पिता व देशप्रेमी नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सचिन गाडेकर यांनी केले, तर अक्रूर शिंदे यांनी आभार मानले.

### जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकत श्री राजू नागनाथ कोळी यांनी मुलगा श्री. विकी राजू कोळी याचे नावे बक्षीसपत्राने हस्तांतर करून ती मिळकत तारण (Mortgage) ठेवण्याचा प्रस्ताव जन स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा सोलापूर यांचेकडे दिला असून, आमचे अशील बँकेने सादर कर्ज मंजूर करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

सदर मिळकत निर्बंधरहित, निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी मिळकतीच्या सद्य मालकांनी दिलेला आहे.

तरी, सदर मिळकतीवर, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, हक्क, हिस्सा, हितसंबंध, वाद, अगर कर्ज प्रकरणास हरकत किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी ही जाहीर सूचना प्रसिद्ध जलेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत, खालील नमूद पत्यावर कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, पैकी मौजे नान्नज, येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.९६६, यासी क्षेत्र १०१.१७ चौ. मी. ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिद्ध केली दि. ०२/०२/२०२६

**सही/-**
**ॲड. गणेश वसंत कटारे**
**ॲड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)**
**कार्यालय क्र. ११, पहिला मजला, स्क्वेअर-वन कॉम्प्लेक्स, १३१, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर-०३**
**मोबाइल क्र. ९८६०११००१९**

# महापालिका निवडणुकीनंतरही 'महायुती'त धुसफूस!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी,**

- **महापौर, उपमहापौर निवडणुकीला अनपेक्षित नाट्यमय वळण**
- **शिंदे गटाच्या उमेदवारीला काँग्रेसचा पाठिंबा**
- **एमआयएमचीही स्वतंत्र एंट्री**

सोलापूर महापालिकेच्या महापौर-उपमहापौर निवडणुकीने अपेक्षेपेक्षा अधिक राजकीय रंगत घेतली आहे. निवडणूक निकालानंतर भाजप-शिवसेना (शिंदे गट) यांची नैसर्गिक महायुती पुन्हा आकार घेईल, असे जवळपास निश्चित मानले जात होते. मात्र उमेदवारी अर्ज दाखल करतानाच घडलेल्या नाट्यमय घडामोडींनी हे गणित ढासळवले आहे. महायुतीतील कनिष्ठ भागीदार असलेल्या शिवसेना शिंदे गटाने थेट महापौर पदासाठी उमेदवार उभा करून भाजपला स्पष्ट राजकीय आव्हान दिले आहे.शिंदे गटाच्या उमेदवारीला काँग्रेसने पाठिंबा दिला आहे तर एमआयएमचीही स्वतंत्र एंट्री झाली आहे. काँग्रेसने महायुतीतील एका घटक पक्षाला हात देऊन भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे.

सोलापूर महापालिका महापौर व उपमहापौर पदासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यावेळी मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. माहिती अंतर्गत असलेले मित्रपक्ष म्हणजे भाजपा आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात निवडणुकी निकालानंतर ही दुही कायम राहिली आहे. शिंदे गटाने थेट आता भाजपाला आव्हान दिले आहे. केवळ चार नगरसेवक असतानाही लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी निवडणूक लढवत आहोत, हा दावा म्हणजे नैतिक मुद्द्याच्या आडून दबाव-राजकारणाचा प्रयत्न असल्याचे चित्र आहे. शुक्रवारी चमत्कार घडेल, हा दावा देखील संख्या नसतानाही राजकीय खेळी शक्य आहेत याकडेच इशारा करतो.

काँग्रेसच्या उघड पाठिंब्यामुळे या लढतीला वेगळे वळण मिळाले आहे. काँग्रेसने शिंदे गटाच्या उमेदवाराला मतदान व सहकार्य जाहीर केल्याने रंग भरला आहे. भाजपविरोधात थेट लढण्याची हिंमत नसली, तरी सत्तास्थापनेच्या प्रक्रियेत भाजपवर दबाव वाढवण्याची ही काँग्रेसची रणनीती मानली जाते. दरम्यान, एमआयएमची




अनपेक्षित एंट्री ही या निवडणुकीतील सर्वात महत्त्वाची राजकीय घडामोड आहे. आठ जागांसह दुसरा मोठा पक्ष असलेल्या एमआयएमने तटस्थतेची भूमिका सोडत उमेदवारी दाखल केली.

संविधानिक हक्क हा मुद्दा पुढे करत असले तरी, विरोधी पक्ष नेतेपदाच्या गणितासाठी भाजपशी सकारात्मक राहण्याची गरज एमआयएमला भासणार आहे. त्यामुळे एमआयएमची ही लढत सत्तेविरोधात कमी आणि सत्तेशी वाटाघाटी वाढवण्यासाठी अधिक असल्याचे संकेत असल्याचे बोलले जात आहे. निवडणूक निकालानंतर भाजपची सत्ता जवळपास निश्चित असताना, शिवसेना शिंदे गटाने उमेदवार उभा करून गृहित धरून चालू नका, असा इशारा दिला आहे. भाजपविरोध हे काँग्रेसचे सूत्र असले, तरी सोलापुरात काँग्रेसने महायुतीतील एका घटक पक्षाला हात देऊन भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. तब्बल ८७ जागा भाजपकडे असल्याने भाजपचे उमेदवार निर्विवादपणे निवडून येणार हे निश्चित आहे. असे असले तरीही सोलापुरात सध्या संख्या, तत्व आणि लोकशाहीपेक्षा 'शेवटच्या क्षणी कोण माघार घेतो?' यावर निवडणूक बिनविरोध की बहुमताने हा फैसला शेवटच्या पंधरा मिनिटात होणार आहे. शिंदे गट हा नैसर्गिक महायुतीतील घटक पक्ष असल्याने, मान मिळाला तर पाठिंबा हे समीकरण उघड आहे. त्यामुळे मतदान होण्यापेक्षा ऐनवेळी उमेदवारी माघारी घेऊन निवडणूक बिनविरोध करण्याची शक्यता अधिक असल्याची चर्चा रंगली आहे. सोलापूर महापालिकेतील ही निवडणूक राजकीय नाट्याची उघड मांडणी ठरत आहे. निकाल काहीही असो, पण या प्रक्रियेतून महायुतीतील अस्वस्थता, विरोधकांचा संधीसाधूपणा आणि राजकारणातील कटू वास्तव पुढे आले आहे. एकीकडे शिंदे गट महायुतीतील घटक पक्ष असल्याने शेवटच्या क्षणी माघार किंवा समन्वय होण्याची शक्यता कायम आहे, तर दुसरीकडे एमआयएमचे राजकारण ही निवडणूक बिनविरोध की मतदानाकडे जाईल याचा निर्णय विशेष सभेतच पाहायला मिळेल. त्यामुळे ६ फेब्रुवारीच्या विशेष सभेत राजकीय नाट्याचा पडदा शेवटच्या क्षणापर्यंत उघडाच राहणार आहे.

**महापौर, उपमहापौर पदासाठी पक्षनिहाय उमेदवार याप्रमाणे**

महापौर पद : विनायक रामकृष्ण कोंड्याल (भाजपा), प्रियदर्शन बाळासाहेब साठे (शिवसेना शिंदे गट), तौफिक बाबुमियाँ हत्तुरे (एमआयएम). उपमहापौर पद : ज्ञानेश्वरी महेश देवकर (भाजपा), प्रियदर्शन बाळासाहेब साठे (शिवसेना शिंदे गट), आसिफ अहमद पीर अहमद शेख (एमआयएम).



## तीन आमदारात रस्सीखेच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेत तब्बल ८७ जागा जिंकून भाजप निर्विवाद सत्ताधारी ठरला. परंतु पदांसाठी पक्षांतर्गत लढाई सुरु असल्याचे चित्र आहे. तीन आमदार, तीन प्रभावक्षेत्रे आणि मर्यादित सन्मानाची पदे या समीकरणात पक्षाला संघटनात्मक संतुलन राखत सत्ता वाटप करणे ही मोठी कसरत ठरली आहे.

खुल्या प्रवर्गाचे आरक्षण, कोंड्याल यांची संघटनात्मक ताकद आणि महापालिका निवडणुकीतील सर्वाधिक मते या तिन्ही बाबींमुळे त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होणे अपेक्षितच होते. उपमहापौरपद शहर दक्षिणेकडे सोपवत भाजपने आ.सुभाष देशमुख गटाची नाराजी टाळण्याची काळजी घेतली. ज्ञानेश्वरी देवकर यांची निवड ही केवळ पदवाटप नसून, दक्षिण सोलापुरात पक्षाचा सामाजिक-संघटनात्मक समतोल टिकवण्याचा निर्णय आहे.

शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या गटातून महापौर पदासाठी आग्रह धरण्यात आला होता. मात्र या गटाला यश आले नाही. आता शहर उत्तरसाठी स्थायी समिती सभापतीपद पटकावण्यासाठी राजकीय लढाई लढवावी लागत आहे. भाजपने एकाही टप्प्यावर 'संख्याबळाचा तोरा' न दाखवता ना.जयकुमार गोरे, आ.देवेंद्र कोठे, आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्यात समन्वय साधत पक्षांतर्गत शांतता राखण्याला प्राधान्य दिले.

सव्वा-सव्वा वर्ष महापौर पदाची विभागणी करावी, अशी मागणी पुढे आली होती. अनंत जाधव हे महापौर पदासाठी आग्रही होते. त्यांनी उपमहापौरपद स्वीकारण्यास दिल्याचे समजते. अखेर कोंड्याल यांच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडली.

## विकासाचे राजकारण करणारा नेता हरपला

- **अजित दादांच्या अस्थिकलशाचे पूजन**
- **सोलापूरकरांनी शोकसभेत वाहिली दादांना श्रद्धांजली**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी**

जनसेवेचा वसा घेऊन धर्मनिरपेक्ष, विकासाभिमुख राजकारण करणारे, ग्रामीण भागातील शेतकरी-कष्टकरी जनतेच्या सुखदुःखाशी नाळ जोडणारे ऊर्जावान नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनामुळे सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे, अशा भावना विविध मान्यवरांनी या शोकसभेत व्यक्त केल्या.

अजितदादा पवार यांच्या निधनानिमित्त रविवारी सायंकाळी सोलापूर येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात शोकसभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत सर्वपक्षीय नेते,



सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संतोष पवार म्हणाले, त्यांच्या जाण्याने राष्ट्रवादीचा कार्यकर्ता पोरका झाला आहे. शेतकरी, कष्टकरी घटकांसाठी अहोरात्र झटणारे नेतृत्व हरपले आहे.

श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी अजितदादांशी असलेला दीर्घ सहवास सांगत त्यांच्या शिस्तप्रिय, स्पष्टवक्त्या आणि सर्वधर्मसमभावी व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. सोलापूरच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच विशेष आस्था दाखवली, असे त्यांनी नमूद केले.

आमदार विजयकुमार देशमुख यांनी विधानसभेतील त्यांच्या कार्यपद्धतीचा उल्लेख करत, कामानिमित्त गेलेला कोणीही माणूस रिकाम्या हाताने परत जात नसे, असे सांगितले. भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, काँग्रेसचे चेतन नरोटे, शिवसेना, राष्ट्रवादी व इतर पक्षांच्या नेत्यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात निधन झाल्याची बातमी समजताच संपूर्ण राज्य शोकसागरात बुडाले. वरून कठोर वाटणारे, पण आतून अत्यंत संवेदनशील असलेले हे नेतृत्व विकासाचे राजकारण, शिस्त आणि वेळेचे महत्त्व यासाठी कायम स्मरणात राहील, अशी भावना शोकसभेत व्यक्त करण्यात आली.

## भोसे जि.प. गटात अटीतटीची लढत

**चेअरमन अनिल सावंत गटाचा बसवराज पाटलांना पाठिंबा**



**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. २ फेब्रवारी**

भोसे जिल्हा परिषद गटाची निवडणूक अटीतटीची होत असून शेवटच्या टप्प्यात नाट्यमय घडामोडी होताना दिसत आहेत. तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे उमेदवार संत दामाजी साखर कारखान्याचे संचालक बसवराज पाटील यांना आज लवंगी शुगरचे चेअरमन अनिल सावंत यांनी जाहीर पाठिंबा दिल्यामुळे त्यांची भोसे गटात ताकद वाढली आहे.

लवंगी शुगर येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत मतदार संघातील गटाचा विकास करणारा उमेदवार म्हणून बसवराज पाटील यांना पाठिंबा देऊन मताधिक्य मिळवून देऊन विजयी करण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी अनिल सावंत यांनी तालुक्यात शेतकऱ्यांच्या विकासासाठी सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा म्हणून सर्वांनी एकत्र येऊन बसवराज पाटील यांना विजयी करण्याचे आवाहन केले. या आवाहनाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत करून आनंद व्यक्त केला.

बसवराज पाटील यांना अनिल सावंत यांनी पाठिंबा दिल्यामुळे बसवराज पाटील व समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या निवडणुकीत अटीतटीची लढत होत असताना विजयाचे पारडे इकडे झुकत असताना या पाठिंब्यामुळे आता अधिक महत्त्व निर्माण झाले आहे व जाहीर पाठिंबा दिल्यामुळे त्यांची भोसे गटात ताकद वाढली आहे. असे मत राजकीय निरीक्षकातून व्यक्त केले जात आहे.



## विकासाचे मॉडेल... अनुभवाचा निकष... प्रश्नच उद्भवत नाही... आदर्श पध्दत... पदाचा उपयोग...

**भाजपा पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीच्या अनुषंगाने गेल्या काही दिवसांपासून राजकीय काथ्याकुट करण्यात येत होते. अखेर 'भाजपा'कडून महापौर व उपमहापौर पदासाठी उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली. याबाबत महापौरपदाचे उमेदवार विनायक कोंड्याल, भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, भाजपाचे गटनेते नरेंद्र काळे, उपमहापौर पदाच्या उमेदवार ज्ञानेश्वरी देवकर यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया त्यांच्याच शब्दात...

**विकासाचे मॉडेलसमोर ठेवून काम करणार**

भाजपावर टाकलेल्या विश्वासाला पात्र ठरण्याच्या अनुषंगाने मूलभूत सोयीसुविधांकडे विशेष लक्ष देणार आहे. विकासाचे मॉडेल समोर ठेवून काम करणार आहोत. पाणी, रस्ते, स्वच्छता, उड्डाणपूल, आयटी पार्क, रोजगार निर्मिती आदींचे व्हिजन राहणार आहे, असे विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

**अनुभवाच्या निकषावर निवड, महापौरपद देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही**

सभागृह चालवणे, कामकाजाविषयीची परिपूर्ण माहिती, नगरसेवकपदाचा अनुभव या निकषावर विनायक कोंड्याल यांना महापौर पदाची उमेदवारी दिली आहे. ज्ञानेश्वरी देवकर ह्या सुशिक्षित महिला असल्याने चांगल्या पध्दतीने कामकाज सांभाळतील. या मुद्द्यावरुन त्यांना उपमहापौर पदाची उमेदवारी देण्यात आली. डॉ.किरण देशमुख यांनी महापौरपदाबाबत इच्छा व्यक्त केली नाही. त्यामुळे त्यांना महापौरपद देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे भाजपाच्या शहराध्यक्षा तडवळकर यांनी सांगितले.

**...तरीदेखील नगरसेवकपदाची उमेदवारी दिली**

यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीत डॉ. किरण देशमुख यांनी पक्षाकडे नगरसेवकपदासाठी मागणी केली नव्हती, तरीदेखील आम्ही त्यांना नगरसेवकपदाची उमेदवारी दिली. व्हीप बजावूनदेखील आजच्या बैठकीला जे नगरसेवक अनुपस्थित आहेत, त्यांचा अहवाल प्रदेशला कळविण्यात येईल, असेही भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी स्पष्ट केले.

**सभागृहाचा कारभार आदर्श पध्दतीने चालवणार**

महापालिकेत सत्ता स्थापन करताना भाजपासमोर कुठलेही आव्हान नाही. सभागृहाचे कामकाज आदर्श पध्दतीने करण्याचा आपला प्रयत्न राहील. शहराच्या विकासाबाबत विरोधक ज्या सूचना करतील त्या विचारात घेऊन काम करण्याचा प्रयत्न करणार आहोत. शहर विकासासाठी जिथे निधीची आवश्यकता आहे तिथे पूर्तता करण्यात येईल, असे भाजपाचे गटनेते नरेंद्र काळे यांनी सांगितले.

**पदाचा उपयोग सर्वांगीण विकासासाठी करणार**

मला उपमहापौरपदाची संधी दिल्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, आमदार सुभाष देशमुख, मनीष देशमुख यांचे आभार मानते. उपम हापौरपदाचा वापर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी करणार आहे, असे उपमहापौर पदाच्या उमेदवार ज्ञानेश्वरी देवकर यांनी सांगितले.

**महापौर, उपमहापौर निवडणूक**

## शुक्रवारी चमत्कार...शिवसेनेला मतदान... आम्हाला अधिकार...

**विरोधी पक्षातील नेत्यांच्या प्रतिक्रिया**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

सोलापूरच्या महापौर व उपमहापौर पदासाठी शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणूक होणार आहे. यासाठी त्या-त्या पक्षांकडून सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आमचे उमेदवार रिंगणात उतरविले आहेत, असे विरोधी पक्षांकडून सांगण्यात आले. शुक्रवारी चमत्कार घडेल, असे शिवसेना शिंदे गटाचे गटनेते अमोल शिंदे यांनी सांगितले. काँग्रेस पक्षाचे नगरसेवक शिवसेनेला मतदान करणार असल्याचे काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे यांनी सांगितले. निवडणूक लढविण्याचा आम्हाला अधिकार असून त्यानुसार आम्हीही रिंगणात उतरलो आहोत, असे एमआयएमचे उमेदवार तौफिक हत्तुरे यांनी सांगितले.



शिवसेना शिंदे गटाचे गटनेते अमोल शिंदे प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले, भाजपाला ८७ जागा मिळूनही त्यांना सदस्यांना उपस्थित राहण्यासाठी व्हीप काढावा लागतो. बंदोबस्तात सदस्यांना आणावे लागते याचा अर्थ काय? लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी शिवसेना शिंदे गटाने महापौर व उपमहापौर पदासाठी उमेदवार उभा केला आहे. येत्या शुक्रवारी आमचा उमेदवार निवडून आला असेल. त्या दिवशी चमत्कार दिसेल.

काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे म्हणाले, भाजपाने कित्येक दिवस उमेदवार जाहीर करण्यासंदर्भात गुप्तता पाळली. उमेदवारी अर्ज आणि निवडणूक प्रक्रियेदरम्यान आपण लोकशाही पाहिली आहे. शिवसेना शिंदे गटाने महापौर व उपमहापौर पदासाठी प्रियदर्शन साठे यांचा उमेदवारी अर्ज भरला आहे. या निवडणुकीसाठी काँग्रेस आणि इतर मित्र पक्षांना सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली. आम्ही शिवसेनेच्या उमेदवाराला मतदान करणार आहोत.

एमआयएमचे महापौरपदाचे उमेदवार तौफिक हत्तुरे म्हणाले, एमआयएमचे आठ नगरसेवक निवडून आले आहेत. संख्याबळ कितीही असो मात्र निवडणूक लढविण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. त्या अधिकाराचा उपयोग करून आम्ही महापौर व उपमहापौर निवडणूक लढवित आहोत.



## सांगोल्याच्या प्रगतीसाठी महायुतीची सत्ता गरजेची : शहाजीबापू पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २ फेब्रुवारी -**

सांगोला तालुक्याचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर जिल्हा परिषद व पंचायत समितीत महायुतीची सत्ता असणे अत्यावश्यक आहे. येत्या चार वर्षात तालुक्यातील सर्वच सिंचन प्रकल्पाचे काम मार्गी लावून सर्वच शेती सिंचनाखाली आणण्याचा निर्धार केला आहे. सत्तेबरोबर राहिल्यासच विकासकामांना गती मिळते. जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठीच आपल्याला सत्तेत सहभागी व्हायचे आहे. सत्तेशिवाय विकास शक्य नाही, त्यामुळे सांगोल्याच्या प्रगतीसाठी महायुतीची सत्ता गरजेची आहे, असे स्पष्ट मत माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले. ते महायुतीचे चोपडी जि.प.गटाचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत, चोपडी पं.स.गणाचे उमेदवार अजय सरगर, राजुरी पं.स.गणाचे उमेदवार डॉ.सदाशिव दबडे यांच्या प्रचारार्थ लोणविरे, हणमंतगाव, निजामपूर, राजुरी येथे आयोजित प्रचार सभेत बोलत होते.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती व मजबुतीकरण, शुद्ध पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था, जलजीवन मिशनअंतर्गत नळजोडणी, वीजपुरवठ्यातील अडथळे दूर करणे, आरोग्य उपकेंद्रे बळकट करणे, शाळांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, तसेच स्वच्छता व सांडपाणी व्यवस्थापनावर भर देण्यात येणार असल्याचे चेतनसिंह केदार सावंत यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी बाळासाहेब एरंडे, प्रशांत वलेकर, सुनील पाटील, डी.एस.सावंत, संतोष खांडेकर, नाथा कोळेकर, भीमराव खांडेकर, दत्ता बंडगर, सुभाष खांडेकर, मधुकर लवटे, मधुकर कदम, मोहन कोळेकर, देवाप्पा लवटे, सोपान कदम, सतीश हिवरे, संतोष काळे, दादासाहेब व्हळगळ, रामभाऊ दबडे, प्रकाश दबडे, आनंदा बंडगर, सुखदेव खुळे, दगडू आप्पा खुळे, जगन्नाथ घोंगडे, पांडुरंग दबडे, तुकाराम सुरवसे, बाळासाहेब बिसले, दिलीप बंडगर, तानाजी चौंडे, तानाजी बंडगर, रावसाहेब कुटे, अंकुश कुटे, आत्माराम काटे, सत्यवान काटे, महेश काटे, आप्पासाहेब व्हळगळ, रामचंद्र माने, साहेबराव दबडे, संतोष दबडे, सूर्यकांत खुळे, संतोष येजगर, मनोज व्हरगर, भारत काटे, प्रकाश बिसले, सुखलाल बंडगर, गजानन काळे, श्रीमंत कुटे, नितीन बंडगर, शिवाजी चौडे, दगडू काशिद, दिलीप बिसले, दीपक सुतार, दिलीप दबडे उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



महापौर, उपमहापौर पदासाठी निवडणूक

# भाजपा, शिवसेना शिंदे गट, एमआयएमकडून उमेदवारी अर्ज दाखल



## भाजपाकडून महापौर पदासाठी विनायक कोंड्याल, उपमहापौर पदासाठी ज्ञानेश्वरी देवकर यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी भाजपा, शिवसेना शिंदे गट, एमआयएम कडून अर्ज सादर करण्यात आले. 'भाजपा'कडून महापौर पदासाठी विनायक कोंड्याल तर उपम हापौर पदासाठी ज्ञानेश्वरी देवकर यांनी अर्ज दाखल केला. महापालिकेतील कौन्सिल हॉल इम ारतीतील नगरसचिव कार्यालयात नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांच्याकडे त्या-त्या पक्षाच्या उमेदवारांनी अर्ज सुपुर्द केले.

सोमवार, दि.२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.४५ वाजल्यापासून भाजपाचे नगरसेवक महापालिकेत येत होते. कौन्सिल हॉल इमारतीच्या पायरीचे दर्शन घेऊन अनेकांनी प्रवेश केला. नगरसेविका आपल्या पती समवेत दाखल झाल्या. काही सदस्य आलिशान चारचाकी गाडीतून, काहीजण दुचाकीवरुन तर काहीजण रिक्षातून आले होते. महापौर व उपमहापौर पदासाठी भरावयाच्या अर्जसंदर्भात भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांना व्हीप बजाविले होते. प्रारंभी पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृह येथे भाजपाच्या नगरसेवकांची बैठक घेण्यात आली. यावेळी शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर व गटनेते नरेंद्र काळे यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यानंतर उमेदवार, सूचक व अनुमोदकांसह नगरसचिव कार्यालयात जावून अर्ज दाखल करण्यात आले.भाजपाकडून महापौर पदासाठी विनायक रामकृष्ण कोंड्याल यांनी अर्ज दाखल केले.

त्यांच्या पहिल्या अर्जावर संजय बसप्पा कोळी सूचक तर श्रीकांचना रमेश यन्नम अनुमोदक आहेत. दुसऱ्या अर्जावर बिज्जू संगप्पा प्रधाने सूचक तर सात्विक प्रशांत बडवे यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली. महापौर पदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून प्रियदर्शन बाळासाहेब साठे यांनी अर्ज दाखल केला. त्यांच्या अर्जावर अनिकेत शिवाजीराव पिसे सूचक तर अमोल बाळासाहेब शिंदे अनुमोदक आहेत. एमआयएमकडून तौफिक बाबुमियाँ हत्तुरे यांनी अर्ज दाखल केले. सफिया महम्मद शफीक चौधरी सूचक तर अकिला कादर भागनगरी अनुमोदक आहेत. उपमहापौर पदासाठी भाजपाकडून ज्ञानेश्वरी महेश देवकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या अर्जावर बसवराज रामण्णा केंगनाळकर सूचक तर अश्विनी मोहन चव्हाण अनुमोदक आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून प्रियदर्शन बाळासाहेब साठे यांनी अर्ज दाखल केला असून अमोल बाळासाहेब शिंदे सूचक व अनिकेत शिवाजीराव पिसे अनुमोदक आहेत. एमएमएमकडून आसिफ अहमद पीर अहमद शेख यांनी अर्ज दाखल केले. त्यावर वहिदाबानो कासिमसाब शेख सूचक, अकिला कादर भागनगरी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केल्या आहेत.









### चुरशीची निवडणूक; छाननीकडे लक्ष

महापौर व उपमहापौर पदासाठी एकाहून अधिक उमेदवार रिंगणात उतरल्याने निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे दिसत आहेत. दरम्यान, प्राप्त अर्जांच्या छाननी व मतदान प्रक्रियेकडे लक्ष लागून राहिले आहे. पक्षीय बलाबल पाहता निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### महापालिका आयुक्त डॉ.ओम्बासे यांनी दिली भेट

महापौर व उपमहापौर निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज प्रक्रियेवेळी महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी सभागृहातील नगरसचिव कार्यालयास भेट दिली. अर्ज प्रक्रियेची माहिती घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या.

### विशेष घडामोडी अशा...

- काही जणांनी गळ्यात भाजप पक्षाचा शेला घातला होता.
- विनायक कोंड्याल यांचे सकाळी १० वाजून १९ मिनिटांनी महापालिकेत आगमन
- शिवसेना शिंदे गटाचे गटनेते अमोल शिंदे यांच्या समवेत आले काँग्रेसचे नगरसेवक चेतन नरोटे
- अनुपस्थित नगरसेवकांबद्दल अहवाल पाठवणार असल्याचे समजतात भाजपचे तीन-चार नगरसेवक उशिरा आले.

### ६ फेब्रुवारी रोजी विशेष सभेत होणार निवड

महापौर, उपमहापौर निवडीसाठी शुक्रवार, दि.६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर महापालिकेची विशेष सभा होणार आहे. पिठासीन अधिकारी म्हणून अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी हे राहणार आहेत. यावेळी अर्ज छाननी, अंतिम उमेदवार यादी जाहीर करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटे वेळ दिला जाणार आहे. दरम्यान, आवश्यकतेनुसार मतदान हात वर करुन घेतले जाणार आहे.



# रक्तदान चळवळीत सेवाभाव महत्त्वाचा : इंगळे

### राज्यस्तरीय कार्यशाळेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

मार्ग कितीही अवघड असला तरी सगळ्या कसोट्यांवर मात करीत गरजूंना गुणवत्तापूर्ण सेवा देऊन रक्तदान चळवळीत सेवाभाव जपणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन रा.स्व.संघाचे सोलापूर जिल्हा संघचालक सुनील इंगळे यांनी केले.

डॉ.हेडगेवार रक्तपेढी व जनकल्याण चेन ऑफ ब्लड बँक्स यांच्यावतीने रक्तपेढीमधील मदतनीसांसाठी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. याप्रसंगी रक्तपेढीचे सचिव मिलिंद फडके, व्यवस्थापक रंगनाथ जोशी, डॉ.सुमेधा कंदलगावकर उपस्थित होते. दररोज निरंतर सुधारणा करणे गरजेचे आहे तरच आपल्या व संस्थेच्या कामात प्रगती होते. कर्तव्य बुद्धीने समर्पण, भावनेने काम केल्यास गरजूंना सेवा देणे सोयीचे होते. गुणवत्ता पूर्ण सर्व तपासण्या झालेले रक्त गरजू रुग्णांना वेळेत देण्यासाठी अशा पद्धतीने काम करण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले. प्रसाद जीरांगलगीकर, मंजिरी कोपकर, शिरीष कुलकर्णी, आनंद जोशी यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी जनसंपर्क अधिकारी रवी कोटा, सुनील हरहरे, संगीता कोरे, श्रीकांत तुळजापूरकर, सौख्या देसाई आदी परिश्रम घेत आहेत. या कार्यशाळेस सोलापूरसह पुणे, मुंबई, नागपूर, जालना, नांदेड संभाजीनगर, अहिल्यानगर येथून प्रतिनिधी उपस्थित आहेत.

# मंत्री पंकजा मुंडे आज सोलापूर जिल्ह्यात

### दक्षिण सोलापूर, माढा तालुक्यात सभांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ राज्याचे पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे ह्या मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप, कुंभारी आणि माढा तालुक्यातील दारफळ असे एकूण ३ जाहीर सभांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती 'भाजपा'चे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दिली.





सोलापूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीकडून एकूण ५९ गटांमध्ये उमेदवार उभे करण्यात आले. मित्रपक्षांना काही जागा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे एकूण ९ गटांमध्ये भाजपाचे उमेदवार रिंगणात नाहीत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे गेले दोन दिवस प्रचारयंत्रणा थंडावली होती. प्रचारासाठी आणखीन २ दिवस वाढविल्याने उमदवारांचा प्रचार जोरात सुरु आहे, असेही त्यांनी सांगितले.

**उमेदवारांची संख्या**

शनिवार, ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद गटासाठी भाजपाकडून ९ ठिकाणे वगळता ५९ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाने २६, राष्ट्रवादी शरद पवार गटाने २४, शिवसेना शिंदे गटाने २२, काँग्रेसने २० जागांवर उमेदवार उभे केले आहेत. याशिवाय अन्य आघाड्या व अपक्षांचाही समावेश आहे.

# प्र.२४ च्या नगरसेविका वनिता पाटील यांचा जातीचा दाखला अवैध

### उषा राजेश काळे यांनी घेतलेल्या हरकतीवर समितीचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेत महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीची प्रक्रिया सुरु असतानाच भारतीय जनता पार्टीला मोठा राजकीय धक्का बसला आहे. भाजपच्या प्रभाग क्रमांक २४ ब मधील अनुसूचित जमाती महिला राखीव प्रवर्गातील नगरसेविका वनिता संतोष पाटील यांचा जातीचा दाखला अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीने अवैध ठरवला आहे.




प्रभाग क्रमांक २४ ब हा अनुसूचित जमाती- महिला प्रवर्गासाठी आरक्षित आहे. या प्रभागातून 'भाजपा'कडून वनिता संतोष पाटील यांनी निवडणूक लढवून विजय मिळवला होता. त्यांच्या विरोधात शिवसेना (एकनाथ शिंदे गट) कडून माजी उपमहापौर राजेश काळे यांच्या पत्नी उषा राजेश काळे ह्या उमेदवार होत्या. निवडणुकीदरम्यान वनिता पाटील यांनी 'वनिता रामचंद्र तलवार' या नावाने कोळी महादेव अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र सादर केले होते. या प्रमाणपत्राबाबत संशय व्यक्त करत उषा काळे यांनी अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीकडे तक्रार दाखल केली होती. त्यावर सुनावणी करुन कोकण विभागाच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने वनिता पाटील यांचा जातीचा दाखला अवैध ठरवून तो जप्त व रद्द केला आहे. जात पडताळणी समितीने वनिता पाटील यांचा जातीचा दाखला अवैध ठरविल्याने त्यांना आरक्षित प्रवर्गाचा लाभ घेण्याचा कोणताही अधिकार राहात नाही. त्यांचे नगरसेवक पदावर राहणे हे कायदा व संविधानिक तरतुदींच्या विरोधात आहे. त्यामुळे त्यांना नगरसेवक पदावरुन अपात्र घोषित करण्यात यावे, अशी मागणी उषा काळे यांनी महापालिका आयुक्त यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

पोटनिवडणूक होईपर्यंत त्यांचे सर्व अधिकार गोठवावेत. कोणताही विकास निधी, शासकीय सुविधा किंवा आर्थिक लाभ देण्यात येऊ नये. प्रभाग क्रमांक २४ ब मध्ये तात्काळ पोटनिवडणूक जाहीर करुन अनुसूचित जमाती महिला प्रवर्गातील पात्र उमेदवारास न्याय द्यावा, असेही या निवेदनात नमूद आहे.

### राजकारण तापण्याची शक्यता

जात पडताळणी समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असल्याने या निर्णयाचे गंभीर परिणाम होण्याची आणि सोलापूर महापालिकेतील राजकारण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणावर प्रशासन कोणती भूमिका घेते? याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

# उपमहापौरपद 'अपशकुन' नव्हेच!

- उपमहापौरपद भूषविल्यानंतरही निवडणुकीत विजय मिळविल्याच्या अनेक घटना
- सोलापूर महापालिकेतील अंधश्रध्देला तीन उपमहापौरांनी दिला छेद




- राजकीय प्रगल्भता, सौहार्द अन् समतोल समन्वयाची परंपरा
- उपमहापौर पदानंतर पुन्हा निवडणूक जिंकत नसल्याचा गैरसमज

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेत उपमहापौरपदी विराजमान झाल्यानंतर संबंधित नगरसेवक पुन्हा निवडणूक जिंकत नाहीत, असा एक गैरसमज गेल्या अनेक वर्षांपासून राजकीय वर्तुळात पसरवला जात आहे. काहींच्या राजकीय सोयीसाठी या गैरसमजाला 'अपशकुन' आणि 'अंधश्रद्धे'चे स्वरूप देण्यात आले. मात्र महापालिकेचा इतिहास पाहिला असता हा अपप्रचार पूर्णतः खोटा ठरला आहे. उपमहापौरपद भूषविल्यानंतरही पुढील निवडणुकीत विजय मिळविल्याच्या घटना घडल्या आहेत.

सोलापूर महापालिकेला स्वातंत्र्य लढ्याचा क्रांतिकारी इतिहास आहे. राजकीय प्रगल्भता, सौहार्द आणि समतोल समन्वयाची मोठी परंपरा आहे. मात्र दुसरीकडे सोलापूर महापालिकेत उपमहापौरपद भूषविल्यानंतर पुन्हा नगरसेवक होत नाही, असा एक गैरसमज निर्माण करण्यात आला आहे. त्याला यापूर्वी छेद दिला आहे. वास्तवात त्याला कसलाही आधार नाही.

उपमहापौरपद भूषविल्यानंतरही पुढील महापालिका निवडणुकीत दणदणीत विजय मिळविण्याच्या अनेक घटना सोलापूर महापालिकेत घडलेल्या आहेत. तत्कालीन उपमहापौर सुषमाताई घाडगे, दिलीप कोल्हे आणि पद्माकर (नाना) काळे ही त्याची ठोस उदाहरणे आहेत. सुषमाताई घाडगे यांनी दि. ७ मे १९९२ ते २० मार्च १९९३ या कालावधीत उपमहापौरपदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. सन २००२ मध्ये झालेल्या सोलापूर महापालिका निवडणुकीत त्या पुन्हा नगरसेविका म्हणून विजयी झाल्या होत्या. उपमहापौरपदानंतरही जनतेचा विश्वास अबाधित राहिल्याचे हे स्पष्ट उदाहरण आहे. दिलीप कोल्हे हे दि. १८ फेब्रुवारी २००५ ते ५ मार्च २००७ या कालावधीत उपमहापौर होते. उपमहापौरपदाची जबाबदारी पार पाडल्यानंतर त्यांनी सन २०१२ मधील म हापालिका निवडणूक जिंकून पुन्हा सभागृहात प्रवेश केला. दरम्यान, पद्माकर (नाना) काळे हे दि. ६ मार्च २००२ ते १८ फेब्रुवारी २००५ या कार्यकाळात उपमहापौर होते. २०१२ च्या महापालिका निवडणुकीतही ते नगरसेवक म्हणून विजयी झाले होते. उपमहापौरपद हे अपयशाचे नव्हे, तर नेतृत्वाची संधी असल्याचे त्यांच्या विजयाने स्पष्ट झाले आहे. उपमहापौरपदानंतर पराभव होतो, हा केवळ राजकीय अपप्रचार असून त्याला कोणताही ऐतिहासिक आधार नाही. कामगिरी, जनसंपर्क आणि विश्वास यावरच निवडणूक विजय ठरतो, पदांवरील अंधश्रद्धेवर नव्हे, हेच महापालिकेचा इतिहास पुन्हा एकदा ठणकावून सांगतो.



### पद नव्हे काम, लोकसंपर्क आणि विश्वासावर मतदारांचा कौल ठरतो

सध्याच्या राजकीय चर्चांमध्ये 'उपमहापौर म्हणजे राजकीय धोका' अशी जी भीती दाखवली जात आहे, ती इतिहासाशी विसंगत असल्याचे स्पष्ट होते.पद नव्हे, तर काम, लोकसंपर्क आणि विश्वास यावरच मतदारांचा कौल ठरतो, हेच या घटनांनी स्पष्ट झाले आहे. सोलापूरमध्ये उपम हापौरपद अपशकुन ठरले नाही तर अपयशी ठरले ते अंधश्रद्धेवर उभे केलेले राजकारण. सोलापूर महापालिकेचा इतिहास पाहिला असता हा दावा तथ्यांवर नाही, तर केवळ समजुतींवर आधारित असल्याचे स्पष्ट होते. निवडणुकांच्या तोंडावर हा अपप्रचार पुन्हा एकदा जोर धरताना दिसतो. मात्र, महापालिकेचा इतिहास पाहिला असता हा दावा तथ्यांपेक्षा गैरसमजुतींवरच अधिक आधारलेला असल्याचे दिसून येते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३४५

जे तो विषयांची मोट झाडी ।
माजीं कामक्रोधांचीं सांकडीं ।
चूकावूनि आला पाडी । सद्वासनेचिया ।।

आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी असे भक्तांचे चार प्रकार आहेत. या पैकी ज्ञानी भक्त सर्वश्रेष्ठ असतो, असे भगवंतांनी अर्जुनाला सांगीतले. ज्ञानी भक्त समता, सत्यता, निस्वार्थबुध्दी, निष्कामकर्म इत्यादीचे परिपुर्ण पालन करतो. तो जगात भेदभाव पाहत नाही. सर्वत्र सदा समदृष्टी ठेवतो. सर्वत्र समदृष्टी ठेवण्यासाठी माणसांतून प्रथम स्वार्थ गेला पाहिजे. स्वार्थ आणि समता एकत्र नांदणे कठीण असते. स्वार्थ म्हटले की मोह, मी, अहंकार, राग, द्वेष या गोष्टी आल्याच. समदृष्टी ठेवणा-या मध्ये प्रथम या नकोत्या गोष्टीचा त्याग झालेला असतो. म्हणजेच तो सत्याबद्यल ज्ञानी झालेला असतो. काम क्रोध टाकूनच या मार्गावर यावे लागते. हे सर्व सांगतांना भगवंत म्हणाले, जे तो विषयांची मोट झाडी-। माजीं कामक्रोधांचीं सांकडीं । चूकावूनि आला पाडी । सद्वासनेचिया ।। अर्थात, ज्ञानी भक्त विषयांच्या दाट झाडीतून काम, क्रोध यांची संकटे टाळून, सद्वासनेच्या पहाडावर येतो. त्यानंतर तो सत्संगतीला लाभून, अप्रवृत्तीला डावी घालून सरळ मार्गाने सत्क्रियेच्या वाटेला लागतो. या वाटेवरुन चालताना त्याला मी व हे जग वेगळे वाटत नाही. भेद नांवाचा प्रकार त्याच्यात उरत नाही. पाण्यात बुडालेल्या भांडयाला जसे आंत, बाहेर फक्त पाणीच असते. अगदी याप्रमाणे या भक्ताला स्वत:त, जगात सर्वत्र केवळ समताच दिसते. हे सर्व एकाच भगवंतांचा अंश आहेत त्यामुळे लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, आपला-परका, हा भेदच यांच्याकडे शिल्लक राहात नाही.



सर्वत्र समता पाहणा-यांची संख्या फारच कमी आहे. जास्तीत जास्त लोक विषयवासना, काम, कोध्र, मोह, लोभ यालाच बळी पडत असतात. मायेचे दास झालेले हे लोक कामवासनेने रंक बनतात. स्वत:च्या बुध्दीने नियमनिर्बंध घालून, पूजाद्रव्यांची जम वाजमव करुन शेकडो देव देवतांची पूजा करीत असतात. पण ख-या अर्थाने भगवंताचे स्थान असणा-या समतेला, सत्याला ते विसरतात. निष्काम भक्ति करणा-यांची संख्या अत्यंत नगण्य आहे. कांही तरी प्राप्त व्हावे म्हणूनच लोक भक्ति करतात. निस्वार्थ भक्तिची, सेवेची खूप गरज असतांनाही लोक या मार्गाचे आचरण करीत नाहीत. मायेच्या पुरात बुडक्या मारणा-यांना आपण यातून बाहेर पडावे असे वाटतही नाही याचे आश्चर्य वाटते. माया नदीतून बाहेर पडण्यासाठी धडपड केली तर निश्चित बाहेर निघण्याच्या मार्ग सापडू शकतो. पण मानसिक तयारीच झाली नसेल किंवा होत नसेल तर बाहेर पडणे दुरापास्त आहे असे भगवंत अर्जुनाला सांगत आहेत. आपण सर्व संसारीक जीव आहोत. संसार म्हटला की, माणसात स्वार्थ, मोह, अहंकार, मीपणा, काम, क्रोध, द्वेष, मत्सर न कळत येतच असतात. पण या सवांर्वर मात करुन संसार करणारी सुध्दा आहेत. जे माया, मोहाचा, काम, क्रोधाचा त्याग करुन कर्तव्य म्हणून संसार करतात, ते खरे सुखी असतात. ज्याच्या मध्ये स्वार्थ नसतो, त्याच्यामध्ये दु:ख देणा-या काम, क्रोधा सारख्या शत्रुबाबी शिल्लक राहात नाहीत ज्याला सर्वत्र समता, सत्यता दिसते, त्याला दु:ख, द्वेष, अहंकार होण्याचे कारणच नाही. सर्वत्र समता पाहणा-यांची फार मोठी गरज आपल्या देशाला व प्रत्येक माणसाला त्याच्या व्यक्तिगत जीवनासाठी आहे. या सर्व बाबीची जाणीव ठेवून सम दृष्टीने वागण्याचा प्रयत्न व्हायला हवा. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ द्वितीया**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- मघा (२२.१०)**
**योग - शोभन (२६.३८)**
**करण - तैतिल (१३.११)**
**राहू काल : मंगळवार : दु. ३.00 ते ४.३0**

**दिनविशेष :**
**१९२८ (सायमन कमिशन निषेध): 'सायमन गो बॅक' अशा घोषणा देत सायमन कमिशनचा मुंबईत कडाडून निषेध करण्यात आला.**
**१९६६ (सोव्हिएत अंतराळयान): सोव्हिएत रशियाने 'लूना-९' हे मानवविरहित अंतराळयान यशस्वीरित्या चंद्रावर उतरवले. चंद्राच्या पृष्ठभागावर उतरणारे हे पहिले अंतराळयान होते.**

## नीट परीक्षेत सोलापूरच्या डॉ. चव्हाण दाम्पत्याचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

नीट (सुपर स्पेशालिटी) परीक्षेत सोलापूरच्या डॉ. दिग्विजय-क्रांती चव्हाण या दाम्पत्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डॉ. क्रांती यांनी देशात तिसरा तर त्यांचे पती डॉ. दिग्विजय विद्यानंद चव्हाण यांनी देशात ५२ वा क्रमांक मिळवला आहे. पती-पत्नीने नीट परीक्षेत मिळवलेल्या या यशाचे एकमेव उदाहरण आहे.



मूळचे सोलापूरचे असलेले डॉ. दिग्विजय चव्हाण यांचे वडील व ३२ वर्षांपासून भूलतज्ज्ञ म्हणून सेवा देणारे डॉ. विद्यानंद मनोहर चव्हाण हे अश्विनी हॉस्पिटलमध्ये सल्लागार समिती सदस्य म्हणून कार्यरत आहेत. अक्कलकोटचे माजी आमदार कै. बी. टी. माने यांचा डॉ. दिग्विजय हा परतवंड आहे. डॉ. क्रांती चव्हाण या मूळच्या आंबेजोगाई (जि. बीड) येथील असून, मे २०२५ मध्ये त्यांचा विवाह डॉ. दिग्विजय चव्हाण यांच्याशी झाला. दोघेही एम. डी. (मेडिसिन) उत्तीर्ण असून, पुढे हृदयरोगतज्ज्ञ होण्याचे त्यांचे स्वप्न आहे. डॉ. दिग्विजय चव्हाण यांचे प्राथमिक शिक्षण सेंट जोसेफ या शाळेत, तर बारावीपर्यंतचे शिक्षण संगमेश्वर महाविद्यालयात झाले आहे. मुंबई येथील सेठ जी. एस. मेडिकल कॉलेज (केईएम) येथून एमबीबीएस पदवी पूर्ण केली असून, लोकमान्य टिळक रुग्णालय, सायन येथून एमडी (मेडिसिन) पदवी संपादन केली आहे. डॉ. क्रांती यांनी मुंबई येथील तोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज (नायर) येथून एमबीबीएस पदवी घेतली असून, लोकमान्य टिळक रुग्णालय, सायन येथून एम. डी. (मेडिसिन) पदवी पूर्ण केली आहे. वैद्यकीय शिक्षणासोबतच कलाक्षेत्रातही त्यांनी ठसा उमटवला असून, 'स्वराज्य रक्षक संभाजी' या मालिकेत त्यांनी वारकऱ्यांची भूमिका साकारली आहे.

# संघशताब्दी वर्षानिमित्त संघ स्वयंसेवकांचा गृहसंवाद कार्यक्रम

## शिक्षणमहर्षी केशव शिंदे यांची भेट : सामाजिक परिवर्तनाची पंचसूत्री घराघरात पोहोचवणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने सोलापूर शहर आणि जिल्ह्यात 'गृहसंवाद' अभियानाचा रविवारी (ता.१) उत्साहात प्रारंभ झाला. १ ते २१ फेब्रुवारी दरम्यान चालणाऱ्या या मोहिमेद्वारे संघाचे विचार आणि सामाजिक परिवर्तनाचे पंचसूत्री घराघरांत पोहोचवण्याचा संकल्प स्वयंसेवकांनी केला आहे.

सुयश गुरूकुलचे संस्थापक अध्यक्ष केशव शिंदे व विद्या शिंदे यांची पश्चिम क्षेत्र शारिरीक प्रमुख सुनील देसाई, सोलापूर जिल्हा संघचालक सुनील इंगळे, सोलापूर शहर सहकार्यवाह मार्तंड कुलकर्णी व सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख असिम सिंदगी यांनी भेट घेत या गृहसंवाद अभियानास प्रारंभ केला. यावेळी केशव शिंदे यांना संघाच्या शताब्दी वर्षाच्या नियोजित कार्याची माहिती देण्यात आली. तसेच, देशासमोरील सामाजिक आव्हाने, आपत्ती व्यवस्थापन आणि राष्ट्र उभारणीत नागरिकांचा सहभाग यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी त्यांना संघाचे अधिकृत साहित्य आणि 'शताब्दी संकल्प' पुस्तिका भेट देण्यात आली. सोलापूर जिल्ह्यातील सर्व गावे आणि शहरातील वस्त्यांमध्ये हे अभियान राबवण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या मोहिमेत सुमारे साडेतीन हजार कार्यकर्ते केवळ वैयक्तिकरित्या नव्हे, तर 'सहकुटुंब' सहभागी होत आहेत. प्रत्येक घरात जाऊन कुटुंबांशी संवाद साधणे आणि त्यांना राष्ट्रकार्यात जोडणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.



**अशी आहे परिवर्तनाची 'पंचसूत्री'**

गृहसंवाद अभियानांतर्गत स्वयंसेवक खालील पाच महत्त्वाच्या विषयांवर समाजाशी संवाद साधत आहेत

१. कुटुंब प्रबोधन: कौटुंबिक मूल्ये आणि संस्कारांची जोपासना.

२. पर्यावरण संरक्षण: जलसंधारण, प्लास्टिक मुक्ती आणि वृक्षारोपण.

३. स्वबोध: स्वदेशीचा वापर आणि आत्मसन्मानाची भावना.

४. नागरी शिष्टाचार: शिस्त आणि सामाजिक जबाबदारीचे भान.

५. सामाजिक समरसता: जातीभेद विसरून एकसंध समाजाची निर्मिती.

**संघाचा विस्तार आणि कार्य**

देशभरात सध्या ८३ हजारांहून अधिक दैनिक शाखा कार्यरत आहेत. व्यक्ती निर्माणातून राष्ट्र निर्माण या ध्येयाने चालणाऱ्या संघाच्या कामाची व्याप्ती आता सोलापूरच्या प्रत्येक गल्लीपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट या अभियानातून ठेवण्यात आले आहे. साप्ताहिक मिलन, सेवा वस्त्यांमधील कार्य आणि तरुणांचा सहभाग यावर या संवाद फेरीत भर दिला जात आहे.

## जि.प. व पं. स. निवडणूक कामकाजाचा उपजिल्हाधिकारी देशमुख यांच्याकडून आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपजिल्हाधिकारी महसूल तथा ग्राम पंचायत निवडणूक प्रमुख संतोषकुमार देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक(दूरदृश्य प्रणाली द्वारे) पार पडली. या बैठकीत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी तसेच नोडल अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान देशमुख यांनी निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी स्पष्ट करून त्याचे महत्व अधोरेखित केले. निवडणूक पारदर्शक, सुरळीत व कायदेशीर चौकटीत पार पडावी यासाठी प्रत्येकाने आपापल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात, असे त्यांनी सांगितले. मतदान केंद्र व्यवस्थापन, साहित्य वितरण, प्रशिक्षण, सुरक्षा व्यवस्था, तसेच म तदार जागृती यासंबंधीच्या जबाबदाऱ्या त्यांनी तपासून पाहिल्या. प्रत्येक नोडल अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात वेळेत व नियोजनबद्ध पद्धतीने काम पूर्ण करावे, अशी सूचना त्यांनी दिली. सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्रत्येक मतदार केंद्रावर करण्यात आलेल्या सुविधाची पाहणी करावी, मतदान केंद्रावर मतदारांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचना बैठकीत देण्यात आली. निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे मतदान केंद्राचे वेबकास्टिंग करण्यात यावे. तसेच निवडणूक कर्मचाऱ्यांना आयोगाच्या निर्देशानुसार प्रशिक्षण देणे, साहित्य व मनुष्यबळ मतदानाच्या दिवशी वेळेवर पोहोचेल यासाठी योग्य नियोजन करणे यावर भर देण्यात आला.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सुधारित कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ गट व पंचायत समितीच्या १३६ गणासाठी निवडणूक प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता ते सायंकाळी ५.३० वाजता या कालावधीत मतदान होईल तर ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजले पासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. देशमुख यांनी सर्व अधिकाऱ्यांना निवडणूक ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया असल्याचे सांगून जबाबदारीने व पारदर्शकतेने काम करण्याचे आवाहन केले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने कोणालाही कोणत्याही प्रकारची अडचण असेल तर तात्काळ निवडणूक शाखेची संपर्क साधावा.



## अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ज्येष्ठ पत्रकार नारायण कारंजकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

सोलापूर तरुण भारतचे व सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तसेच प्रसिद्ध ज्योतिषभास्कर श्री.नारायणराव कारंजकर यांचा अमृत महोत्सवी वर्षानिमित तरुण भारत माजी कर्मचारी समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला.

कारंजकर यांच्या जुळे सोलापूर भागातील शिवगंगा नगरातील निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात तरुण भारतचे माजी संपादक श्री.अरविंद जोशी यांच्या हस्ते शाल व बुके देऊन श्री.कारंजकर व त्यांच्या पत्नी सुमती कारंजकर यांचा सत्कार करण्यात आला व त्यांना समितीच्यावतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी समितीचे कार्याध्यक्ष दशरथ वडतिले, सचिव सुनील आराध्ये, खजिनदार सतीश पाटील, राजेंद्र खमितकर तसेच कारंजकर यांचे सुपुत्र प्रा. महेश, अविनाश व मुलगी शुभदा गणोरे आदी उपस्थित होते. मूळचे कुर्डुवाडीचे असलेले नारायणराव कारंजकर यांनी पत्रकारितेत पन्नासहून अधिक वर्षे विविध पदावर काम केले,ते अनेक पुरस्कारांनी सन्मानित आहेत. त्यांचा आयुर्वेद व ज्योतिषावर खूप अभ्यास आहे.ते २०११ते २०१६या काळात तरुण भारतचे संपादक होते.

## घर घेऊन देण्याच्या बहाण्याने महिलेचा विनयभंग

**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

नई जिंदगी परिसरातील एक विधवा महिला राहायला घर बघत होती. त्यातून फारूक कमिशनर राहणार पानगल हायस्कूल जवळ सोलापूर याच्याशी महिलेची ओळख झाली. त्यातून त्याने मी तुला घर घेऊन देतो, तुला सांभाळतो असे म्हणून महिलेच्या मनास लज्जा वाटेल असे वर्तन केले. महिलेच्या फिर्यादीवरून फारूक कमिशनर विरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. महिलेला स्वत:चे घर घ्यायचे होते. घर पाहण्यातून एकाने फारूक कमिशनर याच्याशी ओळख करून दिली, त्यानंतर काजल नगरात फ्लॅट विक्रीसाठी असल्याचे फारुकने सांगितले. २१ जानेवारी नंतर फारुक याने महिलेला घर बघायला बोलावले. घर पाहून झाल्यावर त्याची किंमत २२ लाख रुपये ठरवली. ३0 जानेवारी रोजी इसारा पावतीसाठी फारूकने त्या विधवा महिलेला घरी बोलावले. त्यात २५ हजार रुपये रोखीने दिल्याचे नमूद होते. त्याचा जाब विचारल्यावर फारूक याने अश्लील भाषा वापरली असेही फिर्यादीत नमूद आहे.

## ए. जी. पाटील इन्स्टिट्यूटमध्ये संशोधन पद्धतीवर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**

शांती एज्युकेशन सोसायटीच्या ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (संशोधन व विकास केंद्र) आणि 'दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया)', सोलापूर लोकल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने Research Idea To Published Paper या विषयावर आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम नुकताच यशस्वीरीत्या संपन्न झाला.

या कार्यशाळेचा मुख्य उद्देश प्राध्यापक, संशोधक व पीएच.डी. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची गुणवत्ता वाढवणे, तसेच संशोधन कल्पनेपासून ते आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जर्नलमध्ये शोधनिबंध प्रकाशित करण्यापर्यंतच्या प्रक्रियेची सखोल माहिती देणे हा होता. कार्यक्रमादरम्यान संशोधन विषयाची निवड, साहित्य सर्वेक्षण , लेखन रचना, जर्नल निवड प्रक्रिया, प्लेजरिझम, नैतिक संशोधन पद्धती आणि प्रकाशन प्रक्रिया यावर एसपीआयटी (मुंबई) व युआयटी (पुणे) येथील तज्ज्ञ वक्त्यांनी मार्गदर्शन केले. उपक्रमासाठी शांती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. सिद्धेश्वर ए. पाटील, सचिव श्री. शिवानंद एस. पाटील आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच 'दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया)' सेंटरचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत जोशी व सचिव इंजि. ओम दरक यांनी सहकार्य केले. संस्थेचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन संयोजक डॉ. एस. आर. साखरे यांनी केले, तर समन्वयक प्रा. एम. एस. बिराजदार यांनी नियोजनाची जबाबदारी पार पाडली. प्रा. आर. डी. मेत्री यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. पी. बी. साबळे यांनी प्रस्तावना व सम ारोपाचे भाषण केले. शेवटी प्रा. एम. एस. बिराजदार यांनी आभार मानले. यावेळी प्रा. एस. जे. लिगाडे, प्रा. ए. एस. लिगाडे, प्रा. पी. एस. स्वामी, प्रा. व्ही. एम. भोगडे, प्रा. एम. एन. देशमुख व प्रा. ए. घालीमठ यांनी योगदान दिले. योगीराज नागूर यांनी तांत्रिक सहाय्य केले.

## मेरा युवा भारत व जिल्हा प्रशासनातर्फे मतदार दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

मेरा युवा भारत व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. यावेळी युवकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. ही पदयात्रा हुतात्मा चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर काढण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हसधिकारी संतोष देशमुख, उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे, तहसीलदार संजय विभुते उपस्थित होते. यावेळी शाहीर रमेश खाडे यांनी मतदानाचे महत्व व संविधान विषयावर पोवाडा सादर करुन उपस्थितांमध्ये जनजागृती केली. कार्यक्रमास प्रवीण धन, सुधाकर बंडगर, रियाज कुरले, सुभाष चव्हाण, धनराज पाटील, प्रा. राजशेखर अळगीकर, फारुक शेख, मधुकर चव्हाण, बापू वारे, श्रीकांत दामजी, नामदेव राठोड, किसान राठोड उपस्थित होते.

## हरिपाठ परिवाराचा वर्धापन दिनानिमित्त मोफत मोतीबिंदू तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ फेब्रुवारी-**



हरिपाठ परिवाराचा तृतीय वर्धापन दिन सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. यानिमित्त मोतीबिंदू तपासणी व मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन शिवसेना नेते ज्ञानेश्वर सपाटे यांच्या हस्ते पार पडले.

हरिपाठ परिवाराच्या माध्यमातून सोलापूर शहरातील विविध भागांमध्ये महिला भजनी मंडळांसाठी मोफत वारकरी पाऊल प्रशिक्षण सुरू असून, तिसऱ्या वर्षात पदार्पण करताना बळीराम जांभळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दहा शाखांतील सुमारे २०० महिलांचा परिचय मेळावा आयोजित करण्यात आला. यात स्वागत नगर, अशोक चौक, लष्कर, हनुमान मंदिर टाकळीकर मंगल कार्यालय, बाळे डुमणे नगर, अवंती नगर आदी शाखांचा सहभाग होता. कार्यक्रमात हरिभक्ति परायण सुधाकर इंगळे महाराज यांनी वारकरी संप्रदायातील हरिपाठाचे महत्त्व विशद केले. तर सीए राजगोपाल मनियार यांनी अयोध्या व श्रीराम मंदिराचे महात्म्य भाविकांना समजावून सांगितले. यावेळी ३0 नागरिकांची मोतीबिंदू तपासणी करण्यात आली असून, मोफत शस्त्रक्रियेसाठी शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय, बाळे यांचे सहकार्य लाभणार आहे. कार्यक्रमात विविध महिला भाविकांनी आपली मनोगते व्यक्त केली. हरिपाठ परिवाराच्या माध्यमातून शहरातील महिला भजनी मंडळांना मोफत हरिपाठ पाऊल प्रशिक्षण देण्याची प्रतिज्ञा बळीराम जांभळे यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिकेत जांभळे, अविराज जांभळे, अंजली लोखंडे व तुकाराम लोखंडे यांनी परिश्रम घेतले.

## मध्यवर्ती शिवजन्मोत्सव महामंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी जयवंत सलगर

**यंदा डॉल्बीला फाटा; पारंपरिक वाद्यांत शिवजयंती मिरवणूक काढण्याचा निर्धार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

मध्यवर्ती शिवजन्मोत्सव म हामंडळाची बैठक डाळिंब आड येथील शिवजयंती मंडळाच्या मैदानात पार पडली. मावळते अध्यक्ष सुशिल बंदपट्टे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सन २०२५२६ या वर्षासाठी मध्यवर्ती शिवजन्मोत्सवाचे नवे पदाधिकारी निवडण्यात आले.

यंदाच्या उत्सव अध्यक्षपदी जयवंत सलगर यांची तर कार्याध्यक्षपदी उत्तरा बरडे- बचुटे, कृष्णा सुरवसे यांची निवड करण्यात आली.

बैठकीत यंदाच्या शिवजयंती मिरवणुकीबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजाला फाटा देत, ढोल-ताशे, लेझीम, रणशिंग, तुतारी यांसारख्या पारंपरिक वाद्यांतूनच शिवजयंती मिरवणूक काढण्याचा निर्धार एकमताने करण्यात आला.

बैठकीस शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्ट अध्यक्ष पद्माकर काळे, पुरुषोत्तम बरडे, राजन जाधव, चंद्रकांत वानकर, दिलीप कोल्हे, सुनील रसाळे, भाऊ रोडगे, विजय पुकाळे, लहू गायकवाड नगरसेवक शिवजी वाघमोडे, श्रीकांत डांगे, ज्ञानेश्वर सपाटे श्रीकांत घाडगे महादेव गवळी, मतीन बागवान, प्रकाश ननवरे, शिवा कामठी, प्रताप चव्हाण, सुरज बडगर, गणेश डोंगरे, अशोक कलशेट्टी, गजानन चक्रपाणी, आबा सावंत, सोनू खरात, जवाहर जाजू, पंकज काटकर, ॲड. रामचंद्र कदम, जीवन यादव, ब्रह्मदेव पवार उपस्थित होते. मध्यवर्ती महामंडळामध्ये काम केलेले पदाधिकारी शिवाजी वाघमोडे, महादेव गवळी यांची यांची कन्या, विनोद भोसले, मंडळाचे ट्रस्टी अनिकेत पिसे, नगरसेवक झाल्या प्रित्यात मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.



**मध्यवर्तीचे नूतन पदाधिकारी असे**

कृष्णा सुरवसे, उपाध्यक्ष चारुशीला जगदाळे, संजीवनी मुळे, अनिरुद्ध पाटील, नामदेव पवार, रमेश जाधव, किरण भंडारी, सेक्रेटरी पुरुषोत्तम भोगडे, सह सेक्रेटरी अंबादास सपकाळ, खजिनदार संदीप काशीद, सहखजिनदार सुजित चौगुले, मिरवणूक प्रमुख विजय पुकाळे, प्रसिद्धीप्रमुख दीपक शेळके, कृष्णकांत चव्हाण, कुस्ती प्रमुख विठ्ठल कलाकते बापू जाधव, कार्यालय प्रमुख तुषार गायकवाड,कृष्णा भुरळे, देविदास घुले, सोमनाथ बनसोडे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### सांगोल्यातील झोपडपट्टीतील रहिवासी मुलांना यात्रेची सफर

**✻ आपुलकी प्रतिष्ठान व कोर्ट रिसिव्हर समितीचा उपक्रम**

**सांगोला, दि. २ फेब्रुवारी-**



सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठान व कोर्ट रिसिव्हर अंबिकादेवी यात्रा समिती, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने झोपडपट्टीतील मुले व त्यांच्या कुटुंबियांना यात्रेचा आनंद द्विगुणित करणाऱ्या पाळण्याचा आनंद देऊन नंतर खाऊ देवून यात्रेची सफर घडविण्यात आली. पोटाची खळगी भरण्यासाठी दिवसभर भटकंती करुन मिळेल त्यात समाधान मानणारी ही भटकी कुटुंबे आपल्या प्रपंचाचा गाडा ओढताना होणारी दमछाक कोणाला सांगणार ? अशा परिस्थितीत यात्रेचा आनंद मुलांना मिळणे तसे दुर्मिळच. यावर्षी कोर्ट रिसिव्हर ॲड. सारंग वांगीकर, ॲड. विक्रांत बनकर, ॲड. विशालदीप बाबर, ॲड. नितीन बाबर, ॲड. शशिकला खाडे, ॲड. महेंद्र पतकी व पाळण्याचे मालक प्रदीप इंगोले (वाढेगाव) यांच्या सहकार्याने लक्ष्मीनगर झोपडपट्टीतील मुलांना यात्रा दर्शन घडविण्यात आले. यावेळी आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, वसंत माने, महादेव दिवटे, अरविंद डोंबे, अतुल वाघमोडे उपस्थित होते.



### नगरसेवक महेश इंगळे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २ फेब्रुवारी-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे हे सलग सहाव्यांदा अक्कलकोट नगरपरिषदेवर नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल अक्कलकोट तालुका पुणे रहिवासी संघ पुणे व प्रा. राहुल रुही मित्रपरिवार यांच्या वतीने नगरसेवक महेश इंगळे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी बोलताना प्रा.राहूल रुही यांनी पुण्यातील प्रत्येक अक्कलकोट वासियांच्या सदिच्छा व पाठिंबा या महेश इंगळे यांच्या सोबत असून प्रत्येक कष्टकरी आणि मेट्रो शहरातील लोकांना श्री स्वामी समर्थांचा आणि चेअरमन महेश इंगळे यांचा मोठा आधार आहे. नेहमी सर्व सम ाज बांधवांना त्यांचे सहकार्य आहे असे मनोगत व्यक्त केले. यावेळी रहिवासी संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. राहुल रुही, अमेरिकेचे प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. सुनील गायकवाड, सचिव चंद्रकांत शिंगे बनसोडे, उपाध्यक्ष अविनाश शिंगे, कार्याध्यक्ष रमेश वटार, रवी मुंदेनकेरी आदी उपस्थित होते.

### महाशिवरात्री, कलश वर्धापन दिनानिमित्त बार्डी येथे अखंड हरिनाम सप्ताह

**करकंब, दि. २ फेब्रुवारी-**



महाशिवरात्र व कलश वर्धापन दिनानिमित्त बार्डी येथील महादेव मंदिरामध्ये शुक्रवार दि.६ ते सोम वार दि.१६ फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेआहे. या सप्ताहानिमित्त नामवंत प्रवचनकार, कीर्तनकार, हरीजागर, काकडा अशा अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून बळीराम व्यवहारे,आदेश घाडगे, कृष्णा शिंदे, शिवाजी पवार, तुकाराम भोसले, बाबासाहेब उगले, प्रकाश कापसे, श्रीहरी साळुंखे, हनुमंत जाधव ,रुद्र पवार या म हाराष्ट्रातील दिग्गज प्रवचनकारांची प्रवचने तसेच सूर्याजी भोसले, ज्ञानेश्वर कदम आळंदी,विनोदाचार्य सोपान इंगळे बीड, अंकुश रणखांबे अकलूज,ज्ञानसिंधू सागर बोराडे नातेपुते, गायनाचार्य कविराज झावरे पारनेर, विद्यावाचस्पती जलाल सय्यद नाशिक,गुरुवर्य उल्हास सूर्यवंशी देवाची आळंदी ,मोहन पाटील, सांगली, सतीश कदम आष्टा हे म हाराष्ट्रातील दिग्गज कीर्तनकार कीर्तनसेवा करणार असून काल्याची किर्तनसेवा गुरुवर्य सुधाकर महाराज इंगळे सोलापूरकर यांची होणार आहे. तरी बार्डी व परिसरातील सर्व शिवभक्तांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बेकायदेशीर व तोतया पशुवैद्यक उपचार करताना आढळल्यास कायदेशीर कारवाई

**सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय पंढरपूर यांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ फेब्रुवारी-**




पंढरपूर तालुक्यात काही व्यक्ती पशुवैद्यकीय अधिकारी असल्याचे भासवून पशुधनांवर औषधोपचार करत आहेत. त्यांच्याकडे कोणताही वैधानिक परवाना नाही. अधिकृत अधिकार नाहीत, असे असताना पशुवैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया करत असल्याच्या तक्रारी पशुपालकांकडून प्राप्त होत आहेत.

यासंदर्भात व्हिडिओ, छायाचित्रे व इतर पुरावे कार्यालयास प्राप्त झाले आहेत. हा प्रकार पूर्णतः बेकायदेशीर आहे. त्यामुळे पशुधनाच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होत आहे. चुकीचे निदान व अयोग्य उपचारांमुळे पशुपालकांचे आर्थिक नुकसान होत असून अनेक वेळा पशुधनाच्या जीवितासही धोका निर्माण होत आहे. त्यामुळे येथून पुढे असे उपचार करणाऱ्या बेकायदेशीर व तोतया पशुवैद्यकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय पंढरपूर यांनी दिला आहे.

पंढरपूर तालुक्यातील सर्व संबंधित तोतया पशुवैद्यकांना तसेच अशा प्रकारचे उपचार करणाऱ्या व्यक्तींना कळविण्यात येते की, भविष्यात कोणतीही व्यक्ती बेकायदेशीर पशुवैद्यकीय उपचार, शस्त्रक्रिया करताना आढळून आल्यास कारवाई करण्यात येणार आहे.

संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र पशुवैद्यकीय परिषद अधिनियम व महाराष्ट्र पशुधन प्रजनन अधिनियम २०२३ अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय पंढरपूर यांच्याकडून देण्यात आला आहे. यामुळे पंढरपूर तालुक्यातील बेकायदेशीर व तोतया पशुवैद्यकांचे धाबे दणाणले आहेत.



## अखेर बसवेश्वर पुतळ्याचे काम सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

अखेर बहुप्रतिक्षित बसवेश्वर सर्कल (कोंतम चौक) येथील जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळा उभारणी कामाला सुरुवात झाली.

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळा उभारणीचे काम गेली तीन वर्षे सुरू होते. पण काम पूर्ण होत नव्हते. महापालिका प्रशासनाकडून या कामात दिरंगाई होत होती. केंद्रीय आयुष मंडळाचे सदस्य व शिव-बसव चरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे व महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव मंडळ (जुळे सोलापूर)चे अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे यांच्या हस्ते पुतळा उभारणी कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

याप्रसंगी चंद्रकांत रमणशेट्टी, ॲड. राजशेखर बिराजदार-पाटील, वीरेंद्र हिंगमिरे, आनंद मुस्तारे, गणेश चिंचोळी, बाबासाहेब कुलकर्णी, शिवलिंगप्पा शाबादे, विश्वनाथ आमणे, दशरथ वडतीले, बसवराज बगले, चन्नवीर चिट्टे, शशिकांत बिराजदार, सकलेश बाभुळगावकर, भीमाशंकर पदमगोंडा, दयानंद भोरे, वैभव विभुते, सिंधुताई काडादी, पुष्पा गुंगे, शशिकला रामपुरे, प्रार्थना बिज्जरगी, वर्षा विभुते, विद्या जोडभावी, स्मिता नाईक, माधुरी बिराजदार, रेश्मा निडगुंदी, साक्षी हौदे उपस्थित होते सूत्रसंचालन राजशेखर बुरकुले यांनी तर आभार अमित रोडगे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बसवराज लोहार, सुनील धरणे, विजयकुमार बिराजदार, सोमनाथ चौधरी, राहुल जत्ती, सिद्राम छपेकर, विशाल पाटील, राहुल कत्ते यांनी परिश्रम घेतले.



## सरकारला सद्बुध्दी यावी यासाठी संत तुकाराम गाथा पारायण

**भामचंद्र डोंगर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मधुसूदन महाराज करणार आंदोलन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ फेब्रुवारी-**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची तपोभूमी असलेला पुणे जिल्ह्यातील भामचंद्र डोंगर लँडमाफीया पोखरून काढत असून शासन यास पाठीशी घालत असल्याचा आरोप संतभूमी संरक्षक संघर्ष समितीचे संस्थापक मधुसूदन महाराज पाटील यांनी केला आहे. ही तपोभूमी अतिक्रमणमुक्त करण्याची सद्बुध्दी शासनास यावी यासाठी वारकरी संप्रदायासह दि. १० मार्च रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर गाथा पारायण केले जाणार आहे.

याबाबत संघर्ष समितीच्या वतीने पंढरपूर येथे पत्रकार परिषदेच आयोजन करण्यात आले होते. यास शिवक्रांती संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय काळे, संघर्ष समितीच्या कार्याध्यक्ष माधवी माने, शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले, मराठा महासंघाच्या अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख बब्रुवान शेंडगे-पाटील उपस्थित होते. विशेष म्हणजे या डोंगरावर प्राचीन गुफा असून अडीच हजार वर्षा पूर्वीच्या लेण्या आहेत. पुरातत्व विभाग, वन विभाग यांच्या अंतर्गत येथील काही भाग असताना देखील मोठ्या प्रमाणात मातीचा, दगडांचा उपसा सुरू आहे. याविरोधात अनेक आंदोलन केल्यानंतर राज्य शासनाने २०११ साली हे क्षेत्र राज्य संरक्षित स्मारक म्हणून अधिसूचना काढली आहे. तरीही याची अंमलबजावणी होत नाही. या विषयी विविध मंत्री, खासदार, आम दार यांना भेटून देखील कारवाई होत नसल्याने आता शासनास सद्बुध्दी व्हावी म्हणून थेट आझाद मैदानावर संत तुकाराम गाथेचे पारायण सुरू करणार असल्याचे मधुसूदन महाराज यांनी सांगितले.

आंदोलनास वारकरी फडकरी दिंडी संघटना, वारकरी पाईक संघ, औसा संस्थान आदींसह विविध म हाराज मंडळींनी पाठींबा दिला आहे. यानंतरही शासनाने योग्य ती कार्यवाही न केल्यास वारकऱ्यांमधील विद्रोही तुकाराम जागा झाल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा मधुसूदन महाराज पाटील यांनी दिला आहे.

### कामतकर ॲकॅडमीतर्फे रविवारी टॅलेंट सर्च परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**



इ. ५ वी व ८ वी मराठी/ सेमी/इंग्रजी माध्यमांसाठी स्कॉलरशीप बोर्डाच्या धर्तीवरती विद्यार्थ्यांच्या सरावासाठी कामतकर ॲकॅडमीतर्फे दि. ८ फेब्रुवारी रविवार रोजी वेळ सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत 'सोलापूर टॅलेंट सर्च' परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परीक्षा कामतकर क्लासेस जुना एम्प्लॉयमेंट चौक, कामत हॉटेलमागे येथे घेण्यात येणार आहे. कामतकर ॲकॅडमी आयोजित सोलापूर टॅलेंट सर्च २०२५ - २६ (स्कॉलरशीप पूर्व परीक्षा) गेली १० ते १५ वर्षांपासून सोलापुरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत प्रोत्साहन मिळावे याकरिता कामतकर ॲकॅडमीतर्फे सोलापूर टॅलेंट सर्च परीक्षा घेतली जाते. अधिक माहितीसाठी निलेश ९८९०१३०००४, श्रीकांत ७९७२०४१४६९ यानंबरवर संपर्क साधावा.

## सायबर गुन्ह्यातील होल्ड करण्यात आलेले बँक खाते अनफ्रीज करण्याचे न्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

या प्रकरणातील हकीकत अशी की, तक्रारदार यांचे युनियन बँक ऑफ इंडिया शाखा बार्शी या बँकेत खाते आहे. खात्यामध्ये ५०,०००/- रुपये जमा झालेबाबत मेसेज तक्रारदार यांना आला. त्यानंतर त्यांना अज्ञात नंबरवरुन फोन आला की, माझ्याकडून चुकून ५०,०००/- रुपये तुमचे खात्यामध्ये गूगल पे द्वारे जमा झाले आहेत ते मला परत पाठवा. त्यानुसार अर्जदार यांनी ते ५०,०००/- रुपये परत पाठविले. त्यानंतर अर्जदार यांचे खाते सायबर तक्रारीवरुन सायबर क्राइम झोन खुशीनगर, उत्तरप्रदेश यांचेकडून फ्रीज करण्यात आले.

सदर गोष्ट तक्रारदार यांना समजल्या नंतर त्यांनी वेळोवेळी महाराष्ट्र सायबर क्राइमला ई-मेलद्वारे तसेच महाराष्ट्र सायबर क्राइम ग्राहक क्रमांक १९३० या क्रमांकावर संपर्क करुन सर्व हकीकत सांगितली असता संबंधित विभागाने अर्जदार यांच्या खात्याची संपूर्ण माहिती विचारुन घेऊन योग्य ती चौकशी केली व अर्जदार यांची तक्रार नोंदवून घेतली. परंतू सदर तक्रारदाराचे बँक खाते गोठविल्यामुळे अर्जदार यांची रक्कम अडकून पडली होती, कोणतेही व्यवहार होत नव्हते. त्यामुळे सदर तक्रारदार यांनी ॲड. ऋषिकेश ननवरे यांचेमार्फत बार्शी येथील न्यायालयात सदर खाते अनफ्रीज करण्यासाठी अर्ज केला होता. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर झाली.

सदर प्रकरणी खाते अनफ्रीज करण्यासाठी तक्रारदार यांचे वकिलांनी योग्य ते पुरावे दाखल करुन युक्तिवाद केला. ॲड. आर. के. ननवरे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन कोर्टाने अर्जदार यांच्या अर्ज मंजूर केला. पुरावे व अनेक बाबींची पडताळणी करुन न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

सदर प्रकरणी यात तक्रारदार यांच्यावतीने ॲड. ऋषिकेश ननवरे, ॲड. अक्षय धस, ॲड. प्रदीप शेळवणे यांनी काम पाहिले.

## 'भैरवनाथाच्या नावानं चांगभलं'च्या जयघोषात मेडदची यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २ फेब्रुवारी-**

मेडद (ता.माळशिरस) येथील ग्रामदैवत कालभैरवनाथाची यात्रा मोठ्या उत्साहात व भक्तिभावात संपन्न झाली. येथील ग्रामदैवत भैरवनाथाची यात्रा माघ पोर्णिमेला साजरी केली जाते. सोनारीच्या कालभैरवनाथाचे स्थान म्हणून व नवसाला पावणारा नाथ म्हणून या भैरवनाथावर भाविकांची मोठी श्रद्धा आहे.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून डवरी समाज मोठ्या संखेने येतो. आज सकाळी पहाटे महाआरती झाल्यानंतर श्री ची रथातून मिरवणूक गावातील प्रमुख म ार्गावरून काढण्यात आली. भैरवनाथाच चांगभल, देवाच्या घोड्याच चांगभल या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या ग्रामदेवतास बोललेला नवस फ ेडण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी असते. घरोघरी आपल्या दारात १० रुपयांपासून ५०० रुपयांच्या नोटांचे हार घेऊन थांबले होते ..दरवर्षी १० रु च्या नोटापासून पाचशे रुपयांचे नोटाचे हार रथावर भाविक बांधतात. प्रत्येक वर्षी रथावरील नोटांच्या हाराच्या माध्यमातून व मंदिरात रोख देणगी मधून लाखो रुपये देवस्थान ला जमा होतात..दोन दिवस यात्रेत आलेल्या खेळण्यामध्ये बसण्यासाठी मुलांनी मोठी गर्दी केली होती

आज सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती .सकाळी सुरु झालेला रथोत्सव ग्राम प्रदक्षणा घालून सुमारे अडीच वाजता मंदिरात परत आला. दुपारी कुस्त्याच्या मैदानानंतर या यात्रेची सांगता होते.यात्रा काळात कसलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी माळशिरस पोलीस ठाण्याचे पो नि.विकास दिंडूरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता..



# विज्ञान प्रदर्शनात नागनळळी आश्रमशाळा राज्यात द्वितीय

**राष्ट्रीय स्तरासाठी निवड**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ फेब्रुवारी-**

राज्य विज्ञान संस्था, नागपूर व श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन (२०२५-२६) दि. २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत नागपूर येथे पार पडले. या प्रदर्शनात महाराष्ट्र राज्यातून माध्यमिक गटातील १११ वैज्ञानिक उपकरणांची मांडणी करण्यात आली होती.



नामदार डॉ.पंकज भोयर, शालेय शिक्षण, गृह निर्माण, गृह (ग्रामीण),सहकार व खाण खात्याचे राज्यमंत्री महाराष्ट्र, डॉ. महेंद्र ढोरे प्र. कुलगुरू अमरावती, कार्यक्रम अध्यक्ष केशवराव मेतकर, डॉ. मिलिंद बाराहते कुलगुरू संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, डॉ. राजकुमार अवसरे संचालक. राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर या मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. के. एस. एम. कनिष्ठ महाविद्यालय, नागनळळी येथील विद्यार्थी फडतरे ओंकार व महेश टेंगळे यांनी स्मार्ट ग्रीकल्चर, कॅटल फार्म व बहुउपयोगी शेतीयंत्र हा अभिनव वैज्ञानिक प्रकल्प सादर केला. या प्रकल्पास माध्यमि क गटातून राज्यात द्वितीय क्रमांक मिळून राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.या प्रकल्पामुळे शेती व्यवस्थापन अधिक सुलभ, आधुनिक व कार्यक्षम होते. ESP३२ + $M^2$ तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हवामान निरीक्षण, पाणीपुरवठा व सिंचन प्रणालीवर अचूक नियंत्रण ठेवता येते, त्यामुळे पाण्याची बचत होते.

पशुपालनासाठी लागणारा वेळ, श्रम व खर्च कमी होतो. गोठ्यातील पाळीव प्राण्यांच्या देखभालीसाठी स्वयंचलित प्रणाली उपलब्ध असून संपूर्ण यंत्रणा सौरऊर्जेवर आधारित असल्याने वीज खर्चात बचत होते व पर्यावरणपूरक शेतीला चालना मिळते. बहुउपयोगी शेतीयंत्राच्या मदतीने औषध फवारणी, तण नियंत्रण व पेरणी करता येते, त्यामुळे मजुरीचा खर्च कमी होतो. हे सर्व कार्य मोबाईलद्वारे नियंत्रित करता येते. या विद्यार्थ्यांना प्रशालेतील शिक्षक प्रा. विज्ञान रवींद्र नवले, अमोल पाटील, शंभुलिंग बशेट्टी, वसीम शेख, शुभांगी मिठारे व प्रयोगशाळा सहाय्यक शेख नूरुद्दीन यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल प्रशांत आरबळे, गटशिक्षणाधिकारी (अक्कलकोट) यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक केले. संस्थेचे सचिव जावेद पटेल, प्राचार्य आय. एम.मुजावर, मुख्याध्यापक आर. जी. शेख यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## बार्शीच्या राऊत पिता-पुत्रांचे प्रजासत्ताकदिनी दिल्लीत सनई वादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ फेब्रुवारी-**

बार्शीच्या सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय मंचावर झळकण्याची संधी मिळाली आहे. इयत्ता सातवीत शिकणारा बार्शी येथील सोहम राऊत व त्याचे वडील सचिन राऊत हे २६ जानेवारी २०२६ रोजी नवी दिल्लीतील कर्तव्यपथावर प्रजासत्ताक दिनाच्या भव्य परेडमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्यावतीने 'वंदे मातरमची १५० वर्षे' या ऐतिहासिक थीमवर आधारित चित्ररथ आणि सांस्कृतिक कार्यक्रमात सचिन व सोहम राऊत यांचा सहभाग होता. संगीत नाटक अकादमी आणि उत्तर क्षेत्र सांस्कृतिक केंद्र यांच्या संयुक्त आयोजनात देशभरातील पारंपरिक लोकवाद्यांचे सादरीकरण झाले असून, या समूहात सोहम शहनाई आणि संबळ वाजले आहे.



महाराष्ट्र विद्यालय, बार्शी येथे शिक्षण घेणारा सोहम हा सुप्रसिद्ध शहनाई वादक सचिन राऊत यांचा मुलगा आहे. वडिलांकडून बार्शीकरांसाठी गौरवाची व अभिमानास्पद बाब दिल्लीतील कर्तव्यपथावर सनई वादन केले राऊत पिता-पुत्रानी. मिळालेल्या कलेच्या वारशाला त्याने कठोर अभ्यास आणि अखंड साधनेने पुढे नेले आहे. अल्पवयातच राष्ट्रीय स्तरावरील या सर्वो च्च व्यासपीठावर पोहोचणे हे सोहमच्या प्रतिभेचे, संस्कारांचे आणि जिद्दीचे उत्तम उदाहरण आहे.

प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक पंडित लोकेश आनंद यांच्या हाती असून, पुण्याचे नामवंत शहनाई वादक पंडित प्रमोद गायकवाड आणि त्यांचे १८ शिष्य यात सहभागी झाले होते. शहनाई, सुंदरी, संबळ अशा पारंपरिक वाद्यांच्या सुंदर संगमातून भारतीय संस्कृतीचे वैभव दाखवले गेले आहे. विशेष बाब म्हणजे सांस्कृतिक मंत्रालयाकडून सोहमला शहनाई वादनासाठी दोन वर्षांची शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे, जी त्याच्या मेहनतीची आणि कलेच्या गुणवत्तेची पावती आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल महाराष्ट्र विद्यालय, केंद्र संचालक डॉ. अबोली सुलाखे, वीर सावरकर रोड मित्र मंडळ आणि बार्शीवासीयांकडून राऊत पिता-पुत्रांवर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

आपला जिल्हा
जिल्हा परिषद व पंचायत समितीची रणधुमाळी
मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६







# सगळ्यांना म्हणतात मी तुमचाच...

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी लगावला टोला



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ फेब्रुवारी -**

हा गडी सकाळी उठतो आणि बोराटवाडीला येतो, नंतर दुपारी अकलूजला जातो, रात्री देवगिरीवर जातो आणि मध्यरात्री वर्षावर जातो. सगळ्यांना म्हणतो मी तुमचाच, आता प्रश्न पडलाय हे सगळ्यालाच म्हणतात मी तुमचा आहे तर नेमके हे कोणाचे अशा शब्दात जयकुमार गोरे यांनी शरद पवार गटाचे माढ्याचे आमदार तथा विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्यावर टीका केली.

सध्या सगळीकडेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकीची रणधुमाळी सुरु आहे. पालकमंत्र्यांनी देखील जिल्हाच्या विविध भागात जाहीर सभांचा सपाटा सुरु केलेला आहे. पंढरपूर तालुक्यात देखील पालकमंत्री गोरेंची सभा पार पडली. यावेळी जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकांमध्ये देखील राज्यभर कमळ फुलेल. सोलापूर जिल्ह्यात देखील भाजपाचीच जिल्हापरिषदेवर सत्ता येईल असा विश्वास पालकमंत्री गोरे यांनी यावेळी व्यक्त केला.

दरम्यान आमदार अभिजीत पाटील यांनी भाजपाचा सुपडासाफ करण्याचे वक्तव्य केलेले होते. त्यामुळे पालकमंत्र्यांनी आमदार पाटलांची सभांमधून समाचार घेतला. पालकमंत्री गोरे म्हणाले, हा गडी सगळ्यांना म्हणतो मी तुमचाच, आता प्रश्न पडलाय हे सगळ्यालाच म्हणते मी तुमची तर ही नेमकी कोणाची अशा शब्दात जयकुमार गोरे यांनी अभिजीत पाटील यांच्यावर टीका केली. ऐवढेच नाही तर याचे बुड कुठे स्थिर नाही असे सांगताना हा फिरता रंगमंच आहे का ? असा सवाल देखील उपस्थित नागरिकांना पालकमंत्र्यांनी केला. अभिजीत पाटील यांच्या कामाच्या पध्दतीवर टिका करताना पालकमंत्री म्हणाले, माढा तालुक्यात महापूर आला होता. त्यावेळी तालुक्याच्या विविध भागात खूप वाईट परिस्थिती होती. बऱ्याच गावात पाणी शिरले होते. मी तिथं गेल्यावर तातडीने आयुक्तांशी बोलून परिस्थितीचे गांभीर्य सांगितले.

मुख्यमंत्र्यांना सांगून या भागात लोकांना वाचवण्यासाठी मिलिटरी आणि हेलिकॉप्टरची व्यवस्था करायला सांगितली. मात्र हा गडी माझ्या शेजारीच उभा होतां. तिथून बाहेर पडतात याने लगेच सांगायला सुरुवात केली की मीच मिलिटरी बोलवली, मी हेलिकॉप्टर बोलवले, अशा शब्दात अभिजीत पाटील यांची नक्कल करीत त्यांनी बोलवल्यावर साध कुत्रं तरी येईल का? अशी घणाघाती टीका देखील यावेळी पालकमंत्र्यांनी केली.

### ....तर मोहिते-पाटलांच्या कारखान्याच्या गव्हाणी बंद पडतील

दुसरीकडे, भाजप आणि मोहिते पाटील गटातील वाद आता जाहीर सभांमधून उफाळून येऊ लागला आहे. पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथे झालेल्या जाहीर सभेत पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यावर देखील सडकून टीका करत थेट इशाराच दिला आहे. सभेत बोलताना जयकुमार गोरे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अडचणीच्या काळात मोहिते पाटील यांना छत दिलं. पश्चिम महाराष्ट्रात संपत चाललेल्या एका घराण्याला ताकद दिली. मात्र आज तेच मोहिते-पाटील मुख्यमंत्र्यांच्या विरोधात बोलत आहेत. अशा शब्दांत त्यांनी धैर्यशील मोहिते पाटील यांना टोला लगावला. जर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत काढले तर मोहिते-पाटलांच्या कारखान्याच्या गव्हाणी बंद पडतील, असा देखील सज्जड इशारा यावेळी पालकमंत्र्यांनी मोहिते-पाटील यांना दिला.

# 'पांगरी'च्या रणसंग्रामात 'कांटे की टक्कर'


## जनतेची साथ विकासाला की वर्चस्वाला?











**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे बिगुल वाजले असून, ग्रामीण भागातील राजकीय पारा सध्या शंभरी पार गेला आहे. विशेषतः पांगरी जिल्हा परिषद गट आणि त्यांतर्गत येणाऱ्या पांगरी-कारी पंचायत समिती गणांमध्ये आजी-माजी आमदारांच्या वर्चस्वाची लढाई आता 'करो या मरो' या निर्णायक टप्प्यावर येऊन ठेपली आहे. ही निवडणूक केवळ उमेदवारांची नसून, बार्शीच्या राजकीय ध्रुवीकरणाची दिशा ठरवणारी ठरणार आहे.

### दिग्गजांचे शड्डू आणि चौरंगी मुकाबला

पांगरी गटात आरक्षणाच्या समीकरणानुसार तगड्या उमेदवारांनी मैदानात उडी घेतल्याने निवडणूक अत्यंत चुरशीची झाली आहे. हा गट सर्वसाधारण महिलेसाठी आहे. येथे भाजपाच्या रेश्मा डोके आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या मीना विधाते यांच्यात हायव्होल्टेज संघर्ष पाहायला मिळत आहे. त्याअंतर्गत कारी पंचायत समिती गण नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आहे. येथे भाजपाचे किरण घुले विरुद्ध राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे योगेश मुंढे अशी अटीतटीची थेट लढत होत आहे. तर पांगरी पंचायत समिती गण अनुसूचित जाती साठी असून येथे बहुकोणीय थरार असून राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) शिवाजी गायकवाड, भाजपाचे शरद बसवंत, वंचितचे सागर कदम आणि अपक्ष मिलिंद बनसोडे नशीब आजमावत आहेत.

मतांचे गणित: विजयाची गुरुकिल्ली कोणाकडे?

पांगरी गटात एकूण ३८ हजार ४९६ मतदार असून, मोठ्या गावांमधील मतदानाची टक्केवारी कोणाच्या पारड्यात पडते, यावरच विजयाचे समीकरण ठरेल. पांगरी जिल्हा परिषद गटात ४६ बूथ असून ३८ हजार ४९६ मतदार आहेत. पांगरी गणात २२ बूथ असून १९ हजार ३५४ मतदार आहेत. यामध्ये ९९७० पुरूष तर ९ हजार ३८४ महिला मतदार आहेत. कारी पंचायत समिती गणात २४ बूथ आहेत. येथे एकूण १९ हजार १४२ मतदार आहेत त्यामध्ये १० हजार ३१ पुरूष व ९ हजार १११ महिला मतदार आहेत.

### महत्त्वाची गावे

पांगरी, चारे, काटेगाव, शिराळे, वालवड, कारी, खामगाव या मोठ्या गावांमधील कौल निर्णायक ठरणार आहे.

### दोन नेत्यांची रणनीती

'चाणक्य नीती' विरुद्ध 'सत्ताधारी' झंझावात

आमदार दिलीप सोपल यांनी या निवडणुकीत आपली सर्व ताकद पणाला लावली आहे. त्यांनी शिवसेना (उद्धव ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार व शरद पवार गट) अशा सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची मोट बांधून एक मोठी रणनीती आखली आहे. सोपल यांची ही 'चाणक्य नीती' मतदारांना किती प्रभावित करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी प्रचाराचा धुरळा उडवून दिला आहे. अनेक मोठ्या कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश घडवून आणत त्यांनी विरोधकांसमोर आव्हान उभे केले आहे. बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती याच गटातील असल्याने आणि बाजार समितीसह नगरपालिकेवर राऊत गटाचे वर्चस्व असल्याने भाजपा-रिपाई (आठवले गट) युतीला याचा मोठा फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### प्रचाराचा धुरळा आणि प्रतिष्ठेचा प्रश्न

सध्या पांगरी आणि कारी परिसरात घरोघरी प्रचारावर भर दिला जात आहे. आरक्षणाच्या गणितात बसणारे हे तगडे उमेदवार आणि त्यांच्या पाठीशी उभी असलेली नेत्यांची रसद यामुळे ही निवडणूक 'काटे की टक्कर' ठरत आहे. थोडक्यात पांगरी गटातील निकाल बार्शीच्या राजकारणातील आगामी सत्तेची नांदी ठरेल. आता जनता 'विकासाला' साथ देते की 'वर्चस्वाला' हे येणारा काळच सांगेल.

# माढ्यात भाजप, राष्ट्रवादीत चुरस

# दोन्हीकडून सभांचा धडाका

## मोहिते-पाटील, आ. पाटील, शिंदे, सावंत आणि साठेंची प्रतिष्ठा पणाला

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीची प्रचाराची रणधुमळी शिगेला पोचली असून तालुक्यातील ७ जिल्हा परिषद गट व १४ पंचायत समिती गणातील निवडणुकीसाठी भाजपा व राष्ट्रवादीमध्ये मोठी चुरस पहावयास मिळत आहे. गट व गणामध्ये ठिकठिकाणी पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार अभिजीत पाटील, जिल्हा दूध संघाचे संचालक रणजित शिंदे यांच्या सभा होत आहेत. या सभांमध्ये विकास कामावरून तसेच उसाच्या प्रश्नांवरून भाजप विरुद्ध राष्ट्रवादी मध्ये आरोप प्रत्यारोप होत असून मोहिते-पाटील विरुद्ध शिंदे हे समीकरण पहावयास मिळत आहे.

मानेगाव व उपळाई जिल्हा परिषद या दोन्ही गटाच्या निवडणुका भाजप व राष्ट्रवादीसाठी प्रतिष्ठेच्या मानल्या जात असून या निवडणुकीमध्ये मोठी चुरस दिसून येत आहे. मानेगाव जिल्हा परिषदेच्या जागेसाठी भाजपकडून प्रा.शिवाजीराव सावंत यांचे सुपुत्र पृथ्वीराज सावंत तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून मार्केट कमिटीचे उपसभापती सुहास काका जामगावकर हे निवडणुकीच्या रिंगणात असल्याने या ठिकाणी मोठी चुरस आहे. ही निवडणूक भाजप व सावंतांसाठी प्रतिष्ठेची झाली आहे. प्रा. सावंत यांनी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पदाचा



राजीनामा देऊन शिवसेनेपासून लांब राहणे पसंत करत भाजपाच्या तिकिटावरून पृथ्वीराज सावंत यांना मानेगाव जिल्हा परिषद गटासाठी उभा केले आहे. त्यामुळे तालुक्यातील राजकारणाची समीकरणे बदलली आहेत. तसेच सुहास पाटील जामगावकर हे यापूर्वी शिंदे गटाचे एकनिष्ठ असलेले तसेच सध्या शिंदे गटाकडून फारकत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मानेगाव जिल्हा परिषदची निवडणूक लढवत असल्याने व त्यांच्या पाठीशी खासदार धैर्यशील मोहिते- पाटील व आमदार अभिजीत पाटील यांची ताकद उभी आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून माढा विधानसभेचे निवडणूक लढलेल्या नगराध्यक्ष ॲड. मिनल साठे यांनी मानेगाव जिल्हा परिषद गटामधून दादासाहेब साठे इच्छुक असल्याने साठेंनी मानेगाव गटाच्या तिकिटाची मागणी केली होती. परंतु जि प व पं स निवडणुकीमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असल्याने या तिकिटासाठी काहीसा विरोध होऊन दादासाहेब साठे यांना तिकीट नाकारण्यात आल्यामुळे साठे यांनी राष्ट्रवादीच्या बाजूने न जाता वेगळी भूमिका घेतल्याने साठे गटाची घेतलेली भूमिका कुणाच्या पथ्यावर पडणार हे देखील महत्त्वाचे आहे. साठे गट कोणत्या बाजूने झुकेल त्याचे पारडे निश्चितच जड होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

### जनतेच्या मनात काय?

काही ठिकाणी भाजप तर काही ठिकाणी राष्ट्रवादी सरस असल्याचे बोलले जात आहे. या सर्व गोष्टींचे समीकरण लक्षात घेता येणाऱ्या ७ जानेवारीला मतदार कोणाच्या पारड्यात मतदान करणार व २५ वर्षांची जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीतील सत्तेचे समीकरण बदलणार का? हे पाहणे देखील औत्स्युक्याचे ठरणार आहे.

# भोसरे जि.प.निवडणूक : भाजप, राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्यात तुतारी, बाण, मशालीची आघाडी

**तभा वृत्तसेवा । सोमनाथ शिंदे**
**कुर्डूवाडी, दि.२ फेब्रुवारी-**









माढा तालुक्यातील ३६ गावांमधील माजी आ.संजयमामा शिंदे यांच्या बालेकील्ला असलेल्या भोसरे जि.प.गटात भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या विरोधात राष्ट्रवादी श.प., दोन्ही शिवसेना यांची आघाडी झाली असून दुरंगीच पण अटीतटीच्या व चुरशीच्या होणा-या निवडणूकीत खा.धैर्यशिल मोहीते पाटील यांनी आपली ताकत पणाला लावली आहे.

सर्वसाधारण महीला प्रवर्गासाठी असलेला भोसरे जि.प.गट माढा तालुक्यातील करमाळा विधानसभा मतदारसंघाला जोडलेल्या ३६ गावांमधील एक आहे. या गटात भोसरे पंचायत समिती गण मागासवर्गीय पुरूष तर रोपळे पं.स.गण सर्वसाधारण महीला प्रवर्गासाठी आहे. भोसरे गटात माजी जि.प.सदस्य आप्पा उबळे, विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक वामण उबाळे हे राष्ट्रवादी काँग्रेसकडून ईच्छूक होते. मात्र त्यांच्याच घरातील विलास उबाळे यांच्या पत्नी शर्मिला उबाळे या मोहीते-पाटील गटाकडून तुतारी हाती घेवून उभे राहील्याने अंतीम क्षणी राष्ट्रवादीने नवख्या अश्विनी दळवे यांना उमेदवारी देवून सर्वांना धक्का दिला आहे. याचा परिणाम वामण उबाळे, आप्पा उबाळे हे अद्याप नाराज असल्याचे पहायला मिळत आहे. या मतदार संघामध्ये माजी आ.संजयमामा शिंदे यांचे वर्चस्व असून यांच्या ताब्यात बहुतांशी ग्रामपंचायती आहेत. उबाळे तटस्थ राहण्याचा परिणाम काय होतो हे लवकरच कळेल. भोसरे पं.स.गणामध्ये नवखे राहुल आखाडे हे राष्ट्रवादी श.प.कडून तर संजयमामांनी येथे उच्च शिक्षीत इतिहास तज्ञ प्रा.डाँ.आशिष रजपूत यांना उमेदवारी दिली आहे. मातोश्री शिला रजपूत यांनी पं.स.सभापती असताना केलेले काम ही रजपूत यांच्या जमेची बाजू आहे. त्यांना आर. पी.आय चे बापूसाहेब जगताप यांची साथ तर आहेच त्यांच्या शिफारशिनेच त्यांना उमेदवारी मिळाल्याचे सांगण्यात येते.

रोपळे पं.स.गणात दुरंगी लढत असून एकनाथ शिंदे शिवसेना पक्षाकडून वैशाली गोडगे तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून छायादेवी करंडे यांच्यात दुरंगी लढत होत आहे. वरकरणी राष्ट्रवादी काँग्रेसला संजयमामा यांच्यामुळे एकतर्फी वाटणारी निवडणूक दोन्ही शिवसेना व राष्ट्रवादी शप यांच्या युतीबरोबरच मोहीते-पाटील यांची साथ वैशाली गोडगे यांना असल्याने तसेच पती तात्यासाहेब गोडगे यांचेही मतदासंघात सर्वांशी सलोख्याचे सबंध असल्याने चुरशीचीच निवडणूक होणार असल्याचे दिसते. करमाळा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा यांची युती असल्याचे भाजप नेत्या रश्मी बागल यांनी सांगितल्याचे मंडल अध्यक्ष अविनाश गोरे यांनी सांगीतले.

# निमगाव गटात दोन महिलांमध्ये जोरदार लढत

## भाजपच्या ज्योतीताई ठवरे व शिवसेनेच्या ठवरे यांच्यात चुरस

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२ फेब्रुवारी-**





माळशिरस तालुक्यातील निमगाव जिल्हा परिषद गट हा राजकीय दृष्ट्या अतिशय संवेदनशील मानला जातो. येथे यंदा दोन महिलात मोठी चुरस आहे. भाजपच्या ज्योतीताई ठवरे व शिवसेनेच्या निलावती ठवरे यांच्यात जोरदार लढत होणार हे निश्चित मानले जात आहे.

या ठिकाणी तीनवेळा के.के. पाटील यांनी पंचायत समिती सदस्य म्हणून नेतृत्व केले आहे. त्यानंतर त्यांच्या धर्मपत्नी ज्योतीताई पाटील यांनी जिल्हा परिषद सदस्य म्हणून नेतृत्व केले आहे. यंदा मात्र ते दोघेही निवडणुक रिंगणात नाहीत. या जिल्हा परिषद गटात पुनर्रचनेनंतर बऱ्याच नवीन गावांचा समावेश झाला आहे. यंदा हा गट ओबीसी महीला या प्रवर्गासाठी राखीव आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना शिंदे गट यांची युती झाल्यामुळे यंदा हा जिल्ह्य परिषद गट शिवसेना शिंदे गटासाठी सोडला आहे. गटात धनगर समाजाची लोकसंख्या मोठी आहे त्या खालोखाल मराठा समाजाची लोकसंख्या आहे. निमगाव जिल्हा परिषद गटातील मतदार संख्या ३४ हजार ४८२ एवढी आहे. हा गट ओबीसी महीलेसाठी आरक्षित आहे. याठिकाणी भाजपने उच्चशिक्षित ज्योतीताई ठवरे यांना निवडणूकीत उतरवले असुन शिवसेनेकडून निलावती ठवरे ह्या निवडणूक रिंगणात आहेत. काँग्रेसकडुन रुतुजा मस्के, अपक्ष शोभा कुलाळ याही निवडणूक रिंगणात आहेत. याठिकाणी चौरंगी लढत होत आहे. बाकीचे दोन उमेदवार किती मते घेणार व ते कोणाचे गणीत बिघडविणार यावरच विजयाचे गणीत अवलंबून राहणार आहे. येथे निवडून येणाऱ्या उमेदवारासमोर शेतीच्या पाण्याचा प्रश्न, नियमीत वीजपुरवठा, वाडया वस्त्यांवरील रस्ते, यासह अनेक समस्या सोडवण्याचजे आव्हान आहे.

निमगाव जिल्हा परिषद गटात निमगाव पंचायत समिती गणाची मतदार संख्या १५ हजार ८८१ एवढी आहे. हा पंचायत समिती गण सर्वसाधारण पुरुषांसाठी राखीव आहे. येथे भाजपकडून किरण पाटील व शिवसेनेकडून दत्ता मगर तसेच शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून गोरख पवार तर अपक्ष सतीश कुलाळ हे निवडणूक रिंगणात आहेत. या पंचायत समिती गणात निमगाव, खुडुस, डोंबाळवाडी, कुसमोड या गावांचा समावेश आहे. तर दुसरा गण गोरडवाडी आहे. हा गण ओबीसी महीला प्रवर्गासाठी राखीव आहे. या गणातील मतदार संख्या १८ हजार ६०१ एवढी आहे.

यामध्ये गोरडवाडी, झिंजेवस्ती, चांदापुरी, पठाणवस्ती, गारवाड, मगरवाडी, जळभावी तरंगफळ या गावांचा समावेश आहे. येथे भाजपकडून चांगुणाबाई गोरड, शिवसेनेकडून रेश्मा माने, रासप कडुन शितल देवकते तर अपक्ष म्हणून शोभा कुलाळ या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. निमगाव गणात निमगाव, खुडुस, डोंबाळवाडी, झंजेवाडी, कुसमोड यांचा समावेश आहे. गोरडवाडी पंचायत समीती गणात गोरडवाडी, मांडकी, मोटेवाडी, गारवाड, मगरवाडी, तरंगफळ या गावांचा समावेश आहे. के.के. पाटील यांची भुमिका महत्वाची मानली जात आहे. पंचायत समितीचे सदस्य म्हणून तीनवेळा प्रतिनिधीत्व केलेले व एकदा जिल्हा परिषदेत प्रतिनिधीत्व केलेले असल्याने या गटात अतिशय निर्णायक भुमिका बजाविणार असल्याचे बोलले जात आहे. त्यांना मानणारा मोठा वर्ग या मतदारसंघात आहे.

# वहिनीसाहेबांवर टीका करणाऱ्यांनी आधी स्वत:चे साधुत्व सिद्ध करावे

## केतुर येथील उदयसिंह पाटील यांची प्रतिक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा,दि.२ फेब्रुवारी-**






करमाळा तालुक्यातील कोर्टी गटाच्या माजी जिल्हा परिषद सदस्या सवितादेवी राजेभोसले (वहिनीसाहेब) यांच्याबाबत संधीसाधू असा शब्दप्रयोग करणाऱ्यांनी आधी स्वतःची भूमिका तपासावी, असा थेट सवाल केतुर येथील उदयसिंह पाटील यांनी केला आहे.

करमाळा तालुक्याचे आमदार नारायण पाटील यांचे मीडिया प्रमुख संजय फरतडे यांनी वहिनीसाहेबांवर केलेले वक्तव्य चुकीचे व अन्यायकारक असल्याचे उदयसिंह पाटील यांनी सांगितले. आतापर्यंत वहिनीसाहेबांच्या पाठिंब्यावर कोणी-कोणी कधी संधी साधली, हे सर्वांनाच माहिती आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. सवितादेवी राजेभोसले या कर्तृत्ववान व प्रभावी महिला नेत्या असून, त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली असली तरी पश्चिम भागातील त्यांची स्वतंत्र ताकद सर्वश्रुत आहे. राजकारणातील घडामोडींमध्ये ज्यांना त्यांनी मोठे केले, त्यांच्याकडूनच त्यांना दगाफटका व गद्दारी सहन करावी लागल्याचे चित्र आहे, असेही पाटील म्हणाले.

कोर्टी जिल्हा परिषद गटाची निवडणूक एकतर्फी झालेली असून सर्व उमेदवार बहुसंख्य मतांनी निवडून येणार आहेत. त्यामुळेच वैफल्यग्रस्त मानसिकतेतून काहींनी वहीनीसाहेबांबाबत बेताल वक्तव्ये केली असल्याचा आरोपही त्यांनी केला. वहीनीसाहेबांवर टीका करण्याआधी संधीसाधू नेमका कोण आहे आणि वहीनीसाहेबांच्या पाठिंब्यावर कोणी कशी संधी साधली, याचा आत्मपरीक्षण करावे, असे आवाहन उदयसिंह पाटील यांनी केले आहे.